
# मँ रु नि



१९७४



Dattaram-SRP-27

modern

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न साहित्य, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय

# मॉडर्न '७४
# नियतकालिक

वर्ष चवथे अंक चवथा

संपादक : डॉ. भीमराव कुलकर्णी

संपादन-समिती : प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ, डॉ. सौ. माधवी मित्रा, प्रा. म. रा. मराठे, प्रदीप सिद्धये (विद्यार्थि-प्रतिनिधी). मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, टिळक रोड, पुणे ३०. प्रकाशक : मो. भा. लिमये, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५

# मऱ्हाटा पातशहा छत्रपति झाला....

वेदमूर्ति राजेश्री गागाभट म्हणून वाराणशीहून राजियाची कीर्ति ऐकून दर्शनास आले. भट गोसांवी, थोर पंडित, चार वेद-साहा शास्त्रें-योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव असे पंडित, त्यांस राजे व सरकारकून सामोरे जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिलें. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन, द्रव्यही उदंड देऊन पुजिलें. गागाभट बहूत संतुष्ट जाले. भट गोसांवी यांचे मते, मुसलमान बादशाहा तक्तीं बसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजीराजे यांनीही चार पादशाही दबाविल्या. आणि पाऊण लाख घोडा लष्कर गडकोट असे असतां त्यांस तक्त नाहीं. याकारितां मऱ्हाटा राजा छत्रपति व्हावा असे चित्तांत आणिले. आणि राजियांसही मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करतां सर्वांचे मनास आले. तेव्हा भट गोसावी म्हणूं लागले कीं, तक्तीं बसावें. तेव्हा राजियाचे वंशाचा शोध कारिता राजे शुद्ध क्षत्री, शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणे आलें. तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. उत्तरेचे क्षत्रियांचे व्रतबंध होतात त्याप्रमाणे व्रतबंध करावा. हा विचार आधीं करून भट गोसांवी यांनीं राजियाचा क्षेत्री व्रतबंध केला. शुद्ध क्षत्रीय आधीं केला. अपार द्रव्य धर्म केला. कुल आपले देशांतुन परदेशांतून पन्नास सहस्र वैदिक ब्राह्मण थोरथोर क्षेत्रींहून मिळाले तो सर्वही समुदाय राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले. पुढें तक्तारूढ व्हावें. तक्त सुवर्णाचें, बत्तीस मणाचें, सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं. जडित सिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव रायगड म्हणोन ठेविलें. तक्तास स्थल तोच गड नेमिला. गडावरि तक्तीं बसवावें असें केलें. सप्त महानदियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्रांचीं उदकें, तीर्थक्षेत्र नामांकित, तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनीं अष्टप्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासीं शुद्ध १३ स मुहूर्त पाहिला. ते दिवशीं राजियांनीं मंगलस्नानें करून श्रीमहादेव व श्रीभवानी कुलस्वामि उपाध्ये प्रभाकर भटाचे पुत्र बाळंभट कुलगुरु व भट गोसांवी, वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची सर्वांची पूजा यथाविधी अलंकार वस्त्रें देऊन सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण चौकीवर वसले. अष्टप्रधान व थोर थोर ब्राह्मणांनीं स्थळींस्थळींचीं उदकें करून सुवर्णकलशपात्रीं अभिषेक केला. दिव्य वस्त्रें, दिव्य अलंकार घेऊन, सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्ण कमळें व नाना सुवर्ण-फुलें, वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडश महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या स्थानीं अष्टप्रधानांनीं उभे राहावें. पूर्वीं कृतायुगीं, त्रेतायुगीं, द्वापारीं कलयुगाचे ठायीं पुण्यश्लोक राजे सिंहासनीं बैसले. त्या पद्धतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्वही साहित्य सिद्ध केलें. अष्टखांबीं अष्टप्रधान उभे राहिले. अष्टप्रधानांचीं नांवें ठेविलीं ते स्थळें नेमून उभे केले. आपापले स्थळीं उभे राहिले. वरकड अष्टप्रधानांचे मुतालीक व हुजरे प्रतिष्ठित सर्वही यथाक्रमें पद्धतीप्रमाणें सर्वही उभे राहिले. छत्र जडावाचें, मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. छत्रपती असें नांव चालविलें. कागदींपत्रीं स्वस्ति श्री शक, सिंहासनावर बसले त्या दिवसापासून नियत चालविला. पन्नास सहस्र ब्राह्मण वैदिक मिळाले. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेताळीस लक्ष होन जाले. येणेंप्रमाणें राजे सिंहासनारूढ जाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाहा. मऱ्हाटा पातशाहा येवढा छत्रपती जाला ही गोष्ट काही सामान्य जाली नाहीं.

कृष्णाजी अनंत सभासद, चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १६१६

# संपादकीय

याचसाठी केला होता...

आमच्या महाविद्यालयास यंदा चार वर्षे पुरी होत आहेत. चार वर्षांपूर्वी ज्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात मोठ्या उत्सुकतेने व कुतूहलाने प्रवेश घेतला, ते विद्यार्थी यावर्षी पदवी-परीक्षेला बसत आहेत. चार वर्षांपूर्वी या महाविद्यालयाची वास्तू नुकतीच कुठे उभी राहत होती. याच दिवसांत हे महाविद्यालय उभे करण्यासाठी धडपडणारे संस्थेचे पदाधिकारी उन्हातान्हातून उभे राहून महाविद्यालयाच्या भिंती उभ्या राहताना देखरेख करीत होते. एव्हाना महाविद्यालयात घ्यावयाच्या नव्या प्राध्यापकांची निवड—नेमणूक त्यांनी करून टाकली होती. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीसारखी शिक्षणक्षेत्रात दीर्घ तपस्या असलेली संस्था पुण्यात महाविद्यालय सुरू करते आहे आणि तेही ज्ञानेश्वरमहाराजांच्या नावे पुनीत झालेल्या पदपथावर हे ऐकून अनेक नामवंत प्राध्यापकांना या संस्थेचे आकर्षण वाटले होते. या आकर्षणापोटीच अनेक जागरूक पालकांनी आपल्या मुलांना या महाविद्यालयात पाठवावयाचे ठरविले होते.

महाविद्यालयाची सुरुवात अशा मोठ्या कुतूहलजनक व अद्‌भुतरम्य वातावरणातच झाली. सगळेच काही उभे राहावयाचे होते, घडावयाचे होते, घडवायचे होते! आणि आज! आज सगळे काही उभे राहिलेले आहे, साऱ्या अडचणीवरून मात करून केवळ चार वर्षांच्या अल्पावधीत सारे काही घडविले गेले आहे, घडले आहे! संस्थेच्या चालकांना, शिक्षकांना व विद्यार्थ्यांना या उभारणीचा, निर्मितीचा सार्थ अभिमान वाटणे साहजिक आहे. बारा-पंधरा लाखांची इमारत, सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय, फर्निचर आणि अन्य सुविधा, नाणावलेले तरुण व अभ्यासू प्राध्यापक आणि प्रत्येक क्षेत्रात महाविद्यालयाचे पाऊल सदैव पुढे असावे म्हणून नित्य जागरूक राहून कार्य करणारे प्राचार्य यांमुळे झपाट्याने हे महाविद्यालय पुढे गेले आहे. आपल्या स्वार्थत्यागाने, दूरदृष्टीने भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या मध्यमवर्गीयांनी पुण्यामध्ये शिक्षणसंस्था उभ्या करून ज्या आधुनिक पुण्याची निर्मिती केली आणि साऱ्या भारतात पुण्याचे नाव उज्ज्वल केले, त्या स्वार्थत्यागाचा, कर्तबगारीचा प्रत्यय या महाविद्यालयाच्या रूपाने पुन्हा एकदा आला आहे.

केवळ चार वर्षांच्या अल्पावधीत मॉडर्न महाविद्यालय सर्व दृष्टींनी परिपूर्ण अशा अवस्थेत आज उभे आहे. या महाविद्यालयाच्या उभारणीत संस्थाचालकांनी कसलीही कसूर तर केली नाहीच, परंतु विनाकारण भलती काटकसरही केली नाही. पहिल्याच वर्षी अनुभवी प्राध्यापकांची निवड केली. प्रयोगशाळांची उभारणी करताना ज्या काही सोयी आवश्यक आहेत. त्यांची कटाक्षाने जोडणी केली आणि म्हणूनच आज निरनिराळ्या स्थानिक चौकशी-समित्यांचे सदस्य अनेक महाविद्यालयांना नमुन्यांसाठी 'मॉडर्न'कडे बोट दाखवीत आहेत. 'प्राध्यापक' हा

कोणत्याही महाविद्यालयाचा महत्त्वाचा घटक असतो. प्रत्येक विषयातील 'प्राध्यापका'वर विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असते. आपल्या विषयासंबंधी आस्था नसलेले, व्यासंग नसलेले प्राध्यापक केवळ एकदोन वर्षे नोकरी केल्यानंतर संस्थेत कायमचे ठाण मांडतात व त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते, इकडे महविद्यालयाचे मोठे लक्ष आहे. त्यामुळे प्राध्यापकांची नेमणूक इथे तावूनसुलाखून तर केली जातेच, परंतु त्याचबरोबर उत्तम शिक्षकाच्या कसोटीला उतरतील अशांनाच उद्याच्या पिढीचे दीर्घकाळ शिल्पकार बनण्याची संधी देण्यात येते. आणि म्हणूनच आज या महाविद्यालयातील प्राध्यापकांना महत्त्व प्राप्त झाले आहे. भविष्यकाळात ह्या गोष्टीकडे आणखी लक्ष दिले जाईल.

विद्यार्थी हा तर कोणत्याही महाविद्यालयाचा मुख्य कणा! अनंत हस्ताने, अनंत प्रकारे त्यांनी गेल्या चार वर्षांत या महाविद्यालयाला यश दिले, या महाविद्यालयाचा लौकिक दुमदुमत ठेविला. अगदी पहिल्याच वर्षी या महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यापीठांच्या परीक्षांच्या श्रेय-नामावलीत झळकले, आणि सातत्याने ते झळकत राहिले. सर्व प्रकारच्या अभ्यासेतर कार्यांत त्यांनी हिरीरीने भाग घेतला, क्रीडाक्षेत्रांवर पराक्रम गाजविला, अनेक सामन्यांत त्यांनी मॉडर्नकडे विजयश्री खेचून आणली. त्यांच्या या बहुढंगी, बहुरंगी आणि मूलतः अभ्यासातील कर्तृत्वामुळे मॉडर्न हे केवळ चार वर्षांचे आहे, हे सांगूनही कुणाचा विश्वास बसत नाही. जणू काही अनेक वर्षांच्या परंपरेचे, अनुभवांचे, समृद्धीचे हे महाविद्यालय आहे, असे सर्वांना वाटते. चार वर्षे ही नोंद काळाच्या जाणिवेने आमच्या मनात आहे. कर्तृत्वाने ही नोंद पुसली जाऊन सुस्थिर, वैभवशाली, अनुभवी व गौरवशाली व अनेक वर्षांचे मोठे असे हे महाविद्यालय मानले जाऊ लागले आहे.

आज महाविद्यालयाच्या तिन्ही शाखांचे विद्यार्थी पहिल्यांदा पदवीपरीक्षेस बसत आहेत, या कल्पनेने महाविद्यालयास साहजिकच आनंद होतो आहे. निरोप-समारंभप्रसंगी आमच्या भावना पहिल्यावहिल्या अपत्याच्या नामकरणप्रसंगासारख्या उत्साही, व कृतार्थतेच्या आहेत. महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनप्रसंगी प्राचार्यांनी केलेल्या भाषणातील कृतकृत्यतेची या प्रसंगी जाणीव होते. ते म्हणाले होते :

चालू शैक्षणिक वर्ष हे आमच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचे वर्ष आहे. चवथ्या वर्षात पदार्पण केलेला हा महाविद्यालयरूपी वेल चांगला तरारला आहे. फोफावला आहे. मोठ्या जिद्दीने व आत्मविश्वासाने संस्थाचालकांनी लावलेल्या या रोपट्याचे त्यांच्या प्रदीर्घ प्रयत्नांमुळे, चिकाटीमुळे, श्रमामुळे व माझ्या सहकारी प्राध्यापक व विद्यार्थिमित्रांच्या सहकार्यामुळे केवळ ४ वर्षांच्या काळातच वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आज या आधारवडाच्या सावलीत २००० विद्यार्थी, ७० प्राध्यापक, २५ कार्यालयीन कर्मचारी व ४० सेवकवर्ग कार्य करीत आहेत. हा आधारवड इतक्या भक्कम पायावर उभा आहे आणि त्याच्या शाखा, उपशाखा इतक्या झपाट्याने वाढत आहेत की समाजाला व यापुढील कित्येक पिढ्यांना समृद्ध, संपन्न बनविणाऱ्या शिक्षणाची सावली देण्याचे महत्कार्य हा ज्ञानवृक्ष करीत राहणार आहे. याचि देही याचि डोळा एका रोपट्याचा होत असलेला वृक्ष पाहण्याचे भाग्य अपूर्व आहे. हा आनंद आगळा आहे. महाविद्यालये झाली, होतील परंतु मोठ्या अभिमानाने सांगतो की इतक्या अल्पकाळात एवढी प्रगती क्वचितच दृष्टीला पडेल. याचा गर्व नाही. मनी नम्र भाव आहे पण सार्थ अभिमान मात्र जरूर आहे. आज आमच्या या महाविद्यालयात १८७९ विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांतील साहित्य विभागात ४६१, शास्त्र विभागात ५२७ व वाणिज्य विभागात ८९१ विद्यार्थी आहेत.

पदवीपर्यंत बी. ए., बी. एस्सी. व बी. कॉम. चें शिक्षण देणारे पुण्यातील अग्रेसर महाविद्यालय म्हणून हे महाविद्यालय मानले जाते.

आम्ही फार मोठ्या प्रमाणात पालकांचा व विद्यार्थ्यांचाही विश्वास संपादन केला आहे. व्यवस्थित व शिस्तबद्ध अभ्यासासाठी, व्यक्तिगत मार्गदर्शनासाठी पालक व विद्यार्थी या महाविद्यालयाकडेच आकृष्ट होतात. गेल्या वर्षीच्या स्नेहसंमेलनप्रसंगी मी म्हटल्याप्रमाणे, प्रथम वर्षी आमची परस्परात व विद्यार्थ्यांशी ओळख झाली, दुसऱ्या वर्षी परिचय झाला, गेल्या वर्षी स्नेहसंबंध प्रस्थापित झाले व यंदा ऋणानुबंध निर्माण झाले आहेत. आणि या गोष्टीचे उत्तम उदाहरण म्हणजे आमच्या माजी विद्यार्थ्यांनी स्थापन केलेली माजी विद्यार्थि-संघटना. त्याच्या दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी संध्याकाळी या संघटनेच्या होणाऱ्या नियमित सभा, माजी विद्यार्थ्यांतर्फे महाविद्यालयाला दिले गेलेले घड्याळ, आरसे वगैरे उपयुक्त वस्तूंच्या भेटी, माजी विद्यार्थ्यांतर्फे आजी विद्यार्थ्यांसाठी पारितोषिकयोजना, माजी विद्यार्थ्यांनी या विद्यार्थ्यांच्या मित्रमंडळीत, नातेवाईकांत व कुटुंबियांत मॉडर्न महाविद्यालयातच प्रवेश घेण्यासंबंधी केलेल्या शिफारसी या सर्व गोष्टी या ऋणानुबंधाच्या प्रमुख द्योतक होत. ज्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांना आपल्या परगावच्या नोकरीच्या गावाहून पुण्याला आल्यानंतर आपल्या महाविद्यालयाला भेट द्यावीशी वाटते. जे हक्काने व मोठ्या प्रेमाने त्यांच्या प्राचार्यांना व प्राध्यापकांना भेटावयास येतात. त्या महाविद्यालयाबद्दल विद्यार्थ्यांच्या प्रेमाची व स्नेहाची जबरदस्त शक्ती आहे असे मला वाटते. आणि या प्रेमाचा व स्नेहाचा उपयोग हे महाविद्यालय अधिक उंच, अधिक दर्जेदार, अधिक विद्यार्थ्योपयोगी होण्यासाठी होईल अशी मला खात्रीच नव्हे, तर विश्वास वाटतो.

यंदाच्या या स्नेहसंमेलनाचे एक अत्यंत महत्त्वाचे व अमूल्य असे वैशिष्ट्य आहे आणि ते म्हणजे यंदाचे स्नेहसंमेलन सर्वार्थाने विद्यार्थ्यांचे आहे. प्रत्येक गोष्टीचा विचार, नियोजन, आराखडा, व्यवस्थापन, कार्यवाही सर्वस्वी विद्यार्थ्यांनी केलेली आहे. आणि आमच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी पटीने चांगली कामगिरी त्यांनी केलेली आहे. ह्या माझ्या सर्व विद्यार्थीमित्रांचा त्यांच्या प्रतिनिधींचा मला आणि आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो. ”

तुम्हांस
आमुचे लाख प्रणाम

१९७३–७४ हे वर्ष अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे. ‘ भारतातील शिक्षणाचे माहेरघर ’ ही उपाधी सार्थ करण्यासाठी ज्या शिक्षणसंस्था पुण्यात उभ्या राहिल्या त्या शिक्षणसंस्थांमधील एक महत्त्वाचा घटक म्हणून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि मॉडर्न महाविद्यालय यांना महत्त्व असले तरी या शैक्षणिक कार्याचे अद्याप एक शतक देखील भरले नाही. परंतु ह्या कार्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या अनेक कर्तबगार विभूती व घटना डोळ्यांसमोर या प्रसंगी उभ्या राहतात त्या त्यांनी सुरू केलेल्या कार्याचे काही शतकांचे टप्पे यावर्षी पुरे होतात म्हणूनच. साडेतीनशे वर्षांपूर्वी एक बारा वर्षांचा मुलगा आपल्या आईबरोबर बंगळूरहून पुण्याला ज्या दिवशी आला, त्या दिवसापासून पुण्याची सारी कुंडलीच बदलली. त्या दिवशीच पुण्याच्या इतिहासाचे एक नवे पान उलगडले. ह्या मुलाने पुणे ह्या छोट्या गावाचे पुण्यनगरीत रूपांतर केले आणि लक्षावधि सैन्यबळासह पुण्याच्या लालमहालात ठाण देऊन बसलेल्या शाइस्तेखानास मोठ्या धाडसाने त्याच्या महालात शिरून त्याला ज्या दिवशी शास्त लावली त्या दिवशीच साऱ्या हिंदुस्थानला एक नवा शास्ता लाभला. १६७४ साली त्याने स्वतःला राज्याभिषेक करून घेऊन त्यापूर्वी साडेतीनशे वर्षे आपल्या देशाच्या भूमिपुत्रांच्या शरीरावरचे उद्ध्वस्त झालेले

सम्राटपदाचे छत्र परत एकदा आपल्या घरी आणले. ह्या महन्मंगल प्रसंगाला आता तीनशे वर्षे पुरी होत आहेत. आम्ही आहोत, आमच्या हजारो वर्षांच्या परंपराना उरी बाळगून अभिमानाने उभे आहोत, यान्चे श्रेय या महान विभूतीला, अवतारी पुरुषाला आहे. अर्थातच महाराष्ट्राच्या अस्मितेचे बीज ज्या साक्षात्कारी पुरुषाच्या वाणीने पेरले गेले, त्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचीही सातवी जन्मशताब्दी आणि आपल्या बंडखोर आणि स्वतंत्र अशा दिव्य दृष्टीने ज्या आणखी एका महापुरुषाने एक नव्या क्रांतिकारक अशा समतावादी धर्मपंथाची स्थापना केली, त्या महानुपंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांचे प्रयाणवर्षही हेच आहे. अस्मानी–सुल्तानी आक्रमणामुळे तीन–साडेतीनशे वर्षे हतप्रभ झालेल्या महाराष्ट्राला ज्या ग्रंथाने एकनाथांनी पुनः संजीवनी दिली त्या 'भागवत' ग्रंथाच्या निर्मितीला याच वर्षी ३०० वर्षे पुरी होत आहेत. आपल्या निबंधमालेने ज्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी महाराष्ट्राच्या अस्मितेचा दुंदुभी आमच्या तुमच्या मनात दुमदुमत ठेविला. त्या 'निबंधमाले'ची आणि सामाजिक विषमतेवर व रूढिग्रस्ततेवर आपल्या साक्षात् कृतीने प्रहार करणाऱ्या म. जोतिबा फुल्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची शताब्दी याच वर्षी येते. महर्षितुल्य विठ्ठल रामजी शिंदे, साऱ्या महाराष्ट्रास आपल्या भावकवितेने वेड लावणाऱ्या कविवर्य भास्करराव तांबे यांची व स्वतः पंगू असतानाही 'सुंदर मी होणार' हा असाधारण मनोभाव जागृत करणारे आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांनाही 'बुद्धयाचि वाण धरिले करी हे सतीचे' ही दीक्षा देणारे त्यांचे कविगुरू कवी गोविंद यांच्या जन्मशताब्दीचे हेच वर्ष! आजच्या विलक्षण उत्क्रांतीच्या, नैराश्याच्या काळात मनोधैर्य टिकविण्यास प्रेरणा देणाऱ्या ह्या सर्व महात्म्यांच्या कर्तृत्वास आमचे लाख लाख प्रणाम!

**त्रैवार्षिक तपासणी :** पुणे विद्यापीठातर्फे आमच्या महाविद्यालयाची त्रैवार्षिक तपासणी डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांच्या नेतृत्वाखाली एका समितीने जानेवारी महिन्यात केली. या समितीत डॉ. शेजवलकरांबरोबरच मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयाचे प्राचार्य मुद्गल, देवगिरी येथील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ना. य. डोळे, ठाणे येथील महाविद्यालयाचे प्राचार्य नाडकर्णी, पुणे विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. डेव्हिड आणि शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळाचे प्रमुख डॉ. फडकुले हे सदस्य होते. समितीने संस्थेचे संचालक, प्राचार्य व प्राध्यापक यांच्याशी चर्चा केली, या महाविद्यालयाने अल्पावधीत केलेल्या प्रगतीबद्दल मनापासून समाधान व्यक्त केले व याच वेगाने महाविद्यालयाने घोडदौड करावी, अशी सूचना केली. समितीच्या सदस्यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे :

It was our great privilege to visit this College which is indeed modern in its true sense of the word. We were considerably impressed by the dedicated and devoted zeal with which the organisers of the College, along with the staff-members, were carrying on the administrative and academic work. The College has implemented several new ideas. The students and the staff have been given adequate participation. The Institution has got good traditions. We have no doubt that the College has a good future and enough scope to play tis part in the University work of academic advancement under the enlightened and able guidance of Principal M. B. Limaye.

**कुलगुरूंनी पाठ थोपटली :**

दि. १४ मार्च १९४७ रोजी डॉ. परांजपे यांच्या ग्रंथाचे प्रकाशन व या महाविद्यालयातील पीएच्. डी. पदवीधारकांचा सत्कार-समारंभ पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ग. स. महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्याप्रसंगी बोलताना ते म्हणाले :

" कोणत्याही विद्यापीठाचे कार्य दुहेरी स्वरूपाचे असते. विद्यापीठ ज्या भागात कार्य करीत असते त्या विभागाच्या शिक्षणाच्या गरजा पुरे करणे हे त्याचे आद्य कर्तव्य असते, परंतु एवढेच करून चालत नाही. त्याहीपलीकडचे एक मोठे कर्तव्य विद्यापीठाला बजावायचे असते, ते म्हणजे व्यापक दृष्टीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ज्ञानसंग्रहात भर घालणे. ' मॉडर्न 'चे काही तरुण प्राध्यापक आपल्या संशोधनाने व महत्त्वाच्या विषयावरील ग्रंथलेखनाने विद्यापीठाच्या या व्यापक कार्यास हातभार लावीत आहेत, याचा मला आनंद होतो. "

**बहरलेला स्वप्नमळा :**

महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे आजच्या पिढीचे लोकप्रिय वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी खालील शब्दांत महाविद्यालयाबद्दलचा अभिप्राय व्यक्त केला आहे.

" शिक्षणमहर्षी प्राचार्य ताटके यांचे तप महाविद्यालयाच्या रूपाने मूर्तिमंत झाले आहे. पुण्याच्या शैक्षणिक क्षितिजावर नव्याने उदयास आलेले हे महाविद्यालय हा महाराष्ट्राचा मानबिंदू ठरेल असा विश्वास वाटतो.

संचालकांचे कर्तृत्व, प्राचार्यांचे नेतृत्व, व प्राध्यापकांचे विशुद्ध व्यावसायिक चारित्र्य यांच्या संगमातून व समन्वयातून साकार झालेले हे सुरेख स्वप्न आहे.

या महाविद्यालयाकडे पाहून नियतीला आणखी काही स्वप्ने पडतील असे वाटते. नियतीच्या स्वप्नांचा मळा सदैव बहरत रहावा हीच इच्छा. "

**नवनवे उपक्रम :**

आमचे महाविद्यालय अगदी पहिल्या दिवसापासून सदैव उपक्रमशील राहिले आहे. शिस्तीने एकजुटीने आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या व सर्वांगीण वाढीच्या दृष्टीने कष्ट करीत राहणे हा त्याचा बाणा आहे.

निरनिराळ्या क्षेत्रांतील आमच्या कामगिरीसंबंधीच्या काही ठळक गोष्टी खालीलप्रमाणे :—

यंदाचे वर्षी विद्यार्थिसंख्या १८७९ झाली असून, कला, शास्त्र व वाणिज्य विभागांकडे एकूण १९ वर्ग आहेत. मराठी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व मानसशास्त्र हे विषय तृतीय वर्ष बी. ए. साठी, रसायनशास्त्र व पदार्थविज्ञान तृतीय वर्ष बी. एस्. सी. साठी व अकौन्टन्सी, कॉस्ट अकौंटिंग व संख्याशास्त्र हे विषय तृतीय वर्ष बी. कॉम. साठी शिकविण्याची सोय आहे. पुढील वर्षापासून विद्यापीठाची परवानगी मिळाल्यास एम्. कॉम्.चे पदव्युत्तर वर्ग सुरू करण्याचा विचार आहे.

विद्यापीठीय परीक्षांतही आमच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. पदवीपूर्व साहित्य परीक्षेत कु. ज्योती राऊत ६९ टक्के गुण मिळवून विद्यापीठात दहावी आली. निरनिराळ्या परीक्षांत ७७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली. बी. कॉम. चे परीक्षेस श्री. डाळवाले हे आमचे विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झाले व कॉस्ट अकौंटिंग या विषयात त्यांना विद्यापीठाचे पारितोषिक मिळाले. बी. एस्सी. परीक्षेत २ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी मिळाली व श्री. गुप्ता हे आमचे विद्यार्थी पहिले आले. उल्लेखनीय टक्केवारी खालीलप्रमाणे आहे :—
तृतीय वर्ष शास्त्र – ८६ टक्के, तृतीय वर्ष साहित्य – ७७ टक्के, तृतीय वर्ष वाणिज्य – ७५ टक्के, पदवीपूर्व वाणिज्य – ७३ टक्के, पदवीपूर्व साहित्य – ६३ टक्के

राष्ट्रीय छात्रसेनेत आमचे १८६ विद्यार्थी असून, त्यात २१ विद्यार्थिनी आहेत. रत्नाकर विश्वनाथ नवले हा आमचा विद्यार्थी दिल्ली येथे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या संचलनासाठी निवडला गेला होता. आमच्या महाविद्यालयातील कु. सीमा व्हावळ या छात्र-सैनिक विद्यार्थिनीची निवड कामठी येथील लिडरशिप कॅम्पसाठी झाली होती. सर्वोत्तम छात्र ( Best cadets ) म्हणून खालील विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

(1) u/o P. P. Nimbalkar 5 C Coy, (2) u/o D. V. Patil, Signal Coy, (3) Miss Kanchan Kamat, 2 (MAH) Girls' unit, प्रा. पद्माकर आपटे यांनी छात्रसेनेचे महाविद्यालयाचे अधिकारी म्हणून उत्तम काम केले. या कामात प्रा. दातार यांनी त्यांस मदत व मार्गदर्शन केले.

गेल्याच वर्षी सुरू झालेल्या आमच्या राष्ट्रीय सेवायोजना पथकात यंदा ८६ विद्यार्थी असून त्यात १२ विद्यार्थिनी आहेत. 'युवकांची दुष्काळाविरुद्ध झुंज' या प्रकल्पाची व शिबिराची संपूर्ण जबाबदारी आमच्या पथकाने उचलून सेवायोजनांचा श्रीगणेशा मे १९७३ मध्येच गिरविला. सेवायोजनांची अभ्यासपूर्ण चर्चा व परिसंवादाबरोबरच पर्वती टेकडीवर वृक्षारोपण, पिसोळी गावात ३ दिवसांचे शिबिर, बंधाऱ्याचे काम व तेथील प्राथमिक व माध्यमिक शाळां-मध्ये गणित, गीतगायन, व चित्रकला यांचे शिक्षण देणे, रिमांड होम व अंधशाळांना दर पंधरवड्याला भेट देणे व तेथील विद्यार्थ्यांत मिसळणे व त्यांना काही खेळ शिकविणे, झोपड-पट्ट्यांची पाहणी व तेथे ब्रेड वाटपांचे काम, रक्तदान व ससून हॉस्पिटलमध्ये सफाई इत्यादी कामे हे आमचे स्वयंसेवक वर्षभर करीत आहेत.

यंदा आमच्या क्रीडाविभागात विद्यार्थीसंघांनी ११ सांघिक व ८ वैयक्तिक विभागांत व विद्यार्थिनींनी ७ सांघिक व २ वैयक्तिक खेळांत भाग घेतला. १५० विद्यार्थी व ७० विद्यार्थिनींनी आंतरमहाविद्यालयीन व आंतर विभागीय खेळांत भाग घेतला. खो खो, व्हॉलीबॉल यांत विजेतेपद व सॉफ्टबॉल व वजन उचलणे यांत उपविजेते पद आमच्या संघांना मिळाले.

खो खो, व्हॉलीबॉल, बॉल बॅडमिंटन या खेळांसाठी आमच्या विद्यार्थ्यांची आंतर विद्यापीठ व राष्ट्रीय पातळीवर निवड झाली असून, आमच्या खालील विद्यार्थ्यांच्या नैपुण्याचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. कला-मंडळातर्फे 'मॉडर्न-संगीत-संध्या', आंतर महाविद्यालयीन वाद्यसंगीत, चित्रकथा व छायाचित्रण स्पर्धेत सुयश व आकाशवाणीवर कलामंडळातर्फे कार्यक्रम ही या मंडळाची उल्लेखनीय कामगिरी होय.

नाट्यविभागातर्फे पुरुषोत्तम करंडकासाठी दोन एकांकिका सादर केल्या गेल्या. रणमर्द व मादी यांत अभिनयाबद्दल प्रशस्तिपत्रक कु. ऊर्मिला रणदिवे व सौ. हेमा लेले यांना मिळाले.

मॉम हे मॉडर्न महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांचे हस्तलिखित नियतकालिक असून, ते विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन गुणांना योग्य वाव देत असते; व मोठ्या आकर्षक स्वरूपात प्रगट होते.

वक्तृत्व मंडळातर्फे निरनिराळ्या ६ स्पर्धांसाठी आमचे स्पर्धक संघ पाठविण्यात आले. द्वितीय सत्रापासून विद्यार्थ्यांना वक्तृत्वाचे शास्त्रोक्त शिक्षण देण्याच्या हेतूने वक्तृत्व प्रशिक्षण केंद्राची योजना करण्यात आली आहे.

विद्यार्थिवाचनालयासाठी जवळ जवळ ३५० पुस्तकांचा संग्रह केला असून, त्याचा फायदा विद्यार्थिवर्ग बहुसंख्येने घेत आहे. आमच्या साहित्य, शास्त्र, वाणिज्य व नियोजन मंडळातर्फे व्याख्याने, परिसंवाद, चर्चा औद्योगिक प्रकल्पांस भेटी, इत्यादी उपक्रम नियमितपणे आयोजित केले जातात व यांत विद्यार्थ्यांचा उत्साह व प्राध्यापकांचा प्रतिसाद वाढत आहे.

गेली तीन वर्षे सातत्याने आमच्या प्राध्यापक चर्चा मंडळात दरमहा एका नवीन विषयावर निबंधवाचन व चर्चा असते. या चर्चेच्या निमित्ताने बाहेरील तज्ज्ञ मंडळींच्या मार्गदर्शनाचा आम्हाला लाभ मिळतो. आमच्यातील बहुसंख्य प्राध्यापकांनी त्यांचे विषयात ग्रंथलेखन केले असून, बरेच प्राध्यापक पीएच्. डी. च्या संशोधनात मग्न आहेत. अर्थशास्त्राचे प्रा. महाजन यांना आंतरराष्ट्रीय युवक मेळाव्याचे निमित्ताने जर्मनी वगैरे युरोपीय देशांना भेट देण्याची संधी मिळाली.

**व्यवसाय-मार्गदर्शन शिबिर :**

या नव्यानव्या उपक्रमात आणखी एका उपक्रमाची यंदा भर पडली.

नोकरीसाठी द्याव्या लागणाऱ्या मुलाखती आणि बौद्धिक चाचण्या यांचे तंत्र सध्या अत्याधुनिक झाले आहे. या बदलत्या आधुनिक तंत्राशी पदवी घेऊन महाविद्यालयाबाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा परिचय व्हावा या दृष्टिकोणातून एक Employment guidence seminar घेण्यात आले. या शिबिरामध्ये तृतीय वर्गाच्या सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना स्वेच्छेनुसार सहभागी करून घेण्यात आले होते. एकूण ९२ विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेतला होता.

या सेमिनारसाठी पुण्यातील औद्योगिक व आर्थिक क्षेत्रांतील खालील सुप्रसिद्ध व्यक्तींनी मार्गदर्शन केले.

१. श्री. मेहरुणकर, मॅनेजर (पर्सोनेल) टेल्को.

२. श्री. धनभूरा, जनरल मॅनेजर, राजा बहादूर मोतीलाल मिल्स

३. श्री. पांडुरंगी, मॅनेजर, न्यू बँक ऑफ इंडिया

४. श्री. मुर्डेश्वर, ब्रँच मॅनेजर, न्यू बँक ऑफ इंडिया

अशा तऱ्हेचा उपक्रम महाविद्यालयामध्ये प्रथमच आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी औद्योगिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे सहकार्य लाभले याबद्दल महाविद्यालय आभारी आहे.

**स्वागत :**

खालील प्राध्यापकांची यंदा या महाविद्यालयात नव्याने नेमणूक झाली त्यांचे हार्दिक स्वागत.

१. प्रा. मधुसुदन रामचंद्र मराठे (भौतिकी)
२. प्रा. किशोर द्. काशिद (संख्याशास्त्र)
३. डॉ. प्रा. सौ. माधवी मित्रा (वाणिज्य)
४. प्रा. अरविंद वि. रायरीकर (गणित)
५. प्रा. सौ. विजयाराणी गडकरी (इंग्रजी)
६. प्रा. कु. विनीता देशपांडे (अर्थशास्त्र)
७. प्रा. रा. ग. लिमये (रसायनशास्त्र)
८. प्रा. कमलाकर गोखले (रसायनशास्त्र)
९. प्रा. राजेन्द्र व्होरा (राज्यशास्त्र)
१०. प्रा. कु. भारती वर्दे (मानसशास्त्र) (अर्धवेळ)
११. प्रा. स. रा. महाजन (हिंदी) (अर्धवेळ)
१२. प्रा. सौ. भाग्यश्री रानडे (अर्थशास्त्र) (अर्धवेळ)
१३. प्रा. नेमिचंद फुलचंद कर्नावट (अकाउंटस्) (अर्धवेळ)

१४. प्रा. सुधाकर म. न्हाळदे ( भूगोल ) ( अर्धवेळ )
१५. प्रा. सौ. अश्विनी जोशी ( गणित ) ( अर्धवेळ )
१६. श्री. घनःश्याम डाळवाले ( स्वाध्याय–शिक्षक )
१७. श्री. सुधीर परदेशी ( स्वाध्याय–शिक्षक )
१८. श्री. गंगाधर जगताप ( प्रयोग शिक्षक ) ( रसायनशास्त्र )
१९. श्री. श्री. रं. आढाव ( प्रयोग शिक्षक ) ( रसायनशास्त्र )
२०. श्री. श्री. न. भिडे ( प्रयोग शिक्षक ) ( भौतिकी )
२१. श्री. मो. ज. वेडेकर ( प्रयोग शिक्षक ) ( रसायनशास्त्र )

**शुभेच्छा :** रसायन–शास्त्र या विषयाचे खालील दोन प्राध्यापक व दोन प्रयोगशिक्षक महाविद्यालय सोडून गेले त्यांना शुभेच्छा :

( १ ) प्रा. आर. जी. मुजुमदार ( २ ) प्रा. आर. व्ही. शुक्ल
( ३ ) श्री. एस. के. पोतदार ( ४ ) श्री. आर. एन. देशपांडे

**दुःखद निधन :** गणित विषयाचे प्राध्यापक अश्विनीकुमार फडके यांचे २ जुलै १९७३ रोजी दुःखद निधन झाले. त्यांची सातत्याने स्मृती राहावी म्हणून त्यांचे गुरुजन, सहकारी व विद्यार्थी यांनी स्वयंस्फूर्तीने रु. १५५०।– चा निधी जमवलेला असून त्यातून गणित विषयात त्यांच्या नावाने पारितोषिक ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**कृतज्ञता :** ' मॉडर्न ' ला भेटी देऊन आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा देणारे अनेक प्रकारचे विद्वान व्याख्याते, ग्रंथालयाला पुस्तकांच्या भेटी देऊन आमचे ग्रंथालय समृद्ध व संपन्न करणाऱ्या संस्था व व्यक्ती, त्रैवार्षिक चौकशी समितीचे सदस्य व स्थानिक चौकशी समितीचे सदस्य डॉ. ना. र. इनामदार व डॉ. भालचंद्र फडके, पुणे विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान मंडळ, आणि अशा प्रकारच्या असंख्य संस्था व व्यक्ती यांच्याबद्दल आम्ही आमची कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. पुण्याच्या ' बँक ऑफ बरोडा 'ने विद्यार्थ्यांच्या ओळखपत्रासाठी रु. ११००ची देणगी दिली, याचा इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

**आभार :** या अंकाच्या उभारणीसाठी अगदी सुरुवातीपासून मोठ्या उमेदीने व उत्साहाने तयारी केली होती. परंतु कागदाच्या व इतर सर्व प्रकारच्या मुद्रणविषयक महर्गतेमुळे अंक सुटसुटीत काढण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात अंकासाठी आलेले साहित्य मागे ठेवावे लागले. अंक आकर्षक व्हावा म्हणून कल्पना मुद्रणालयाने सर्व प्रकारचे साहाय्य केले. प्रा. दातार, प्रा. आपटे, प्रा. पुंडे, प्रा. गोसावी, ग्रंथपाल श्री. बापट, कार्यालयअधिक्षक श्री. देशपांडे व त्यांचे सहकारी श्री. दोशी यांनी वेळोवेळी अनेक प्रकारची मदत केली. या सर्वांचे आभार.

भीमराव कुलकर्णी


## महाविद्यालयातील प्रथम क्रमांकाचे मानकरी



कु. मृणाल पाठक
तृ. व. साहित्य



दिनेश गुप्ता
तृ. व. शास्त्र, प्रथम श्रेणी



घनःशाम डाळवाले
तृ. व. वाणिज्य, प्रथम श्रेणी



सौ. हेमा लेले
द्वि. व. साहित्य



कृष्णकुमार पी.
द्वि. व. शास्त्र



कु. प्रतिभा कान्हेरे
द्वि. व. वाणिज्य



कु. छाया जोगळेकर
प्र. व. वाणिज्य



कु. शैला गांधी
प्र. व. शास्त्र प्रथम श्रेणी



श्रीनिवास पुरंदरे
प. पूर्व शास्त्र, प्रथम श्रेणी



प्रकाश भावसार
प. पूर्व वाणिज्य, प्रथम श्रेणी



कु. ज्योती राऊत
प. पूर्व सा. प्रथम श्रेणी
महाविद्यालयात प्रथम



कु. माधुरी साठे
प. पूर्व सा. प्रथम श्रेणी



कु. सुमन डुंबरे
प. पूर्व सा. प्रथम श्रेणी

## पदवीपूर्व शास्त्र : प्रथम श्रेणी



भरत मामनिया



कु. संजीवनी अरगडे



दीपक पढेर



प्रमोद राणे



वसंत वाळुंज



मोहन कळसकर



संजय दाते



कु. अंजली निकम



संजय भोमे



विष्णु पुंडले



कु. सुनीता यंदे



चंद्रशेखर पलुस्कर









## पदवीपूर्व वाणिज्य : प्रथम श्रेणी



कु. जयश्री करंदीकर



कु. कीर्तिमालिनी कुलकर्णी



रवींद्र परांजपे



कु. सुषमा जोशी



कु. यशोधरा भालेराव



कु. मेधा पारखी



कु. गीता नाईक



दीपक महेर




कु. नीला वैद्य



दिलीप जोगळेकर



रमण सोळंकी



प्रभाकर भडकमकर

## प्रथमवर्ष शास्त्र : प्रथम श्रेणी



प्रकाश सेवेकरी



रवींद्र जोशी



कु. संजीवनी साने



किरण शिंदे



नीतीन गांधी



संजय साठे



अरुण मुळूर



प्रदीप दातार



कु. मंगलप्रभा पवार



श्रीराम ठकार



अब्दुलगनी सय्यद



प्रमोद ळाळे

# ज्ञानपिपासू प्राध्यापकाचा अस्त

प्रा. प. स. चिरपुटकर

दुर्दैवाची गोष्ट आहे की, ज्या सहकाऱ्याच्या एखाद्या अपूर्व ग्रंथावर परीक्षण किंवा प्रस्तावना लिहून शाबासकी द्यायची संधी आली असती, त्याच्या अकल्पित मृत्यूनंतर त्याच्या फक्त आठवणी लिहायची वेळ येत आहे. तो आमचा सहकारी म्हणजे आमच्या गणित विभागातील प्राध्यापक अश्विनीकुमार पुरुषोत्तम फडके. जन्म दिनांक ४ आक्टोबर १९४८ आणि मृत्यू दि. २ जुलै, १९७३. म्हणजे केवळ २४ वर्षांचे आयुष्य. फडके मॉडर्न महाविद्यालयात गणित विषयाचे लेक्चरर म्हणून १५ जून १९७२ रोजी रुजू झाले. त्यांचा आणि आमचा सहवास केवळ एका वर्षाचा. तरीही त्यांच्या अकस्मात निधनाने आम्ही सर्वजण बधिर झालो आहोत इतके ते आम्हाला या अल्पसहवासातच प्रिय झाले होते.

प्रा. फडके यांनी विद्यार्थिदशेत दाखविलेले नैपुण्य आणि मिळविलेली पारितोषिके यांची माहिती याच अंकात अन्यत्र दिलेली असल्यामुळे ती येथे सविस्तर देत नाही. त्यांचे शालेय शिक्षण नूतन मराठी विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण एम्. ई. एस्. महाविद्यालयात (म्हणजे सध्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयात) झाले. शाळेत आणि महाविद्यालयात एक कुशाग्र बुद्धीचा विद्यार्थी म्हणून ते शिक्षक व प्राध्यापकवर्गात प्रिय होते. १९७० साली ते पुणे विद्यापीठातून गणित विषय घेऊन एम्. एस्सी. परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्या परीक्षेत त्यांनी 'लोकमान्य टिळक पारितोषिक' आणि 'इंडियन मॅथेमॅटिकल कॉन्फरन्स गोल्डन ज्युबिली, पूना प्राइझ' अशी दोन पारितोषिके पटकावली. कुशाग्र बुद्धिमत्ता आणि अविरत अभ्यास करण्याची सवय यामुळे ते शाळेत आणि महाविद्यालयात एक नाणावलेले विद्यार्थी होते असे त्यांचे सहाध्यायी सांगताना आढळतात.

एम्. एस्सी. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते कलकत्त्यास 'कॉम्प्युटर कोर्स' करण्याकरता गेले होते. त्यानंतर काही काळ नाशिक येथे सरकारी नोकरीत होते. पण त्या कामात त्यांचे मन रमेना. त्यांचा पिंड होता अभ्यासकाचा व ओढ होती शिक्षणक्षेत्राची, त्यामुळे गेल्या वर्षी आमच्या महाविद्यालयात आल्यावर त्यांना कमालीचा आनंद झाला. घरच्या लोकांना व मित्र-परिवारात ते ही गोष्ट वारंवार बोलूनही दाखवत.

प्रा. फडके आमच्यामध्ये आले आणि त्यांच्या अंगी असलेल्या एकेक गुणाचा आम्हाला प्रत्यय येऊ लागला. संगीत, नाट्य, ललित-साहित्य, लेखन, खेळ वगैरेमध्ये ते रस घेत. कामात तर कमालीचा रेखीवपणा आणि नेटकेपणा होता. त्यांच्यावर एखादे काम सोपवले की ते उत्कृष्ट होणार असे आम्ही गृहीत धरून चालत असू. त्यांच्या शांत सुस्वभावाचा आणि सुसंस्कृत मनाचा आम्हाला वारंवार प्रत्यय येई. असे म्हटले जाते की, मनाचा सुसंस्कृतपणा ज्या प्रमाणात वाढत जातो, त्या प्रमाणात शब्दातील कठोरपणा कमी होतो, त्यात सौम्यता येते, मृदुता येते. प्रा. फडके यांच्या बाबतीत हे सर्वस्वी खरे होते. गणित विभागाच्या बैठकांच्या वेळी एखादी सूचना करताना 'मग सर आपण असं केलं तर नाही का चालणार?' अशी सुरुवात करून ते आपले म्हणणे मांडीत.

सहकाऱ्यांच्या अडचणी जाणून स्वतः होऊन मदत करणे हा त्यांचा आणखी एक गुणविशेष. आमच्या विभागातील सहकाऱ्यांच्या कामांचा भार हलका करण्यासाठी जशी ते मदत करीत तशीच मदत ते इतर विद्याशाखांतील किंवा विभागातील प्राध्यापकांनाही करण्यास सदैव तयार असत. इतर विषयांच्या अनेक प्राध्यापकांची आणि त्यांची चांगली मैत्री होती यावरून त्यांच्या मनमिळाऊ स्वभावाची कल्पना येते. त्यांच्या इतर सर्व मित्रांचा अनुभवही असाच आहे.

काही व्यक्तींना निसर्गतःच चांगले व्यक्तिमत्त्व लाभलेले असते. प्रथम दर्शनात त्यांचा लोकांवर प्रभाव पडू शकतो. पण त्या चांगल्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच इतर गुण अंगी नसले अगर बाणवून घेतले नसले तर तो प्रभाव फार काळ टिकू शकत नाही. याउलट काही व्यक्तींकडे प्रथमदर्शनात दुसऱ्यावर छाप पडेल असे व्यक्तिमत्त्व नसते. पण उपजत गुणांमुळे आणि अंगी बाणवून घेतलेल्या गुणांमुळे अस-

सहवासातच त्यांचा इतरांवर प्रभाव पडू लागतो. प्रा. फडके यांचा समावेश दुसऱ्या वर्गात करावा लागेल. सुवाच्य अक्षर, जबरदस्त व्यासंग, परिपूर्ण अभ्यास, कुशाग्र बुद्धी आणि विद्यार्थ्यांचे भले व्हावे ही सदैव तळमळ या गुण-विशेषांमुळे सर्व विद्यार्थिजगतावर (आणि प्राध्यापक-वर्गावरही) त्यांचा प्रभाव पडलेला होता. ते आपला विषय अगदी सुलभ करून शिकवत; सोप्या सोप्या पद्धतीने उदाहरणे सोडवून देत. दिवसभराचे काम झाल्यावर संध्याकाळीही विद्यार्थ्यांनी . गणितातल्या अडचणी वगैरे विचारल्या तर कधीही कंटाळा न करता सोडवून देत.

गणिताबरोबरच इतर विषयांतही त्यांना बराच रस होता. ते चांगले वाचक होते. वाचन, मनन, निरीक्षण इ. मुळे पुष्कळ गोष्टींबद्दल त्यांची मते निश्चित झालेली होती. त्यांच्याशी नानाविध विषयांवर बोलणे म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच होती. मतांना निश्चितता असूनही चर्चेत त्याबद्दल त्यांनी कधीही दुराग्रह दाखवला नव्हता. आपली मते निश्चित असताही दुसऱ्यांच्या मतांबद्दल योग्य आदर दाखविणे हा विवेक त्यांच्या ठिकाणी होता.

विज्ञानानेच जीवनातील बहुतेक सर्व प्रश्न सुटतील असे त्यांचे ठाम मत होते. त्याच विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणातून सर्व समस्यांची उकल करण्याविषयी त्यांचा आग्रह असे. एरवी शांत व सौम्य दिसणाऱ्या आमच्या या सहकाऱ्याला अशा चर्चेच्या वेळी काहीसा आवेश चढे आणि या सर्व चर्चेतून एक गोष्ट नेहमीच प्रगट होत असे, ती म्हणजे, या शांत डोळ्यांमागे असणाऱ्या मनात विचारांचे वादळ चालू आहे. जीवन समजावून घेण्यासाठी, नावीन्याच्या शोधासाठी मनात धडपड चालू आहे.

या धडपडीतूनच त्यांनी आपला व्यासंग चालू ठेवला होता. अगदी परवाच्या 'मे' महिन्यातील गोष्ट. बरेच दिवसांनी त्यांची आणि माझी गाठ पडली होती. 'सिनेमा, नाटक कुठली बघितली' वगैरे बोलणे झाल्यावर मी सहज विचारले "काय फडके! हल्ली नवीन वाचन वगैरे काय?" तर फडक्यांचे त्याला उत्तर: "सध्या मी श्रीधर व्यंकटेश केतकरांचं चरित्र वाचतोय. मराठीतला पहिला ज्ञानकोश तयार करणाऱ्या या माणसाचं काम, जिद्द इत्यादींबद्दल मला बरेच दिवस कुतूहल होतं म्हणून वाचतोय."

खूपदा असे वाटते की या ज्ञानपिपासेखातर त्यांनी आपल्या प्रकृतीची हेळसांड केली, निदान प्रकृतीकडे दुर्लक्ष तरी केले. तसे जर झाले नसते तर या अत्यंत बुद्धिमान व मनमिळाऊ प्राध्यापकाचे मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांना बरीच वर्षे मिळू शकले असते.

२ जुलै. तो दिवस सोमवार होता. वेळ रात्रीची होती. मी नुकताच झोपेच्या आधीन झालो होतो. इतक्यात बाहेरून काही प्राध्यापकांच्या हाका ऐकू आल्या. दार उघडून बाहेर आलो. अन् प्रा. फडके यांच्या निधनाची बातमी कळली. संध्याकाळीच मी प्रा. फडके यांची प्रकृती पाहण्यासाठी जहांगीर नर्सिंग होममध्ये जाऊन आलो होतो. तेव्हा प्रकृती ठीक नसली तरी बरी होती. मी चेतनाहीनच झालो त्यांच्या निधनाची बातमी ऐकून. प्राचार्य लिमये यांच्याकडे आम्ही गेलो. त्यांना घेऊन मग आम्ही 'वैकुंठ' स्मशान-भूमीत गेलो. रात्री साधारणतः १२॥ वाजण्याच्या सुमारास त्यांचा पार्थिव देह 'विद्युत्-दहन भूमी' मध्ये नेण्यात आला. विद्युत्‌दहनयंत्रावर तो ठेवण्यात आला. दार बंद करण्यात आले. 'काळाच्या पडद्याआड जाणे' या शब्द-


College Students' Famous

**Hotel Moti Mahal**

(Vegetarian Restaurant)

Opp : Deccan Gymkhana Post Office, Poona 4

प्रयोगाचे विलक्षण प्रकारे प्रत्यंतर येत होते. आम्ही कुणीच काही बोलत नव्हतो. सर्वत्र भयाण शांतता होती. येत होता तो फक्त विद्युत्-यंत्राचा आवाज. तो कर्कश आवाज आमची काळजे कापत होता. विमनस्कपणे आम्ही परतलो. वारंवार मनात एकच प्रश्न उभा राहतो, 'देणे ईश्वराचे' या कोटीतील बुद्धिमत्ता असलेल्या या आमच्या सहकाऱ्याला आमच्यातून इतके अचानक आणि अकाली उचलून नियतीने साधले तरी काय ?

### प्रा. अश्विनीकुमार फडके यांचा जीवनपट

दि. ४ ऑक्टोबर १९४८ रोजी पुणे येथे जन्म.

१९६४ पुणे येथील नूतन मराठी विद्यालयातून शालान्त परीक्षा ७३% गुण मिळवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

१९६५ पुणे विद्यापीठाच्या प्री-डिग्री सायन्स परीक्षेत ७६% गुण मिळवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आणि पुणे विद्यापीठात गुणानुक्रमे नववे आले.

१९६६ पुणे विद्यापीठाची प्री-प्रोफेशनल परीक्षा ७८% गुण मिळवून उत्तीर्ण.

१९६७ मद्रास येथे भरलेल्या 'ऑल इंडिया समर इन्स्टिट्यूट फॉर मॅथेमॅटिक्स' मध्ये सहभाग.

१९६८ बी. एस्सी. परीक्षा (पुणे विद्यापीठ) ७४% गुण मिळवून उत्तीर्ण. 'बी. एस्सी' ला 'प्रोफेसर डी. डब्ल्यू. केरकर प्राईझ' चे मानकरी.
(बी. एस्सी. पर्यंतचे शिक्षण पुण्यातील एम्. ई. एस्. महाविद्यालयात झाले.)

१९७० पुणे विद्यापीठाच्या एम्. एस्सी. (मॅथेमॅटिक्स) परीक्षेत ७८% गुण प्राप्त. एम्. एस्सी. ला 'लोकमान्य टिळक प्राइझ' आणि 'इंडियन मॅथेमॅटिकल कॉन्फरन्स गोल्डन ज्युबिली, पूना प्राइझ' ही दोन पारितोषिके प्राप्त.

१९७० ते जून १९७२ कलकत्ता येथे 'कॉम्प्युटर कोर्स' नंतर नाशिक येथे सरकारी नोकरी

१५ जून १९७२ मॉडर्न महाविद्यालयात गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून काम सुरू केले.

२ जुलै १९७३ काविळीच्या आजाराने निधन.

# पेट्रोल्साठी दाही-दिशा

शाम वाघ, T. Y. B. Com.

'व्हॉईस ऑफ अमेरिका'ने १९७३ सालासाठी सर्वांत महत्त्वाच्या १० बातम्या जाहीर केल्या. त्यांत 'क्रूड ऑईलच्या किंमतीत झालेली वाढ' या बातमीस पहिला क्रमांक दिला आहे.

'क्रूड ऑईल' हे आजच्या जगाचे जीवन आहे. पेट्रोलशिवाय एकाही देशाचे, अगदी सर्वांत मागासलेल्या देशाचेसुद्धा काम होणे कठीण होऊन बसले आहे. अरब-इस्राईल युद्ध सुरू झाल्यापासूनच पेट्रोल्चा प्रश्न भरास लागला होता.

'क्रूड ऑईल' आणि त्यापासून मिळणारे 'पेट्रोल' व 'डिझेल' हे संपूर्ण जगात इंधन म्हणून वापरले जाते. या इंधनाविषयी जगाची भूक इतकी वाढली आहे, आणि इतक्या प्रचंड प्रमाणात वाढते आहे, की यावर उपाय न निघाल्यास विसाव्या शतकालाच तिसऱ्या महायुद्धाचे महासंकट पाहवयास लागेल — कसे, ते एक एक देश त्याची आकडेवारी पुढे करून सांगेल —

जगातील प्रमुख भागातील इंधनाची मागणी
(१००० मेट्रिक टन कोळश्याबरोबर)

युरोपीय आर्थिक गट :

| सन | द्रवरूप इंधन | जळणाचा गॅस | घनरूप इंधन | प्राथमिक वीज | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९७० | ६८५ | ८८ | ३६३ | ८३ | १,२१९ |
| १९८५ | १,४१० | ३८५ | २५५ | ३४५ | २,३५५ |
| % वाढ | +१०६ | +२१२ | −३० | +३१६ | +९३ |

अमेरिका :

| सन | द्रवरूप इंधन | जळणाचा गॅस | घनरूप इंधन | प्राथमिक वीज | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९७० | १०५० | ६८० | ४८० | ८० | २,२९० |
| १९८५ | १,७०० | १,१३० | ६७० | ७०० | ४,२०० |
| % वाढ | +६२ | +६६ | +४० | +७५५ | +८३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जपान : | | | | | |
| १९७० | २९० | ५ | ९० | २५ | ४१० |
| १९८५ | ७६० | १० | १०५ | १७५ | १,०५० |
| % वाढ | +१६२ | +१०० | +१७ | +६०० | +१५६ |
| सर्व देश : | | | | | |
| १९७० | २,६८५ | १,२१५ | २,४१५ | ३८५ | ६,७०० |
| १९८५ | ७,०५० | ३,४५० | ३,२०० | २,२५० | १५,९५० |
| % वाढ | +१६३ | +१८४ | +३३ | +४८४ | +१३८ |

( पेट्रोलियम प्रेस सर्व्हिस )

वरील तक्त्यावरून वाढत्या मागणीची उत्तम कल्पना येते. १३८% वाढ, पृथ्वी आरपार खोदूनही पूर्ण करणे शक्य नाही. एक एक देशाचा विचार केला असता परिस्थिती जास्त स्पष्ट होईल.

अमेरिकेला तिच्या सध्याच्या गरजेपेक्षा ८५% इंधन जास्त लागणार आहे. ( १९८५ मध्ये ). अमेरिका सध्या फक्त १२% इंधन आयात करते; ते ३०% वर जाईल. अर्थात बाहेरून पुरविले गेले तर! अमेरिकेत 'क्रूड ऑईल' असल्यामुळे आणि सैनिकीदृष्ट्या ते एक बलाढ्य राष्ट्र असल्यामुळे अमेरिकेत हा प्रश्न तितकासा तीव्र ठरत नाही. अर्थात हे सुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच लागू आहे.

सध्याच्या इंधन तुटवड्याचा सर्वात जास्त फटका बसलेला देश म्हणजे जपान. जपान आणि युरोपातील काही देश १९७२ साली १८,००० बॅरल क्रूड ऑईल आयात करीत होते. १९८० मध्ये ही मागणी ३०,००० बॅरलपर्यंत जाईल. आत्तापर्यंत जपानची आयात संपूर्णपणे मध्य-पूर्व आशिया-वर अवलंबून होती. आता मध्य-पूर्व देशांनी अमेरिके-सारखे 'मोठे सावज' पकडल्यामुळे जपानला आपसूकच 'इंडोनेशिया'सारख्या देशाकडे आपला मोर्चा वळवावा लागला आहे पण हे चिमुकले राष्ट्र जपानला फक्त २० ते २५% सहाय्य करू शकेल.

इंग्लंडची स्थिती तर पूर्वीपासूनच अस्थिर बनलेली आहे. सध्या इंग्लंडमध्ये चालू असलेला 'तीन दिवसांचा आठवडा' इंधन तुटवड्याचे सर्वाधिक भयाण रूप आहे.

फ्रान्स आणि इटली यांनी सर्व वस्तूंच्या किमती गोठवण्याचे धाडस दाखविलेले आहे. परंतु, इंधनाने निर्माण केलेल्या २००,००० लायर ( Lire ) च्या तोट्यामुळे इटलीला काहीतरी नवीन उपाय शोधणे भागच आहे.

पश्चिम जर्मनीच्या सरकारने तेल उत्पादकांना किमती वाढविण्यास परवानगी दिली आहे आणि भारताप्रमाणेच 'गॅसोलिन'वर जुलै १९७३ मध्ये प्रचंड कर बसविले आहेत. आधीच किमती वाढल्यामुळे चलन फुगवटा निर्माण होतो आहे आणि त्यात जर या कराद्वारे गोळा केलेल्या पैशाची भर पडली, तर चलन फुगवट्याला जोरच चढेल.

भारताच्या दृष्टीने विचार केला, तर भारताची परिस्थितीसुद्धा इतरांसारखीच म्हणावी लागेल. ३ नोव्हेंबर १९७३ ला भारतात पेट्रोलच्या किमतीमध्ये ७०% वाढ झाली, आणि नंतर परत ३० पैसे, प्रत्येक लिटरमागे वाढले. ही वाढ ५ रु. ( लिटरला ) पर्यंत किंवा त्यावर देखील जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या किंमत वाढीचा जास्तीकरून 'मोटर-ड्राव्ह'साठीच उपयोग होईल; परंतु इथून पुढे मिळणाऱ्या तुटपुंज्या तेलाचा जास्तीत जास्त योग्य उपयोग होण्याच्या दृष्टीने हे पाऊल योग्यच आहे, असे म्हणावे लागेल.

एकाचा तोटा म्हणजे दुसऱ्याचा फायदा हे समीकरण या बाबतीतही लागू पडते. अरब राष्ट्रांनी आणि इराणने आपल्या नैसर्गिक साठ्याचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचे ठरविलेले आहे. एका अर्थशास्त्रज्ञाने असे नमूद केले आहे की, १९८० साली जगातील परदेशी चलनाच्या ८५% चलन तेल पुरविणाऱ्या अरब राष्ट्रांकडे असेल आणि अरबांची लोकसंख्या आहे जगाच्या फक्त १ टक्का!

सध्याची कुठलीही आर्थिक-पद्धती या परिस्थितीला लागू पडणे केवळ अशक्य आहे.

या अरब राष्ट्रांनी दुपटीपेक्षा जास्त किमती वाढविलेल्या आहेत. सर्व राष्ट्रे, अगदी अमेरिकेसकट, 'अडला हरी' बनली आहेत, आणि त्यामुळे प्रत्येकाला प्रचंड प्रमाणात परदेशी चलन द्यावे लागणार आहे. अमेरिकेची तेलाची आयात २३ हजार डॉलर्सवरून १८० ते २४० हजार डॉलर्सपर्यंत जाईल ( १९८० पर्यंत ), तर जपानला ३१ हजार डॉलर्स ऐवजी १२० ते १६० हजार डॉलर्स मोजावे लागतील. यातील जवळ जवळ निम्मे, एकट्या 'सौदी अरेबिया'च्या घशात जाणार आहेत! अरब राष्ट्रांनी जर त्यांचे धोरण असेच ताठर ठेवले, तर लवकरच सार्वत्रिक आर्थिक संघर्ष सुरू होईल.

अर्थात, कुठल्याही प्रश्नाला उपाय शोधून काढणे हे मानवाच्या गुणधर्मातच आहे. युद्धाची धमकी, हा या

प्रश्नावर शेवटचा उपाय म्हणता येईल. त्याशिवाय जे उपाय सुचविता येतील ते असे.

( अ ) अरब राष्ट्रांच्या धोरणाचा विचार जरी बाजूला ठेवला, तरी तेलाचा एकूण तुटवडा लक्षात घेता, पेट्रोलचे 'नियंत्रित वाटप' करणे, सर्व देशांमध्ये आवश्यक ठरते – विशेषतः जपान आणि इंग्लंड यांनी ही पद्धत सध्या अवलंबिली आहे. अमेरिकेतसुद्धा लौकरच हे 'रेशनिंग' 'गॅसोलिन'साठी सुरू होणे अपरिहार्य आहे.

( ब ) गरज ही शोधाची जननी आहे, असे म्हणतात; तेव्हा आता दोन प्रकारच्या शोधांची तीव्रतेने गरज भासते —

( १ ) प्रत्यक्ष क्रूड ऑईलची

( २ ) 'क्रूड ऑईल'ला पर्यायी ठरेल अशा दुसऱ्या इंधनाची. ह्या बाबतीत, तेल आयात करणाऱ्या सर्व राष्ट्रांनी एकत्रित स्वरूपाचे प्रयत्न करणे अधिक फायदेशीर ठरेल. अमेरिकेत सूर्यशक्ती आणि 'synthetic carbon'च्या स्वरूपात याची सुरुवात झालेली आहेच.

( क ) संघटना आणि सहकार्य ही दोन तत्त्वेसुद्धा तेल आयातीच्या बाबतीत उपयोगी ठरणारी आहेत. OPEC [ Organization of Petrol Exporting Countries ]च्या धर्तीवर तेल आयात करणाऱ्या देशांनी एकत्र येऊन संघटना स्थापन करणे सर्वांच्याच दृष्टीने फायदेशीर आहे.

भारताला 'कोळसा' हा एक मोठा आशेचा किरण आहे. 'कोळश्याच्या' बदली 'क्रूड ऑईल' द्यायला इराण तयार आहे, त्याचप्रमाणे भारत स्वतः क्रूड ऑईल-ऐवजी 'कोळसा' वापरू शकेल. अर्थात मोटरींच्या संख्येवर आणि वापरावर निर्बंध आणणे ही गोष्ट कुठल्याच उपायाखाली सुटत नाही.

'क्रूड ऑईल' हे खते तयार करतानासुद्धा वापरले जाते; म्हणजेच, त्याचा आपल्या अन्नाशीसुद्धा संबंध आहे. साऱ्या जगाला हलवून सोडणारे हे 'तेल' कदाचित स्वतःच पेटून 'तिसऱ्या महायुद्धा'ला अग्नी देण्याचा संभव आहे. तेव्हा लोकहो, या तेलात तुमच्या हातून काडी पडणार नाही याची काळजी तुम्ही घ्यायलाच हवी.

# लेसर

दीपक माधवराव पढेर, प्रथम वर्ष शास्त्र

शस्त्र आणि शास्त्र यांना सांधणारा दुवा [ Light amplification By stimulated Emission of Rediation ]. अणुशक्तीच्या शोधाने भौतिकशास्त्रातील एक अद्भुत आणि महत्त्वाचे दालन उघडले गेले, आणि शास्त्रज्ञांना विश्वाचे एकचतुर्थांश कोडे उलगडल्यासारखे वाटले. अणुशक्तीनंतर बऱ्याच काळानंतर भौतिकशास्त्राचे अजून एक दालन उघडले गेले आणि त्याच्या झगझगाटाने शास्त्रज्ञ अक्षरशः दिपून गेले. त्याचा प्रकाश खरोखरच शास्त्रज्ञांना दिशा दाखवणारा होता. गेली अकरा वर्षे प्रकाश म्हणून ओळखल्या जाणारा हा शोध म्हणजे एक प्रकारचे किरणच होत. "लेसर" किरण.

गेल्या दशकभर ह्या किरणांनी आपली उपयुक्तता मानवाला पटवून दिली. या किरणांमध्ये अशी काही जादू आहे की, त्यांनी कॅन्सर या रोगाला असाध्य रोगांच्या यादीमधून कॅन्सल केले आहे. वज्रालादेखील कापता येईल इतकी अफाट अशी शक्ती या किरणांमध्ये आहे. डोळ्यांचे नेत्रपटल सांधण्यासाठी त्याचा उपयोग होऊ लागला आहे. उंची व खोली यांचा अचूक अंदाज घेण्यासाठी त्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. रेडिओ, टेलिफोन व तारसंदेश यांच्या पुनःप्रसारणात यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे.

शास्त्रामधील या शोधाने साहजिकच मानवाची पातळी उंचावली आहे. मात्र हा विधायक शोध विध्वंसकही आहे. पृथ्वीवर असलेल्या दुसऱ्या टोकावरील कोणत्याही देशाचा नाश या किरणांनी करता येतो. त्यामुळे पुढील युद्धात प्रकाशयुद्धेच होतील असे एका शास्त्रज्ञाचे भाकीत आहे. इतकेच काय पण शत्रुपक्षाचे अवकाशयान पृथ्वीवर बसल्या बसल्या कोणालाही पत्ता लागू न देता भस्मीभूत करता येईल. त्याच्या विनाशकारी उपयोगाची पूर्वसूचना संशोधक

चार्ल्स् टाऊन्स व ऑर्थर स्कालो यांनी दिली होती.

लेसरची मूळ कल्पना कोलंबिया विद्यापीठाचे डॉ. चार्ल्स् यांची. त्यांनी १९५१ साली अतिशय सूक्ष्म संवेदनावृद्धी (amplification) करणारे मसिर नावाचे एक उपकरण तयार केले. त्यात त्यांनी माणिक या रत्नाची सळई वापरली. त्याच वेळीं त्यांनी असे सुचविले की प्रकाशलहरीदेखील त्या सळइने वृद्धिंगत करता येतील, पण प्रत्यक्षात १९६० साली ह्युजेस एअरक्राफ्ट कंपनीचे डॉ. थिओडोर मैमान यांनी जगातील पहिला लेसर तयार केला.

लेसरच्या शोधाचा उगम डॉ. आइनस्टाइनच्या काही प्रमेयावर आधारला आहे. लेसरचा आत्मा म्हणजे सुसूत्रित प्रकाश (coherent light). आपण ज्याला प्रकाश म्हणतो तो म्हणजे जांभळ्या रंगापासून लाल रंगापर्यंतच्या कंपनसंख्या असलेल्या विद्युत्–चुम्बकीय लहरी (Electromagnetic waves) असतात आणि त्या सर्व दिशांत पसरू शकतात पण लेसरच्या प्रकाशात जवळ-जवळ एकच कंपसंख्या असलेल्या लाल रंगाच्या लहरीचा समावेश होतो. लाखो मैल प्रवास करूनदेखील हे किरण समांतरच राहतात.

लेसरची रचनादेखिल फार सोपी आहे. मध्यभागी माणकाची (क्रोमियम धातुमिश्रित पारदर्शक अल्युमिनियम ऑक्साइड) सळई साधारण चार इंच लांबीची असते व तिच्याभोवती झेनॉन लॅम्पचे वेटाळे. बस. एवढी साधी रचना. माणकाचे सळइचे बैठकीत बसवलेले टोक आतल्या बाजूने पूर्ण चकचकीत आणि बाहेरील टोक अर्धचकचकीत असते.

झेनॉनपासून निघालेला एखादा पांढरा प्रकाशकिरण माणकाच्या सळईत शिरून तीत असलेल्या क्रोमियम धातूच्या अणूवर आदळतो. त्या वेळी त्या किरणात असलेल्या सातही रंगांची शक्ती क्रोमियम अणूत शिरते. आणि तो अणू उत्तेजित होतो. अशा रीतीने नेहमीपेक्षा बरीच शक्ती असलेला उत्तेजित (exited) क्रोमियम अणू परत मूळ पदावर येण्यासाठी एकापेक्षा अधिक लाल रंगाचे किरण सोडतो. त्या सर्व किरणांची पुढे प्रत्येकी एका क्रोमियम अणूशी गाठ पडते आणि पहिल्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊन आणखी किरण बाहेर पडतात. एकाच किरणातून आणखी किरण निर्माण होण्याची ही साखळी-क्रिया (chain reaction) सतत चालू राहते. सळईच्या वरच्या टोकापासून अर्धवट परावर्तित झालेले व खालच्या टोकापासून पूर्णपणे परावर्तित झालेले किरण माणकाच्या सळईत शिरून प्रकाशकिरणांचे जनन सुरू करतात व लाखो किरणांची उत्पत्ती होते. ही एकाच किरणाची मूळ कहाणी. असे लाखो किरण झेनानमधून निघतात व कोटयवधी किरणांचे जनन होते. हे किरण अत्यंत सुसूत्रित समान्तर व अत्यंत प्रखर असतात. हे किरण म्हणजे अगदी बाल्यावस्थेतील लेसर किरण होत.

लेसरच्या उपयोगाबद्दल बोलावयाचे झाले तर संपूर्ण एक जाड पुस्तकच तयार करावे लागेल.

वैद्यकीय शास्त्रात लेसर किरणांनी आशेचा प्रकाश निर्माण केला आहे. कॅन्सरच्या गाठीवर लेसर किरणांचा मारा करून त्यांना जाळून टाकता येते. रोग्याला कोणताही त्रास होऊ न देता, लेसर किरणांनी निरोगी रक्तपेशींवर

Phone : 58931

*With Best Compliments From—*

**Hotel Vishwa**

**Boarding & Restaurant**

Opp : municipal Sports Club

Near Saras Baug, Vijaynagar Colony, Poona 30

**Prop : S. A. Hegade**

काहीही परिणाम होत नाही. लेसरच्या उपयोगाला ३५ टक्के यश लाभले आहे. थोड्या वर्षांनी एक काळ असा येईल की, शस्त्रक्रियेत चाकू-कात्र्यांऐवजी लेसर किरणांचा उपयोग केला जाईल. त्यामुळे जखमही लवकर भरून येते.

लेसर किरणांचा सर्वांत आश्चर्यकारक उपयोग आता अंतराळ आणि संदेशवहनक्षेत्रात होऊ लागला आहे. अंतराळवीर चंद्रावर "लेसर परावर्तक" नावाचे यंत्र बसवून येतात. केवळ एका किरणात १० लाखाहून अधिक रेडिओ संदेश व टी. व्ही. कार्यक्रम प्रसारण करण्याची शक्ती असते. मायक्रो वेव्हजपेक्षाही लेसर श्रेष्ठ आहेत, कारण त्यांचे प्रसारण गुप्त ठेवू शकता येते. चंद्राच्या कालमंडलेल्या भूमीला लेसर किरणांच्या साहाय्याने प्रकाशित करण्याचा यशस्वी प्रयोग अमेरिकेत केला आहे. रडार म्हणूनही लेसर किरणांची कामगिरी प्रशंसनीय आहे.

त्रि-मिती (Three Dimensional) छायाचित्रे काढण्यासाठी त्याचा मोठया प्रमाणात उपयोग होतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही छायाचित्रे भिंगा अथवा कॅमेऱ्याच्या मदतीविना काढली जातात. म्हणून 'त्रि-मिती' छायाचित्रे काढण्याच्या कलेला फोटोग्राफी नव्हे तर 'होलोग्राफी (Holography)' म्हणतात. अशा प्रकारे लेसर मानवाच्या दिमतीला अजून १२ प्रकारे राहू शकेल. अनेक शास्त्रांतील गूढे उलगडण्यासाठी लेसरचा उपयोग होतो म्हणूनच त्यांना "Solution in Search of Problem" या नावाने संबोधण्यात येते.

लेसरच्या शोधावर आजवर अमेरिकेत २४ कोटी रु. खर्च झाले. परंतु तरीही तो शोध अजून बाल्यावस्थेत आहे. परंतु शास्त्रज्ञांना विश्वास आहे की, सुसूत्रित शोधाद्वारे लेसरच्या उपयोगाने रात्रीचा दिवस करता येईल.

काहीही असो ते दिवस आता दूर नाहीत की जेव्हा आपण लेसर टेलीफोनने संभाषण करीत असू व घरच्या दिव्यांऐवजी लेसरच्या दिव्यांच्या प्रकाशात असू. लेसर माणसाचे भविष्य उज्ज्वल करील यात शंका नाही, परंतु त्याचा विधायक कार्यात उपयोग केला तरच.

# क्रिकेटमधील पहिले-वहिले

माधव आपटे : प्रथम वर्ष विज्ञान

(१) क्रिकेटच्या इतिहासामधील पहिल्या शतकाची नोंद इ. स. १७६९ मध्ये सापडते. त्या वेळेस ड्यूक ऑफ डॉरसेट संघ व सेव्हन ओकस् ह्या संघामधील सामन्यामध्ये ड्यूक ऑफ डॉरसेट संघातर्फे मिनशल् ह्या खेळाडूने १०७ धावा काढल्याचे नमूद केले आहे.

(२) क्रिकेट कसोटी सामन्यांमधील पहिले शतक १८७७ साली मेलबोर्न येथे ऑस्ट्रेलियाच्या सी. बॅनरमनने इंग्लंडविरुद्ध झळकाविले. तेव्हा त्याने १६५ धावा काढल्या. तो जखमी झाल्यामुळे निवृत्त झाला.

(३) दोन्ही डावांत एकाच खेळाडूने शतक केल्याची नोंद १८१७ सालामध्ये सापडते. ससेक्स कौंटीतर्फे इप्सम संघाविरुद्ध डब्ल्यू. लँबर्ट ह्या खेळाडूने हा मान पटकाविला. तेव्हा त्याने पहिल्या डावात १०७ धावा काढल्या तर दुसऱ्या डावात त्याने १५७ धावा फटकावल्या. हा विक्रम त्याने क्रिकेटची मक्का लॉर्डस् येथे केला.

(४) कसोटी सामन्यांमध्ये दोन्ही डावांमध्ये शतक फटकविणारा खेळाडू म्हणजे ऑस्ट्रेलियाचा डब्ल्यू. बार्डस्ले हा होय. त्याने इंग्लंडविरुद्ध ओव्हल येथे १३६ व १३० धावा काढून हा मान १९०९ मध्ये पटकाविला.

(५) क्रिकेट जाणणाऱ्याला, ऐकणाऱ्याला "गुगली" चेंडू परिचित असतो. गुगली म्हणजे लेगब्रेकच्या आविर्भावात टाकलेला ऑफब्रेकच. गुगलीचा जनक म्हणजे इंग्लंडचा बी. जे. टी. बोसानक्वेट. त्याने गुगलीचा उपयोग प्रथमतः इ. स. १९०० मध्ये केला. तेव्हा त्याने लेसिस्टरच्या एस्. कोे. चा बळी घेतला. ही घटना क्रिकेटची मक्का लॉर्डस् येथे झाली.

(६) क्रिकेटमधील प्रथम दर्जाच्या पदार्पणाच्या सामन्यामध्येच दोन्ही डावांमध्ये शतक झळकविणारे दोघे-

जण आहेत. एकजण ऑस्ट्रेलियाचा ऑर्थर मॉरिस होय. ह्याने १९४०–४१ च्या मोसमामध्ये न्यू साऊथ वेल्सतर्फे पदार्पण करताना क्वीन्सलँड विरुद्ध सिडने येथे १४८ व १११ धावा फडकाविल्या. हा विक्रम करणारा दुसरा फलंदाज म्हणजे भारताचा नरी कॉन्ट्रॅक्टर होय. त्याने गुजराथतर्फे बडोद्याविरुद्ध १९५२-५३ च्या मोसमामध्ये पदार्पण केले; तेव्हां त्याने बडोदा येथे १५२ व नाबाद १०१ धावा केल्या.

(७) एकाच डावामध्ये ११ षट्कार मारणारे खेळाडू : भारताचे कर्नल सी. के. नायडू यांनी १९२६–२७ च्या मोसमामध्ये पाहुण्या एम्. सी. सी. संघाविरुद्ध हिंदूंतर्फे ११ षट्कार मारून १५३ धावा केल्या.

"वाथ" येथील ग्लुस्टरशायर विरुद्ध सॉमरसेट सामन्यात सीजे बार्नेट याने १९४ धावा केल्या. (इ. स. १९३४ मध्ये).

रिची बेनॉने १९५३ साली स्कारबरो येथे पीअर्सच्या संघाविरुद्ध ऑस्ट्रेलियातर्फे ११ षट्कार मारून १३५ धावा केल्या.

(८) कसोटी सामन्यात थोडक्या वेळात शतक फडकविणारे खेळाडू –

(i) १९२१–२२ च्या मोसमामध्ये जे. एम्. ग्रेगरीने जोहान्सबर्ग येथे ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिका ह्यांच्यामधील सामन्यात अवघ्या ७० मिनिटांमध्ये शतक फडकाविले.

(ii) १९०२ मध्ये जी. एल्. जेसपने इंग्लंड-ऑस्ट्रेलिया सामन्यात ओव्हल येथे ७५ मिनिटांमध्ये शंभर धावा पुऱ्या केल्या.

(iii) ऑस्ट्रेलियाच्या रिची बेनॉने वेस्ट इंडिज विरुद्ध किंग्स्टन येथे १९५४–५५ च्या हंगामामध्ये ७८ मिनिटांमध्ये शतक पुरे केले.

(iv) जे एच्. सिंक्लेअरने द. आफ्रिका–ऑस्ट्रेलिया सामन्यात १९०२–३ मध्ये केपटाऊन येथे ८० मिनिटांमध्ये शतक झळकाविले.

(v) एस्. जे. मॅकेबने द. आफ्रिका-ऑस्ट्रेलिया सामन्यात १९३५–३६ मध्ये जोहान्सबर्ग येथे ९१ मिनिटांमध्ये शतक फडकावले.

(९) क्रिकेटमध्ये आतापर्यंत सर्वात जास्त बळी यॉर्कशायर कौंटीच्या विल्फ्रेड ऱ्होडस् ह्या डावखोऱ्या फिरकी गोलंदाजाने घेतले. त्याने आपल्या १८९८ पासून १९३० पर्यंतच्या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीमध्ये फक्त १८·०५ ह्या सरासरीने ४१८७ बळी घेतले. शेवटच्या हंगामामध्ये त्याने २०·४२ च्या सरासरीने ४२ बळी घेतले.

(१०) Heavy Cricketers : डर्बीशायर कौंटीचा डब्ल्यू. फोल्के हा सर्वात "वजनदार" क्रिकेटपटू होता. त्याचे वजन ३२२ पौंड होते. त्याच्याशी स्पर्धा करू पाहणारा क्रिकेटपटू म्हणजे ऑस्ट्रेलियाचा डब्ल्यू. आर्मस्ट्राँग होय. तो ३०८ पौंडांचा होता. क्रिकेटचे भीष्माचार्य डब्ल्यू. जी. ग्रेस हे देखील ह्या स्पर्धेकरिता उमेदवार होते. ते २५२ पौंड होते. नुकतेच डोळ्यावरील अपघातामुळे निवृत्त झालेले इंग्लंडचे कॉलीन मिल्बर्न हे देखील २५६ पौंड आहेत.

(११) अशक्य वाटणाऱ्या गोष्टी अनेक वेळा फलंदाजांचा सम्राट डॉन ब्रॅडमन याने शक्य करून दाखविल्या आहेत. तीन अष्टकांमध्ये (२४) चेंडूंमध्ये शतक ही अशक्य वाटणारी गोष्ट ह्या फलंदाजाच्या सम्राटाने शक्य करून दाखविली.

तेव्हाचे त्याच्या धावांचे कोष्टक :
पहिले अष्टक — ३३ धावा,
६, ६, ४, २, ४, ४, ६, १
दुसरे अष्टक — ४० धावा,
६, ४, ४, ६, ६, ४, ६, ४
तिसरे अष्टक — २७ धावा,
६, ६, ०, १, ४, ४, ६

(१२) प्रथम दर्जाच्या क्रिकेट सामन्यात सर्वात अधिक धावा कराचीतर्फे भावलपूरविरुद्ध हनिफ महंमदने ४९९ धावा काढल्या. ५०० वी धाव घेण्याच्या प्रयत्नात तो धावबाद झाला. हा विक्रम त्याने १९५८–५९ च्या मोसमात कराची येथे केला.

त्या खालोखाल डॉन ब्रॅडमनने स्थान मिळविले. त्याने १९२९–३० च्या हंगामात 'न्यू साऊथ वेल्सतर्फे क्वीन्सलँडविरुद्ध सिडने येथे नाबाद राहून ४५२ धावा टोलल्या. पुनश्च १९३५–३६ मध्ये ३६९ धावा केल्या.

तिसरे स्थान महाराष्ट्राच्या भाऊसाहेब निंबाळकरचे आहे. महाराष्ट्रातर्फे काठेवाडी संघाविरुद्ध १९४८-४९ मध्ये विक्रमी ४४३ धावा नाबाद राहून केल्या. तेव्हा पुढे क्षेत्ररक्षण करण्यास काठेवाडच्या संघनायकाने नकार देऊन भाऊसाहेब निंबाळकरांना डॉन ब्रॅडमनबरोबर धावा करण्याचा मान मिळू दिला नाही.

अधिक धावा करणारे इतर खेळाडू —

विली पॉन्सफोर्ड (ऑस्ट्रेलिया) :

| | |
|---|---|
| ४२९ | १९२२-२३ |
| ४३७ | १९२७-२८ |

ए. सी. मॅक्लॅरेन (इंग्लंड) :

| | |
|---|---|
| ४२४ | १८९५ |

सी. डब्ल्यू. ग्रेगरी :

| | |
|---|---|
| ३८३ | १९०६-७ |

(१३) शतकांचे शतक करणारे खेळाडू —

| | |
|---|---|
| जॅक हॉब्ज | १९७ शतके |
| इ. हेन्ड्रेन | १७० ,, |
| वॉली हॅमंड | १६७ ,, |
| सी. इ. मीड | १५३ ,, |
| हर्बर्ट सटक्लिफ | १४९ ,, |
| फ्रॅंक वुली | १४५ ,, |
| लेना हटन | १२९ ,, |
| डब्ल्यू. ग्रेस | १२६ ,, |
| डेनिस कॉम्प्टन | १२२ ,, |
| डॉन ब्रॅडमन | ११७ ,, |

# भातुकली

कु. लता कुबेर, तृ. वर्ष वाणिज्य

आज सकाळपासून उगाचच विषण्ण वाटत होतं. कशातच मन रमत नव्हतं. हे ऑफिसला गेले होते आणि नितूही शाळेत गेला होता. मी रेडिओचं बटण दाबून Weekly वाचत पडले. पण त्यातही लक्ष लागेना. एवढ्यात मला आरडाओरडा ऐकू आला. मी चटकन दार उघडून बाहेर आले. समोर दृष्टी टाकली आणि...माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आज कित्येक वर्षांनी मी उमेशला पाहात होते, वेड्याच स्वरुपात! उमेश हातात एक बाहुली घेऊन कुबडीच्या मदतीने असहाय्यपणे उभा होता. फाटलेले कपडे, वाढलेले दाढीचे खुंट. हातातल्या बाहुलीशी काहीतरी बोलून हसत होता. मराठी शाळेतली मुलं त्याला चिडवत होती, दगड मारत होती आणि त्याची बाहुली हिसकावून घेण्याचा प्रयत्न करत होती. सुशिक्षिततेचा आणि सभ्यतेचा बुरखा घेतलेली, पण अंतःकरणानं बुरसटलेली काही माणसं हा सारा जीवघेणा प्रकार निःस्तब्धपणे पाहात होती. ते दृश्य असह्य होऊन मी धावत तेथे गेले आणि त्या मुलांना हाकलवून दिलं. उमेशनी माझ्याकडे कृतज्ञतापूर्वक पाहिलं आणि तो धाय मोकलून रडू लागला. कदाचित ओळखीचे माणूस भेटल्यामुळे त्याच्या गतस्मृती जाग्या झाल्या असाव्यात. मी त्याला म्हटलं, "उमेश, अरे पुष्कळ दिवसांत तू नितूला भेटला नाहीस. केवढा मोठा झालाय तो. चल ना, घरी तुझ्या लाडक्या भाच्याला भेटायला."

त्याचा चेहरा उगाळला. क्षणभर त्यानं माझ्याकडे पाहिलं आणि हातात तोंड लपवून विजेसारखा क्षणार्धात नाहीसा झाला. कदाचित इतके प्रेमळ शब्द त्याने कित्येक वर्षांत ऐकले नसावेत. तो गेलेल्या वाटेकडे पाहात असतानाच माझ्या डोळ्यांसमोर पंधरा वर्षांपूर्वीचा प्रसंग अगदी आजच घडल्यासारखा दिसू लागला. त्या वेळी

नुकतेच लग्न होऊन मी सासरी आले होते. ह्यांची बदली कोल्हापुरास झाली. आम्ही आमचा नवा स्वतंत्र संसार सुरू केला. बंगलेवजा चार स्वतंत्र खोल्या मिळाल्यामुळे कुणाचाच कुणाशी संबंध येत नव्हता. एकदा हे सकाळी कामावर गेले की, दिवसभर मी एकटीच असायची. वेळ जाता जायचा नाही. अशीच मी एक दिवस दारात उभी असताना माझी नजर समोर गेली. समोरच्या खेळण्याच्या छोटया दुकानाजवळ ती उभी होती. फ्रकर-पोलके घातलेली व छोटया भावाचे बोट धरून उभी असलेली दहाबारा वर्षांची ती मुलगी मला फार आवडली. दुकानात असाच एक चौदापंधरा वर्षांचा मुलगा खेळणी तयार करत होता. ती क्षणात त्याच्या भरभर चालणाऱ्या हाताकडे तर क्षणात त्याच्याकडे कुतूहलाने पाहात होती. एकदम त्यानेही वर पाहिले, दोघांची नजरानजर झाली; बालमनं जुळली गेली. केव्हा संध्याकाळ झाली कळलेही नाही. अंधार पडताच ती निघून गेली. पण जाताना सारखी मागे वळून पाहात होती. बहुतेक 'उद्या येईन हं!' असं आश्वासनच तिच्या नजरेत असावं.

आणि खरंच ती रोज येऊ लागली. रोज त्याचं काम पाहात राहायची. ती दोघं एकमेकांशी कधीच बोलताना मी पाहिलं नाही. मलाही त्यांचं ते मूक, निरागस प्रेम पाहण्याचा छंद जडला होता. पाहता पाहता अशीच दोनतीन वर्षे निघून गेली. आणि नितूचा जन्म झाला. आता ती दोघेही बरीच मोठी झाली होती. एक दिवस काम करत असताना वरची फळी घेण्यासाठी तो उठला आणि तिला धक्काच बसला. आपण पाहात आहोत ते स्वप्न की सत्य याचा तिचा तिलाच भ्रम पडला. सगळी स्वप्निल दुनिया क्षणात उद्ध्वस्त झाली. कारण... कारण तो लंगडा होता. त्या धक्क्यातून तिनं लगेच स्वतःला सावरलं. तो लंगडा आहे हे समजल्यामुळे तिला त्याच्याबद्दल अधिकच ओढ वाटू लागली. ती आता त्याला त्याच्या कामात मदत करू लागली. आपण लंगडे आहोत हे कळूनही ती आपल्यावर प्रेम करते आहे हे समजल्यावर त्याच्या मनातील चिंता नष्ट झाली. आणि दोघेही मजेत राहू लागली. त्यांनी स्वतःच निर्माण केलेल्या विश्वात.

ती घरातली सर्वात मोठी मुलगी असल्यामुळे तिच्यावरती अनेक जबाबदाऱ्या होत्या. ती एका फर्ममध्ये टायपिस्ट म्हणून नोकरी करू लागली. वडील रिटायर्ड झालेले. धाकट्या दोन बहिणी आणि दोन भाऊ. मोठा भाऊ लग्न करून केव्हाच वेगळा झालेला. आईवडिलांचं आपल्यावर काही ऋण आहे आणि ते आपण फेडलं पाहिजे; हे विचारही त्याच्या मनात येत नव्हते. आईवडील आणि भावंडंही त्याच्या दृष्टीने मेल्यातच जमा होती. त्यामुळे घरात मिळवणारी अशी ही एकटीच होती. त्यामुळे वडीलही तिच्या लग्नाबद्दल बोलत नसत. एक दिवस वडलांना तिच्या प्रेमासंबंधाची बातमी समजली आणि घरात भांडणं सुरू झाली. तिच्या वडलांनी लग्नाला स्पष्ट नकार दिला. दरमहा ३५० रु. मिळवणारी निर्जीव बाहुली घालविण्यास त्यांची तयारी नव्हती. आपल्या घरून या लग्नाला इतका कडक विरोध होईल असं तिला स्वप्नातही वाटलं नव्हतं. उलट हुंड्याविना ब्याद गेली म्हणून वडील सुटकेचा निश्वास टाकतील अशीच तिची समजूत होती. पण झालं उलटंच.

आता काय करावं हा तिच्यापुढं मोठा प्रश्न होता. क्षणात भावंडांचे केविलवाणे चेहरे तिला जाऊ नको म्हणत होते तर क्षणात तिच्याविना ज्याचं आयुष्य पांगळं आहे असा उमेश तिला बोलावत होता. विचार करून डोकं फुटेल की काय असं तिला वाटू लागलं. उमेशला तिने सर्व प्रकार सांगितला. उमेश माझ्याकडे आला. नितूमुळे त्याचं आमच्याकडचं येणं-जाणं वाढलं होतं. त्याने मला सर्व खुलासा केला आणि काय करू असं विचारलं. त्याच्यात लपलेला कलाकार मला पूर्ण माहिती होता. जर तिनं त्याला नकार दिला तर तो कलाकार मरून जाईल याची मला पूर्ण जाणीव होती. मी प्रयत्न करून बघते असं मी त्याला सांगितलं. तो गेल्यावर मी तिला बोलावून घेतलं. तिला सर्व समजावून सांगितलं आणि तू करते आहेस हे पाप नाही याची तिला जाणीव करून दिली. होकार किंवा नकार काहीच न सांगता ती निर्विकार चेहऱ्यानं निघून गेली. बहुतेक तिला माझं सगळं म्हणणं पटलं असावं, पण तसं मान्य करण्याचं धाडस तिला झालं नसावं.

हिनं नकार दिला तर उमेशचं काय होईल हाच प्रश्न मला पुनःपुन्हा सतावत होता. चार दिवस निघून गेले. मी उमेशच्याच भवितव्याचा विचार करत असताना उमेश धावत आला. विजयाचा केवढा आनंद होता त्याच्या चेहऱ्यावर. भराभर त्यानं सगळं सांगून टाकलं, "ताई, अग तिनं होकार दिला. आम्ही आठ दिवसांत पळून

जाऊन लग्न करणार आहोत, पण तुला मात्र यावं लागेल हं! माझी मोठी ताई म्हणून आणि आमच्या लग्नाची पहिली साक्षीदार म्हणून!" मला खूप आनंद झाला. आपण एका बुडणाऱ्या जीवाला आधार देण्याच्या कामी थोड्यातरी उपयोगी पडलो याचं मला समाधान वाटलं. उमेश आनंदात निघून गेला आणि याचा हा आनंदी चेहरा अखंड असाच राहू दे अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून मी कामाला लागले.

दोन दिवस निघून गेले. मी मंडईतून घरी येत होते. तिच्या वाड्यासमोर बरीच गर्दी दिसली म्हणून पुढे जाऊन पाहिलं आणि सगळा रस्ता माझ्याभोवती गरगर फिरू लागला. तिरडीवर तिचं प्रेत बांधलं होतं. असं कसं झालं! माणसाचं जीवन इतकं क्षणभंगुर असू शकतं! दैव इतके क्रूर फासे कसे टाकू शकतं! एखाद्याच्या स्वप्नाळू दुनियेला आग लावण्याचा देवाला तरी काय अधिकार आहे! उमेशचं आता कसं काय होणार? नाना प्रश्न मला भेडावून सोडू लागले. विचारांच्या तंद्रीत मी उभी होते. लोकांची कुजबूज कानावर पडत होती.

"अहो पोस्टमार्टेममध्ये विष सापडलं म्हणे! तिनंच बापाच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केलेली दिसते."

"छे हो, तसं नसावं, तिच्या वडिलांना हे लग्न पसंत नव्हतं तेव्हा त्यांनीच कशावरून अन्नातून काही-तरी...(!)"

मला पुढचं बोलणं ऐकवेचना. मी धावत घरी आले.

दुकान बंद होतं. उमेशला ही बातमी कळली असावी की नसावी? काहीच समजेना. १०–१५ दिवस मला तो दुकानात दिसला नाही. कुणीतरी बोलत होतं ते उडत उडत कानावर आलं.

"अहो इथे खेळणी करत बसायचा तो लंगडा नाही का? उमेश वेडा झाला म्हणे (!) बाहुली घेऊन हिंडत असतो. आपण आता लवकर लग्न करू हं—मी खेळण्यांचा मोठा कारखाना काढीन—नाही नाही मला सोडून जाऊ नकोस गं—मला खूप मोठं व्हायचंय असं असंबद्ध काहीतरी बरळत असतो म्हणे."

"काय हे वेड! ती मेली तर दुसरी बघायची. तिच्या-साठी एवढं वेडं व्हायला काय झालं?"

त्या लोकांची मला कीव करावीशी वाटली. मला त्यांना ओरडून सांगावसं वाटलं की, फक्त स्वतःपुरतं पाहणारे तुम्हीच वेडे आहात, स्वार्थी आहात. उमेश आपणा सर्वांपेक्षा शहाणा आहे. जो स्वतःचं अस्तित्व विसरून एखाद्यावर इतकं प्रेम करू शकतो तो वेडा असूच शकत नाही. त्याला समजावून घेण्यास असमर्थ असणारे आपण सगळेच मूर्ख आहोत, वेडे आहोत.

जोरात हॉर्न वाजला आणि मी क्षणात भानावर आले. एक खेळ सुरू होण्यापूर्वीच संपला होता. माझ्या आयुष्यातलं एक पर्व आणि मी पाहिलेली दोन अलौकिक जीवनं केव्हाच संपली होती. मी जड अंतःकरणानं घरी परत आले.

रेडिओवर गाणं लागलं होतं,

'भातुकलीच्या खेळामधले राजा आणिक राणी,

अर्ध्यावरती डाव मोडला अधुरी एक कहाणी!'

माझ्या नकळत दोन अश्रू ओघळले, दोन शापित जीवांसाठी.

With Best Compliments From :—

**Ramesh Cloth Stores**

**Deccan Gymkhana, Poona-4.**

Specialists for :—

School Uniforms Cloth, Various Varities in Matching Blouse-Pieces

Huge Qualities.

# एक अनामिका—जया भादुरी

**वसंत वागडे : द्वि. व. वाणिज्य**

चित्रसृष्टीत मोजक्या चित्रपटात काम करून अभिनयाची झलक दाखविणारे कलावन्त फारच थोडे आहेत. त्यांपैकी एक अनामिका म्हणजे 'जया भादुरी' होय.

एका पत्रकाराची मुलगी असूनही तिने अभिनयाचा शिक्षणक्रम पुरा केला असे जरी असले तरी इतर चित्र तारकांप्रमाणे बयास निर्मात्यांकडे धाव घेण्याऐवजी निर्मात्यांनाच तिच्याकडे धाव घ्यावी लागली हे विशेष होय. विशेषतः सध्याच्या चित्रतारकांमध्ये आघाडीची नायिका म्हणून तिला ओळखले जाते; हे जरी खरे असले तरी आजच्या अल्लड तरुणीचे प्रतिनिधित्व करणारी जया म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

सर्व प्रथम जया 'गुड्डी' ह्या चित्रपटाच्या प्रकाशनानंतर प्रसिद्ध झाली हे खरे कारण. गुड्डीतील शाळकरी परंतु सिनेमावेडी तरुणीची भूमिका करताना तिचे चेहऱ्यावरील हावभाव आणि तिने त्या भूमिकेशी एकरूपतेने केलेले काम पाहताना खरोखर ती धर्मेंद्रसारख्या तरण्याबांड नटाशी सिनेमात काम करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या अनेक तरुणींपैकी एक होय असा भास होतो. परंतु प्रत्यक्षात तिचे ते स्वप्नच ठरते. त्यानंतर तिला प्रकाशात आणणारा चित्रपट राजश्रीनिर्मित 'उपहार'. हाही चित्रपट चित्रसृष्टीत खळबळ माजविणाराच ठरला. अर्थातच तिने अभिनयाचा उपहार देऊन आपले चित्रपटातले स्थान निश्चित केले. परंतु त्या चित्रपटातील असमंबस अल्लड तरुणीची व्यक्तिरेखा मात्र प्रेक्षकांच्या चष्म्यातून सुटू शकली नाही. क्षणात हसणे, क्षणात गंभीर होणे किंवा रडणे जितकं सोपं तितकंच अभिनयाच्या दृष्टीने कठीण असते. परंतु मुळातच कलेची व अभिनयाची देणगी असलेली जया मात्र सहजतेने ही किमया करून जाते. म्हणूनच तर मनोजकुमारसारख्या उत्कृष्ट नटाने तिला आपल्याबरोबर 'शोर'मध्ये काम करण्याची संधी देऊन तिच्यातील कलागुणांना शोर गाजविण्याची संधी दिली. इतकेच काय 'एक नजर'मध्ये तर तिने कमालच केली. अमिताभ बच्चन सारख्या नटास 'एक नजर'मध्ये घायाळ केले; व आपल्या अभिनयसामर्थ्यावर तिने त्याच्याबरोबर जंजीरमध्ये काम केले; परंतु नुसते काम केले नाही तर त्याच्या जीवनाची ती स्वतःच जंजीर बनली. अर्थात अमिताभ व जया दोघेही विवाहबद्ध झाले; इतके सारे झाले तरी विशेष सध्याच्या तरुणींचा आवडता राजेश खन्ना ह्या आघाडीचा हीरो ह्याच्या बरोबरही तिने बावर्चीमध्ये बरोबरीने काम केलेले आहे. परंतु स्वतःचा परिचय मात्र तिने 'परिचय' या चित्रपटातील भूमिकेवरून सर्व प्रेक्षकांना करून दिला आहे. संजीवकुमारच्या मुलीची भूमिका त्यातील तिचे कसब खरोखर उल्लेखनीय आहे. परंतु असे जरी असले तरी तिचा खरा परिचय होतो तो 'कोशिश'मध्ये. कोशिशचीही नायिका अबोल आणि बहिरी असूनदेखील संजीवकुमार बरोबर तिने अभिनयाची खरी परीक्षा दिली. त्यातूनच त्यांच्या मूक व बहिऱ्या पत्नीची भूमिका साकार केली.

एकंदरीत पाहता सध्या नुकताच गाजत असलेला 'अनामिका' हा चित्रपटही संजीव व जया ह्या जोडीच्या अभिनयाचा एक उत्कृष्ट नमुना होय. तरीदेखील अनामिकेच्या भूमिकेशी एकरूप झालेली जया प्रत्येक चित्रपटात वेगवेगळ्या प्रकारे भूमिका करून आपले अनामिकेतील व्यक्तिमत्त्व कायम ठेवते. ह्याचे कारण एकच. ते म्हणजे प्रत्येक भूमिका समजून त्या भूमिकेशी स्वतः समरस होणे हे होय. म्हणूनच की काय अमिताभ बच्चनसारख्या नटाने तिच्याशी विवाहबद्ध होऊनदेखील तिला चित्रपटात कामे करण्यास पूर्णतः मुभा दिलेली आहे. तरी देखील तिने आपल्या मर्यादा न ओलांडता आणि शरीराचे प्रदर्शन न करता आजपर्यंत जे नाव व कीर्ती चंदेरी दुनियेत मिळविली हे तिच्या उज्ज्वल यशाचे कारण असू शकणार नाही काय?

तरी देखील 'अभिमान'सारख्या चित्रपटात आपल्या पतीबरोबर काम करून स्त्रीच्या स्वाभिमानाची झलक दाखवून तिने अभिमानाने राहून चित्रसृष्टीतील आपले स्थान उच्च स्तरावर टिकविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

# आमचे शेजारी

उमेश जोशी, पदवीपूर्व वाणिज्य

तिनिसांजेची कातरवेळ! मधूनच चिमण्यांचा चिवचिवाट ऐकू येई. एखादी मोटार जोराने हॉर्न वाजवीत जाऊन वातावरणातील शांतता मध्येच नष्ट करी तेवढेच. एवढी संध्याकाळची वेळ असूनही रेडिओवर मात्र नित्याप्रमाणे "पहाटेच्या या प्रहरी म्हणा हरी हरी" म्हणून ध्वनिमुद्रिका लागली होती. असे काहीसे विचित्र वातावरण होते. "संध्याकाळच्या वेळी लक्ष्मी घरात येते" असे पूर्वी म्हणत असत. अशा वेळी मात्र गोदरेजची दाराला लटकलेली कुलपे लक्ष्मीचे स्वागत करायला उभी होती तर काही ठिकाणचे बंद दरवाजे जणू लक्ष्मीला "प्रवेश बंद" म्हणून म्हणत होते. सहज एकदा बंगल्यावर नजर टाकली तर बंगल्याचे नाव "तृप्ती" हे काहीसे माझ्याकडे पाहून विचित्र हसत आहे असे वाटत होते. शेजारी-पाजारी नकोत म्हणून स्वतंत्र असा सुशिक्षित सभ्य वस्तीत बंगला बांधला होता. पण येथे मात्र शेजारी नाहीत म्हणून बरे वाटण्याऐवजी वाईटच वाटत होते. पूर्वी वाड्यात शेजाऱ्यांच्या समवेत घालवलेले एक-एक दिवस डोळ्यासमोर नाचू लागले. त्यात थोडाफार त्रास असला तरी एक प्रकारचे समाधान होते. आनंद होता. हे आता जाणवू लागले...

मला आठवतोय् तो दिवस! आम्ही वाड्यात त्या वेळी राहायला येणार होतो. जागेमध्ये हळू-हळू सामान आणू लागलो. सामान बरेच होते. हळूहळू वाड्यातील लहान-मोठी मुले जमली व आम्ही काही सांगायच्या आत एक एक सामान आत आणून आमच्या खोलीत नेऊन ठेवू लागली. आई कौतुकाने त्यांच्याकडे पाहत उभी होती. तेवढ्यात मला एकदा तिने टोला मारलाच, "बघ तुझ्या-एवढीच ती मुले पण कसे काम करत आहेत, नाहीतर तू ढोंब्या! इकडची काडी तिकडे करायला नको." आईच्या म्हणण्याने काहीसा वैतागूनच एक मोठा बोजा उचलून मी जाऊ लागलो. पण वाटेतच माझा पाय घसरला व चक्क धडपडलो...पायाला थोडेफार लागले. पण आमच्या वाड्यातील सेवातत्पर यमूताई लगेच हळद घेऊन पायाला लावण्यासाठी आल्या. हळूच पुटपुटल्या देखील, "काय बाई आहे! एवढ्याशा मुलाला का एवढी ट्रंक उचलायला सांगायची." अर्थात हे वाक्य माझ्या आईला उद्देशून होते. वाड्यात राहण्याची सुरुवात व शेजाऱ्यांनी केलेले स्वागत तरी असे झाले.

हळूहळू वाड्यात रमत होतो मी. मॉडर्न हायस्कूलमध्ये जायचो. पण शेजारच्या चंदूला काही त्या शाळेत प्रवेश मिळाला नव्हता, म्हणून त्याची आई खवचटपणे माझ्या आईला म्हणायची, "आहे बुवा वशिला!" असे थोडे-फार कुत्सित उद्गार रोजच ऐकू येत.

शेजारच्या विमलाबाई वाड्यामध्ये सगळ्यांत 'श्रीमंत' होत्या. त्यामुळे त्या जरा तोऱ्यात राहात. त्यांना वाटायचे आपले 'कौतुक' सर्वांनी करावे. एखादी नवी साडी आणली की दुपारच्या वेळी सगळ्या वाड्यातल्या बायकांना आग्रहाने बोलावीत व "साडी पुराण" एक तासभर तरी चाले. मग आलेपाकाच्या वडीचा अर्धा तुकडा प्रत्येकीच्या हातावर ठेवीत असत.

एकदा असेच दुपारी त्या आमच्या घरी आल्या व म्हणाल्या, 'रवी जरा तुमचे सूप देतोस का?' तशा नेहमीच त्या सूप मागायला येत. मला नेहमी आश्चर्य वाटायचे. ह्यांच्याकडे रेडिओ, गॅस, गोदरेज इ० किंमती वस्तू आहेत मग साधे एक रुपयाचे 'सूप' घ्यायला ह्यांना कसे परवडत नाही? त्यामुळे मी विमलाबाईंना उगीचच म्हटले "काय हो तुमचा रेडिओ २०० ते ३०० रुपयापर्यंतचा असेल नाही?" लगेच त्या म्हणाल्या, "छे! रे! चांगले ७५० रुपये दिले आहेत. ह्यांनी मुद्दाम किंमती पण चांगला घेतला रेडिओ!" 'मी हो का' म्हणून म्हटले. मग "बाबासाहेबांना (त्यांच्या मिस्टरांना) माझा एक निरोप सांगाल का," म्हणून विचारले "काय रे! सांगीन की!" त्या म्हणाल्या. मी म्हणालो, "त्यांना म्हणावं आता एक १॥–२ रुपयापर्यंत किंमती सूप आणून टाका. म्हणजे आमच्याकडे तुम्हांला सारखे यायला नको." हे ऐकताच रागाने त्या चडफडत निघून गेल्या. पण वाड्यात मात्र

मी खूप उद्धट आहे म्हणून बघ्रा करायला त्या विसरल्या नाहीत.

सगळ्या शेजाऱ्यांच्या बरोबर सामुदायिक भेट होण्याचा कार्यक्रम म्हणजे नळावर पाणी भरण्याचे वेळी. एकदाही बोलाचाली झाली नाही असा एकही दिवस गेला नसेल. शेजारच्या देशपांड्यांच्याकडे कायम पाहुणे असायचे म्हणून त्या नंबरामध्ये घुसून पाणी भरत तर आज आमच्या सुधाला पाहायला येणार आहेत म्हणून समोरच्या आपटे-बाई मध्येच लुडबूड करीत असत. तुझा नंबर येईपर्यंत तुमची बादली कपडे धुवायला घेते म्हणून आठवलेबाई बादली घेऊन पसार होत, आणि पाणी गेल्यावर साबणाने बरबटलेली बादली तशीच परत करीत. कधी कधी नंबरावरून खटके उडत. कोणाची श्रीमंती बाहेर निघे. एखाद्याच्या लफड्याची माहिती त्याच्यातूनच बाहेर पडे.

एक दिवस दुपारी शाळेतून मी घरी आलो. तो शेजारच्या विमलाबाई आईला सांगत होत्या. तुमच्या निमाकडे लक्ष द्या हो. काल चक्क एका माणसाचा हात धरून लक्ष्मी रोडने चालली होती. आई संतापली. एवढ्यात मी रागाने बाहेर आलो. म्हणालो, "बरं का, विमलाबाई, निमाताईंच्या जागी तुम्ही असतात तर तुम्हीदेखील त्याचा हात धरला असतात बरं का!" रागाने त्या माझ्याकडे पाहात राहिल्या. पण मग मीच म्हणालो, "अग आई, शाळेजवळ एक आंधळा तरुण बसतो त्याचा हात धरून निमाताईने त्याला रस्ता क्रॉस करून दिला तर त्यात काय बिघडले?" हे ऐकताच विमलाबाई मुकाट्याने निघून गेल्या. वारंवार हे असे चाले.

नाही म्हणायला वाड्यात गणपती उत्सव, मात्र सार्व-जनिक रीतीने व्यवस्थित पार पडे. आणि तसे थोडे चांगले लोकही होते. माडीवर राहणारे आप्पासाहेब मात्र फार चांगला माणूस होता. तो सर्वांचा तंटा मिटवीत असे. माझी अन्याय सहन न करण्याची वृत्ती त्यांनी ओळखली होती. ते जरी लोकांसमोर मला रागावले तरी सहज नंतर म्हणून जात. "अशीच सर्वांवर माया कर. पण आरडाओरडा न करता, गोड बोलून दुसऱ्याचे दोष दाखव." अर्थात त्यांच्या वचनाने मी सुधारलो.

हळूहळू आमच्या बंगल्याचे बांधकाम पूर्ण झाले. आम्ही वाडा सोडून जायचे निश्चित केले. शेजाऱ्यांनी प्रेमाने निरोप दिला.

नेहमी दुःस्वास करणाऱ्या विमलाबाईंना गहिवरून आले. नेहमी बादली मागणाऱ्या आठवलेबाईंनी आम्हाला प्लॅस्टिकची बादलीच भेट दिली, तर आपटेबाई त्यांच्या सुधासाठी आमचे योग्य स्थळ म्हणून पाहू लागल्या. पण आप्पासाहेब मात्र एवढेच म्हणाले, "तू एक गोष्ट चांगली केली नाहीस. एवढ्या मोठ्या बंगल्यात एकही बिऱ्हाड ठेवले नाहीस. एखादा तरी शेजारी हवाय."

आज या कातरवेळी ते म्हणणे पटत होते. एखादा तरी शेजारी हवाच. इतक्यात बाहेरून आई परतली व म्हणाली, "अरे ऐकलंस का, उद्यापासून माडीवरच्या दोन खोल्यांत गोखल्यांचे बिऱ्हाड यायचे आहे." हे ऐकताच मला आनंद झाला. संध्याकाळची कातरता नष्ट झाली व उद्या येणाऱ्या नव्या शेजाऱ्याचे स्वागत कसे करायचे याचा विचार मी करू लागलो.


Witn Best Compliments From

**Archem Laboratories**

Chimanbag, Poona 30

# होय, ही अमेरिका आहे !

विजय रतिलाल पीर, प्रथम वर्ष शास्त्र

एका कडेला सूक्ष्मातिसूक्ष्म परमाणू आणि दुसऱ्या कडेला अमर्यादित विश्व. या दोहोंचा आणि त्यांमधील असंख्य वस्तूंचा शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये अमेरिकन लोकांचा फार मोठा वाटा आहे. चंद्रावर प्रथम पाऊल ठेवले ते अमेरिकेनेच (नील आर्मस्ट्रॉंग) आणि ३७,८०० फूट खोल पाण्यात जाऊन 'पाताळनगरी' पाहणारी देखील पहिली अमेरिकाच (जॉर्ज पिकोर्ड)! ही झाली नाण्याची पहिली बाजू. आता तिच्या दुसऱ्या बाजूचे अवलोकन करू या.

अमेरिका हा देश विस्ताराने जरी मोठा असला तरी जगाच्या एकूण लोकसंख्येच्या शेकडा ६ इतकेच लोक त्याचे नागरिक आहेत. इतके असूनही जगाच्या एकूण खर्चापैकी ४० टक्के खर्च एकट्या अमेरिकेत केला जातो.

'मोटारीचा देश' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देशात ७० सेकंदांत एक मोटार तयार होते, आणि देशातील ४ मोटारींमागे १ मोटार अपघातात सापडलेली असते. १९०० ते १९६९ पर्यंत झालेल्या मोटार अपघातात बळी पडलेल्या 'हुतात्म्यां'ची संख्या आहे १८॥ लाख!

अमेरिकेत दर १९ मिनिटांनंतर एक प्राणघातक आणि दर ८ सेकंदानंतर एक सामान्य अपघात होतो. ज्यामुळे वर्षाकाठी १ लक्ष १९ हजार लोक आपल्या प्राणाला मुकतात आणि ४ लाख लोकांना अपघाताची आयुष्यभर टिकणारी एखादी खूण राहते.

१९६९ च्या अहवालानुसार रहदारीतून झालेल्या अपघातांमुळे ५६ हजार लोक ठार झाले आणि ४६ लक्ष लोकांना इजांवरच समाधान मानावे लागले. प्राणहानीशिवाय वैद्यकीय देखभाल, उत्पन्नाचा अभाव (हात, पाय इ. मोडल्याने नोकरी तसेच व्यवसाय न करू शकल्यामुळे झालेले नुकसान), मोडतोड यांमुळे आर्थिक दृष्ट्या १६,५०,००,००,००० डॉलर्सचे नुकसान झाले.

दरवर्षी एक कोटी इतके वाहन परवाने दिले जातात. आणि अमेरिकेच्या रस्त्यावर धावणाऱ्या १ कोटी १० लक्ष वाहनांमुळे वातावरणात प्रतिवर्षी १ कोटी २० लक्ष टन हायड्रोकार्बन आणि ६६ लक्ष टन कार्बन मोनॉक्साइड या जहरी वायूची भर पडते.

दर आठवड्याला ६ लक्ष ५० हजार नागरिकांना तेथील २०,००० इतक्या ट्रॅफिक कोर्टामध्ये निष्काळजीपूर्वक वाहने चालविल्याबद्दल गुन्हेगार म्हणून बोलाविले जाते. एकट्या शिकागो न्यायालयातच दरवर्षी १,६०,००,००० डॉलर्स दंडाच्या रूपाने एकत्र केले जातात.

दरवर्षी ७० लाख मोटारी आणि दहा कोटी टायर्स निकालात काढले जातात.

प्रत्येक तासाला चोरीचे ४०० गुन्हे होतात. वर्षात १२ हजार खून होतात. एकट्या वाशिंग्टनमध्ये हे प्रमाण वर्षाला २४९ आहे.

अमेरिकेत एक वेळ माणसाला कोणी विचारणार नाही पण कुत्र्याला मात्र मानाने—सन्मानाने वागविले जाते. मालकापेक्षा त्याचेच जास्त कौतुक केले जाते. कुत्र्यांच्या खाण्यापिण्यामागेच दरवर्षी ३० कोटी डॉलर्स खर्च केले जातात.

क्रीडा, करमणूक, चैन यांच्यापायी वर्षाकाठी १५० कोटी डॉलर्सची होळी होते. नुसत्या चित्रपट तिकिटांच्या विक्रीमुळेच एक कोटी डॉलर्स मिळतात. वर्षात २३ कोटी डॉलर्सची खेळणी विकली जातात. एकट्या नाताळातच १५ कोटी डॉलर्स खेळण्यांमागे खर्च होतात.

अमेरिकेतील 'माफिया' ही गुन्हेगार टोळी जगप्रसिद्ध आहेच. त्या टोळीची स्थावर मिळकत ३०० कोटी डॉलर्स आहे. या 'भांडवलातून' ७० ते १०० कोटी डॉलर्सचा फायदा होतो. नफ्याच्या दृष्टीने पाहिले तर त्यांचा एकूण नफा अमेरिकेतील के. यु. एस. स्टील, ए. टी. ॲन्ड टी. (टेलिफोन संस्था), जनरल मोटर्स कंपनी, फोर्ड कंपनी, क्राइसलर, स्टँडर्ड ऑईल, जनरल इलेक्ट्रिक कंपनी (G. E. C.) आय. बी. एम्. आणि आर. सी. ए. या एकूण ९ कंपन्यांच्या नफ्याच्या गोळाबेरजेइतका आहे.

दरवर्षी सुमारे ८ लक्ष लोक कॅन्सर (कर्करोग) च्या उपचारासाठी इस्पितळात दाखल होतात; आणि त्यांची देखभाल, औषधे, शस्त्रक्रिया यांच्यामुळे ३ लक्ष ५० हजार

डॉलर्सचा खर्च येतो. इतके असूनही दररोज सरासरी ७०० कॅन्सरचे रोगी दगावतात. यांपैकी फुफ्फुसाच्या कॅन्सरने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या वर्षाला ६०,००० आहे. धूम्रपानामुळे हा फुफ्फुसांचा कॅन्सर होत असावा असे शास्त्रज्ञांचे मत आहे. (वर्षाकाठी प्रत्येक अमेरिकन नागरिक ५००० सीगारेट्सची राख करतो. यात स्त्रियांचा वाटादेखील वाखाणण्याजोगा आहे)

'आर्थराइटीस'—संधिवाताने ग्रासलेल्या रोग्यांची संख्या आहे १७ लाख! औषधपाण्यामागे त्यांना ४,००,००,००० डॉलर्स खर्च करावे लागतात.

रुग्णालयाच्या एका खोलीचे एक दिवसाचे सरासरी भाडे ६० डालर्स आहे. १२ कोटी नागरिक ८३ कोटी वेळा डॉक्टरांची मुलाखत घेतात. आणि गोळ्या-औषधांपायी ३५ अब्ज डॉलर्स खर्च करतात. २ कोटी ७० लाख लोक सरासरी ८·२ दिवस हॉस्पिटलमध्ये सहतात म्हणजे सरासरी खर्च प्रत्येकी ५००' डॉलर्स इतका होतो. इंजेक्शनची सुई एकदा वापरून फेकून देण्यात येत असल्याने वर्षाकाठी १२ कोटी सुयांचा वापर केला जातो.

'टक्कल' पडलेल्या लोकांचे प्रमाण जास्त आहे म्हणा की अमेरिकन लोक नकली केसांचे शौकिन आहेत म्हणा तेथे दरवर्षी बनावटी टोप घेण्यामागे ५ कोटी डॉलर्स खर्चिले जातात.

अमेरिकन नागरिकाची सरासरी आयुर्मर्यादा ७० वर्षे आहे. इतक्या कालावधित त्याला २ कोटी, ६० लक्ष गॅलन पाणी; २१,००० गॅलन पेट्रोल; १०,००० पौंड मांस अन् २८,००० पौंड दूध लागते.

अमेरिकेत दरवर्षी २० कोटी टन कागद, ३२० कोटी बाटल्या आणि ४ अब्ज, ८० कोटी पत्र्याचे डबे कचऱ्याच्या रूपाने गोळा होतात आणि तो बाहेरचा हालविण्यासाठी वर्षाकाठी २८ कोटी डॉलर्सचा खर्च येतो.

अल्कोहोलिक मद्यपानासाठी दरवर्षी २,११,००० लाख डॉलर्स खर्च केले जातात. 'पिऊन' तर्र झालेल्या ड्रायव्हर्स आणि पादचाऱ्यांमुळे प्रतिवर्षी २५,००० लोक मरण पावतात आणि आठ लाख अपघात घडून येतात. त्याच-प्रमाणे L. S. D. सारख्या भयानक मादक पदार्थांमुळे एकट्या न्यूयॉर्क शहरातच १९६९ साली २२४ तरुण (Teenagers) मृत्युमुखी पडले.

प्रत्येक नागरिक वर्षात सरासरी ७०० वेळा (स्थानिक वा अंतर्देशीय) टेलिफोन करतो. एकूण टेलिफोन्सची संख्या सुमारे ११ कोटी आहे. जगात उपलब्ध असलेल्या टेलिफोन्सपैकी निम्म्याहून अधिक टेलिफोन एकट्या अमेरिकेत आहेत.

अमेरिकेच्या 'हीन्झ' या सुप्रसिद्ध कंपनीने टेलि-व्हिजनवर प्रसारित होणाऱ्या स्वतःच्या जाहिरीतीसाठी मिनिटाला १,५०,००० डॉलर्स खर्च केले होते.

भौतिक दृष्ट्या सुखसोयींनी परिपूर्ण अशा या 'स्वर्ग-नगरीत' निद्रादेवीच्या आधीन होण्यासाठी वर्षाला ८ कोटी डॉलर्सच्या झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात.

दरवर्षी आत्महत्येचे २२ ते २५ हजार प्रकार अमेरिकेत घडतात. म्हणजे दर मिनिटामागे एक! W. H. O. या जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३०,००,००० अमेरिकन नागरिक आत्महत्येचा प्रयत्न करीत असतात.

साहित्यामध्ये शास्त्रीय पुस्तकांबरोबरच शृंगारिक पुस्तके येथे आवडीने वाचली जातात. पोस्टाद्वारे दरवर्षी अशी १० कोटी डॉलर्स किंमतीची पुस्तके विकली जातात.

अमेरिकेत ७१८० रेडिओ स्टेशन्स आणि ९१४ दूर-चित्रवाणी केंद्रे असून ती सर्वच्या सर्व खाजगी मालकीची आहेत.

Peone : 26304

*With Best Compliments From :*

**Nutan Plastics**

Mfg. of P. V. C. Plastic Presentation Novelties, Plastic files, Books and Diary covers and Polythene bags. Please Contact :
1527, Shukrawar Peth, Poona 2

## पदवीपूर्व वाणिज्य : प्रथम श्रेणी


कु. वसुधा केळकर


कु. प्रेमलता जोशी


अभय भाटे


शशांक वाघ


कु. वंदना नेर्लेकर


अशोक संकपाळ


कु. संजीवनी रांजेकर

## पदवीपूर्व शास्त्र : प्रथम श्रेणी


मुकुंद कोंडविलकर


कु. सरिता गोऱ्हे



कु. मनिला बावरा


सुहास सापटणेकर

## पदवीपूर्व शास्त्र : प्रथम श्रेणी



मोहन वेडेकर



सुहास शेटे




शिरीष लवाटे

## महाविद्यालयीन अभ्यासेतर क्षेत्रांत चमकलेले विद्यार्थी



कु. सीमा वाव्हळ
N. C. C.




रत्नाकर नवले
N. C. C.



के. एन्. पडवळ
वेट लिफ्टिंग



नंदकुमार कहाणे
कुस्ती



विक्रमादित्य शिंदे
N. S. S.



शिवाजी निम्हण
कुस्ती



सुदाम शिंदे
व्हॉलिबॉल



कु. भारती शहा
बॉल बॅडमिंटन

## क्रीडा संघटना : व्यवस्थापन समिती १९७३–७४

(Gymkhana Managing Committee)




खुर्चीवर बसलेले डावीकडून (१) प्रा. सौ. वनारसे (२) श्री. लागू (३) प्रा. महाजन (४) प्रा. रायकर (५) डॉ. भीमराव कुलकर्णी, (६) प्रा. गंभीर-कार्याध्यक्ष (७) उपप्राचार्य डॉ. गाडगीळ (८) प्राचार्य लिमये (९) प्रा. चिरपुटकर (१०) प्रा. पद्माकर आपटे, (११) प्रा. दातार (१२) प्रा. संगोराम (१३) प्रा. एम. ए. कुलकर्णी (१४) श्री. काळभोर (१५) श्री. आयना.

उभे : पहिली ओळ डावीकडून (१) श्री. कोकीळ (२) श्री. दरेकर (३) श्री. पाध्ये (४) कु. आठवले (५) प्रा. नातू (६) श्री. शिंदे (७) प्रा. जोशी, (८) प्रा. काशीद (९) प्रा. पाथरे (१०) प्रा. बर्वे (११) कु. जोशी (१२) श्री. गाडगीळ (१३) श्री. करडे (१४) श्री. बोराडे.

उभे : दुसरी ओळ डावीकडून (१) श्री. शेल्डेकर (२) श्री. असलेकर (३) श्री. लाळे (४) श्री. पवार (५) श्री. कोल्हटकर (६) श्री. शिंदे, (७) श्री. निंबाळकर (८) श्री. देसाई.

# वार्षिक स्नेहसंमेलन



विद्यार्थिप्रतिनिधी श्री. काळभोर. स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य शिवाजीराव भोसले बोलत असताना.
व्यासपीठावर प्राचार्य लिमये व मध्यभागी पुण्याचे महापौर दिवेकर, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. माधुरी साठे.

## आंतर महाविद्यालयीन खो-खो अजिंक्यपद मिळवलेला संघ



खुर्चीवर बसलेले : (१) प्रा. पद्माकर आपटे (२) श्री. लागू (३) प्रा. गंभीर, कार्याध्यक्ष (४) उपप्राचार्य डॉ. गाडगीळ
(डावीकडून) (५) प्राचार्य लिमये (६) प्रा. काशीद (७) श्री. सुनील तांबे, प्रशिक्षक (८) श्रीरंग इनामदार
(९) श्री. आयना.

उभे असलेले : (१) श्री. अनिल जगताप (२) अविनाश ओगले (३) अजय ब्रह्मे (४) मुकुंद केळकर
(डावीकडून) (५) कदम (६) अतुल जोशी (७) विनय कुलकर्णी (८) रमेश राव (९) गिरीश दंडे
(१०) पडवळ (११) अविनाश दातार.

# रघुकुलरीति सदा चलि आयी....!

कु. सुनंदा कुलकर्णी, बी. ए. प्रथमवर्ष

हरसाल रामनवमी आती है और मर्यादा पुरुषोत्तम प्रभु रामचंद्र के आदर्शों की तथा उनके कर्तव्यकठोर जीवन की याद दिलाती है। लेकिन इस वर्ष आनेवाली रामनवमी एक विशेष उत्तरदायित्व लेकर आ रही है...

इस वर्ष की रामनवमी हमें संतश्रेष्ठ महाकवि तुलसीदास के द्वारा रचित रामचरित मानस की महत्ता को समझाने के लिए आ रही है। आजसे ४०० वर्ष पूर्व इस पुराण-पुरुषने रामायण ग्रंथ की रचना की और रामनवमी के दिन उसे लिखकर समाप्त किया। इस वर्ष की रामनवमी हमें पुकारकर बता रही है कि देखिये कैसा यह अमर–काव्य है कि चार सौ वर्ष के इतिहास में उसकी लोकप्रियता कम तो हुई ही नहीं बल्कि शुक्लेन्दुवत् निरंतर बढती ही जा रही है।।

रामचरित मानस! रामचरित ने भगवान् शंकर के मानस में अटल स्थान पाने के बाद तुलसी के 'मानस' में प्रवेश किया और वहाँसे कवितारूपी निर्मल जल की स्रोतस्विनी प्रवाहित हुई और उसने न केवल उत्तर-भारत को बल्कि समूचे भारत को पावन-पुनीत एवं प्रसन्न-प्रमुदित कर दिया। रामचंद्र के चरित यह विशेषता ही है कि उसे जो कवि स्पर्श करता है उसे 'सत्कवि' की उपाधि स्वयं ही प्राप्त होती है। मैथिलीशरणजीने कहा ही है—

राम तुम्हारा चरित स्वयं ही काव्य है।
कोई कवि बन जाय सहज संभाव्य है।

फिर, तुलसीदास तो स्वभावतः ही महान् कवि थे, रामचरित के संस्पर्शसे मणिकांचन का सा योग हो गया और हरि औधजी को कहना पडा—

कविता करके तुलसी न लसे,
कविता लसि पा तुलसी की कला।

(कविता रचकर तुलसी गौरवान्वित नहीं हुए, तुलसी को पाकर कविता ही गौरवान्वित हुई।)

जबसे मैंने हिंदी का अध्ययन आरंभ किया तबसे मुझे इस ग्रंथ के बारे में एक विशेष कुतूहल था। अध्यापकजीने समय समयपर इस ग्रंथके अनेक उदाहरण और उद्धरण बताकर इसके प्रति हमारा मन आकृष्ट कर ही लिया था। मैंने इस ग्रंथ को पढ डालने का निश्चय किया। सबसे पहले मैंने 'अयोध्या-काण्ड' पढा और उसके बाद अन्य कार्यक्रमों में मैं इतनी उलझ गयी कि मेरा वह मनोरथ पूरा नहीं हो सका तथापि जो कुछ मैंने पढा उसीने मुझे इतना प्रभावित किया कि अबतक उस आनंद का अनुभव मेरे मन में तरोताज़ा है।

अयोध्या-काण्ड में भरत के चरित्र का जो चित्रण महाकविने किया है उसने मेरे मन को पूरी तरह पकड लिया। भरत की एक एक कृति में मानो भारतीय संस्कृति, कवि का मन और हम सब की भावना मुखरित हो उठी है।

With Best Compliments from :-

Ashok Speakers

Renowned for prompt and
a reliable Service
Junnarkar Datt Mandir
Laxmi Road, Poona-30

Phone : 53057

रामवनगमन की वार्ता से व्यथित भरत को प्रजाजन आग्रह करते हैं कि आप सिंहासन को स्वीकार करें और राज्य-शासन की बागडोर हाथ में लें। तब भरत सभी प्रजाजनों की एक सभा बुलाते हैं। वहाँ वसिष्ठ, सुमंत आदि सभी उपस्थित हैं। भरत पूछते हैं – "प्यारे प्रजाजनो, मैं आप की बात मानने को तैयार हूँ, लेकिन यह बताइये कि यदि मैं राम की अनुपस्थिति में राज्य का स्वीकार करूँ तो वह आपको दिल-ही-दिल में पसंद आएगा?" प्रजाजन सत्य बात कहते हैं कि नहीं हमें यह ठीक तो नहीं लगेगा। "तो फिर चलिये हम सब मिलकर रामचंद्रजी को वापस बुला लाएँगे।"

भरत निकले। वे भी 'तापस-वेष विशेष उदासी' बनकर ही निकले। बल्कल परिधान करके, नंगे पैर...!! भरत की इस 'आत्मग्लानि' ने मेरे मनपर बहुत गहरा असर कर दिया। फिर राम-भरत मिलाप का वह दृश्य जिस में मर्यादावाद, बंधुप्रेम आदि अनेक गुणविशेषों का एकत्र अनुभव मिलता है। राम भरत की बात नहीं मानते क्यों कि वे कहते हैं कि यदि मैं पिता का वचन तोड़ कर अयोध्या वापस आऊँ तो यह रसा (पृथ्वी) रसातल को जाएगी। क्यों? क्यों कि मानवों के सामने फिर क्या आदर्श रहेगा? भरत भी इस तर्क का क्या उत्तर दे सकते हैं। वे वापस लौटते हैं और राज्य चलाते हैं। लेकिन एक तपस्वी की तरह। सिंहासन पर रामचंद्र की पादुकाएँ रखकर स्वयं उस राज्य के सेवक बनकर! कैसा महान् आदर्श! कैसा आत्म संयम!

यही वह रघुकुल-रीति है। यही भारत की परंपरा है और उसी का काव्यात्मक चित्रण रामचरितमानस में हुआ है। इसी रीति की यह अखंडित परंपरा मानस-चतुःशती के इस वर्ष में और आगे आनेवाले अनेक वर्षों में हमें राम, भरत और तुलसी का स्मरण कराती रहेगी!!

## हिंदु-मुस्लिम—एक ज्वलंत प्रश्न

विक्रमादित्य शिंदे, तृतीय वर्ष वाणिज्य

हिंदु-मुस्लिम हा आजच्या युगाचा एक ज्वलंत प्रश्न असून भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनामध्ये तो महत्त्वाचा ठरलेला आहे. शेकडो वर्षे हा संघर्ष चालू असूनही त्यावर हुकमी तोड अजून सापडलेली नाही. इतकेच नव्हे तर तो प्रश्न आणखीनच चिघळत ठेवण्याचे कित्येक प्रकारचे प्रयत्न चालू आहेत.

तसे म्हटले तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा झगडा मिटविण्याचे विशेष प्रयत्न झालेच नाहीत, अन्यथा काश्मीर प्रश्न, हजरत-बाल, अलीगढ विद्यापीठ, अहमदाबाद दंगल, द्विभार्या कायदा इ. प्रश्नांवर मुस्लिमांनी रणे माजविली नसती आणि "वंदेमातरम्" वर रणे गाजविलीही नसती. म्हणूनच याबाबत राजकीय दृष्टिकोण उदास समजून सामाजिक पातळीवर प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

कित्येक वर्षांपूर्वी हिंदुस्थानमध्ये परकी मुसलमानांनी स्वाऱ्या करून भारतीय प्रदेश जिंकून ते इथेच राहू लागले. तेव्हापासूनच हिंदू-मुस्लिमांमध्ये संघर्ष सुरू झाला. "हिंदुस्थान हा पूर्वीपासूनच आमचा आहे, आमच्यावरच मुस्लिमांनी अत्याचार केले आहेत असे हिंदू म्हणतात तर "आम्ही सातशे-आठशे वर्षे सत्ता गाजविली अन् आता मात्र आमचे हाल होताहेत, वाईट वागणूक मिळत आहे" असे मुस्लीमांचे म्हणणे असल्याने ह्या दोन्ही जमातींमध्ये एकमेकांविषयी आकस निर्माण झालेला आहे.

आज या हिंदुस्थानात मुस्लिमांसारखेच खिस्ती, ज्यू, पारशी, बौद्ध धर्मांचे, जमातींचे वेगवेगळ्या विचारांचे लोक नांदत आहेत, पण त्यांच्यात कोणत्याही दोघांमध्ये हेवेदावे आढळून येत नाहीत. अस्पृश्यांचा प्रश्न जरी उपस्थित होत असला तरी तो प्रश्न फक्त हिंदूंमधील सवर्णाविरुद्ध आहे, हिंदूधर्माशी नाही. कारण अस्पृश्यांचा आणि मुस्लिमांचा लढा वेगवेगळ्या पायांवर उभे आहेत. अस्पृश्य समाज फक्त

नागरी समान हक्कांसाठी झगडतो आहे. त्यांना मानाने जगावेसे वाटते आहे; परंतु मुस्लिम जमातमात्र फार वेगळ्या रीतीने संघर्ष निर्माण करीत आहे. त्यांना नुसते समान नागरी हक्क नकोत तर "खास विशेष" हक्क हवेत. वेगळे मुस्लिम राज्य स्थापन करणे अशक्य असल्याने निदान वेगळे अस्तित्व टिकवून भविष्यात कधीतरी वेगळे राज्य स्थापन करण्याची त्यांची धडपड चालू आहे.

ब्रिटिश राजवटीत हिंदू-मुसलमानांमध्ये सख्य होते. इतकेच नव्हे तर हळूहळू त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची जाणीवही होत होती. पण हीच गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्यांना नकोशी होती. सत्ता टिकविण्याच्या हव्यासापायी ह्या दोघांना झुंजत ठेवून मजा बघायची त्यांना लहर आली होती. त्या लहरीपायीच जीवनभराचे बॅ. जीना-गांधींसारखे दोस्त क्षणभरातच वैरी झाले. इंग्रजांनी स्वातंत्र्य दिले तेसुद्धा हिंदुस्थानचे दोन तुकडे करूनच. प्रदेश विभागला गेला, पण हिंदू मुस्लिम अशी विभागणी अशक्य झाली. आणि तेंव्हापासून हा संघर्ष सतत तेवत राहिला आहे.

या प्रश्नाचे स्वरूप लक्षात घेता तो सोडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी. गेल्या सातशे-आठशे वर्षांत हा प्रश्न सुटला नाही, कदाचित या शतकातही सुटणार नाही, पण निदान त्यातील दरी कमी करणे मात्र काळाची गरज आहे. पाकिस्तान जरी आपले स्वतंत्र अस्तित्व वेगळे ठेवण्यासाठी हिंदू मुस्लिम अलग ठेवीत आहे परंतु भारतात लोकशाहीवादीसाठी हिंदू मुस्लिम अलग न ठेवता त्यांच्या एकराष्ट्रीयत्वाची व धर्मनिरपेक्षतेची भावना रुजविणे अवश्यक आहे. त्यांच्या संघर्षांची कारणे त्यांच्यापुढून पुसून गेली पाहिजेत. मूळ मनोवृत्तीत बदल करण्यासाठी प्रयत्न झाला पाहिजे.

यासाठीच भारतीय घटनाकारांनी आपल्या देशाची घटना धर्मनिरपेक्ष बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे ती कोणत्याही धर्माच्या आदेशानुसार कार्य करणार नाही. पण याचा अर्थ ही घटना अगर देश धर्मविरोधी आहे असे मुळीच नाही. उलट येथे सर्व धर्मांना, धर्मीयांना समान हक्क व दर्जा प्राप्त झालेला आहे. आपापल्या धर्माप्रमाणे त्यांना वागण्यास, त्याचा प्रचार करण्यास संपूर्ण स्वातंत्र्य आहे. पण सरकारमात्र कुठल्याही धर्मांचा पुरस्कार करणार नाही. म्हणूनच पाकिस्तान जसे इस्लामी, इस्राईल जसे यहुदी तसे भारत मात्र हिंदू राष्ट्र नाही.

अनेक धर्मांच्या आणि जातींच्या गटामधील संघर्ष मिटविण्यासाठी त्यांच्यातील श्रेष्ठता, कनिष्ठता, मतभेद इ.ना तिलांजली देऊन सर्व एकाच पातळीवर आहोत असे पटवून द्यावे लागेल. म्हणून सामाजिक व्यवहार धर्मावर अवलंबून नसावेत. शक्य झाल्यास समाजाची धार्मिक भावना नष्ट करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने 'भारतीय' हा भारतात राहणाऱ्या जनतेचा धर्म असे मानावे. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही धर्माचे अवडंबर माजवू नये म्हणजे संघर्ष आपोआपच कमी होईल.

जग बदलले आहे असे समजावून सांगण्यासाठी त्यात्या धर्मातील समाजसेवक, तत्त्वज्ञांनी, विचारवंत यांनी पुढे येऊन पुढारीपण केले पाहिजे. आज हिंदूमधील बरेच पुढारी याबाबत पुढे आहेत, पण मुस्लिमांमध्ये हमीद दलवाईसारखा फक्त एखादाच दिसेल. दुसरा दिसला तर पूर्वीच्याच नबाबशाहीत मग्न असलेला पण मुस्लिमांची चिंता नसलेला असाच असायचा. शिक्षणाच्या बाबतीतसुद्धा मुस्लिमांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. १९०१ सालच्या ६·१ टक्के वरून आज ते फक्त १० ते ११ टक्केच्या जवळपासच आहे. कारण ते आज शिक्षणाबद्दल उत्सुकच नाहीत. आपोआपच सुशिक्षित, समाजसुधारक असे लोक पुढे येऊन समाजाच्या सुधारणेची आवश्यकता पटवून देऊन त्याआड येणारे धर्माचे प्रश्न निकालात काढले पाहिजेत.

हिंदुस्थानात हिंदूच बहुसंख्य असल्याने त्यांनी 'आमचा देश' असा गैरसमज करून घेऊ नये. हिंदूंप्रमाणे येथे राहणाऱ्या मुस्लिम, खिस्ती, ज्यू, फारशी इत्यादींचा सुद्धा हा देश आहे. म्हणून सर्वांनीच आपल्या देशाचे भले होईल यासाठी प्रयत्न करायला हवेत. एकमेकांविषयी गैरसमज दूर करून समजावून घेतले पाहिजे. हिंदूंनी आपला वृथा अभिमान सोडून देऊन मुस्लिमांना जवळ करावे. कारण माणुसकीचा अवलंब करण्याशिवाय गत्यंतर नाही.

लोकशाही सरकार हे लोकांनी, लोकांचे लोकांसाठी, बनविलेले सरकार असल्याने त्यानेही एखाद्या विशिष्ट धर्माचा पुरस्कार करू नये. सर्व धर्मांना समान वागणूक द्यावी. न पेक्षा एखाद्या धर्माला वरिष्ठ-कनिष्ठ अशी वागणूक मिळाली तर ते संघर्षाला निमंत्रण ठरू शकेल. शासनातर्फे असे

कोणतेही विधी होऊ नयेत. त्यांच्यावर शासनाने बंदी घालावी.

मुस्लिम समाजाचे प्रबोधन होण्यासाठी त्यांच्याकडे पाहण्याची शासनाची व राजकीय पक्षांची दृष्टी बदलली पाहिजे. विशेषतः राजकीय पक्षांनी याबाबत जागरूक असायला हवे. कारण आज भारतातील प्रत्येक पक्ष त्या समाजाकडे फक्त 'मते मिळविण्याच्या' मुख्य हेतूने पाहात आहेत. ह्या स्वार्थी हेतूसाठी प्रत्येक पक्षाकडून आश्वासनांचा पाऊस पडूनही काही उपयोग होऊ शकत नाही. उलट भ्रमनिरास होऊन संताप निर्माण होतो. अर्थात तो आपोआपच बहुसंख्य हिंदूंबद्दल द्वेषभावना बाळगून राहतो. त्याला न्याय न मिळाल्याने गैरसमज वाढत जातात. एकंदरीत मुस्लिम समाजाकडे 'मतांचा खजिना' या दृष्टीने पाहू नये. अर्थात या निराश झालेल्या समाजानेही मुस्लिम लीगसारख्या जातीय पक्षाला बळी पडू नये. अन्यथा हा संघर्ष आणखीनच वाढत जाईल. डॉ. राम मनोहर लोहिया म्हणत, "राजकारणात मुसलमान अशी एक गोष्ट राहताच कामा नये. राजकारणात एक गट वावरणारा मुस्लिम समाज फुटला पाहिजे व हिंदूंप्रमाणे त्यांनीदेखील भिन्न भिन्न राजकीय पक्षांत गेले पाहिजे.

हे सर्व होणे जरूर आहे, मान्यही आहे आणि त्याचा कंठरवाने प्रचारही केला जात आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र सदोदित विषमताच जाणवते. ही विषमता अगर अस्पृश्यता मानणे हा गुन्हाही आहे, पण हे सगळे पुस्तकात अगर कागदावरच राहते. आजही हिंदू-मुस्लिम मित्र असले तरी ते खाणावळींमध्ये शेजारीशेजारी बसतील, पण एकमेकांच्या घरी जेवायला गेल्याचे क्वचितच आढळते. शिक्षणसंस्था, सरकारी कचेऱ्या, कारखाने, दवाखाने अशा ठिकाणी एखाद्या जमातीचे प्राबल्य असते. दुसऱ्या जमातीतील उमेदवार साधा मुलाखतीला येऊ शकत नाही. जर अशा मुख्य ठिकाणी ही वर्तुळे अस्तित्वात असतील तर त्या वल्गना व्यर्थ ठरणार आहेत.

# मिनिटाची किमया

विजय रतिलाल पीर, प्रथमवर्ष शास्त्र

सर्वसाधारणपणे सामान्य माणसाच्या हृदयाचे एका मिनिटात ७२ ठोके वाजतात. (आजच्या महागाईमुळे त्याचे 'नाजूक' हृदय जोरात धडधडायला लागेल की अजिबात बंद होईल हे नाही सांगता येत). उष्णकटिबंधात आढळणाऱ्या कावळ्याच्या छत्रीची एक विशिष्ट जात मिनिटात ५ मिलिमीटर इतकी वाढते. छत्रीची झपाट्याने झालेली ही वाढ पाहून तुमचा श्वास क्षणभर थांबतो न थांबतो तोच एका मिनिटात तुमचे फुफ्फुस १४ ते १८ वेळा आजूबाजूची स्वच्छ हवा (असल्यास) ग्रहण करते. कदाचित तुम्हाला माहीतदेखील नसेल की, याबाबतीत गाय, कोंबडा, कबूतर, उंदीर हे पशु-पक्षी आपल्यापेक्षा सरस आहेत. ते एका मिनिटात क्रमशः २०, २५, ६०, आणि १३० वेळा श्वासोच्छ्वास करतात. उंदरांपेक्षा घुशी जलद असतात. त्या मिनिटात २०० वेळा हा 'कार्यक्रम' पार पाडतात. पळण्यात वेगवान समजल्या जाणाऱ्या घोड्याची या बाबतीतली क्षमता मिनिटाला फक्त १२ च आहे.

छोट्याशा दिसणाऱ्या या एका मिनिटात खूप गोष्टी घडतात. उत्तम पियानोवादक एका मिनिटात सुरपट्ट्यांवर ३५०० वेळा (होय, तीन हजार पाचशे वेळा) आघात करतो. कार्यदक्ष (म्हणजेच बिन 'सरकारी') स्टेनोग्राफर इतक्या वेळेत ३०० शब्द लिहू शकतो. १९७१ मध्ये झालेल्या जागतिक टंकलेखन (टायपिंग) स्पर्धेत विजेत्या बनलेल्या एका जर्मन महिलेने मिनिटात ५८२ अक्षरे टंकलिखित केली होती.

बऱ्यापैकी विटा तयार करणारा कामगार मिनिटात ५७ विटा बनवितो. जगप्रसिद्ध फ्लेमेंको नर्तक आणि नर्तकी ६० सेकंदांत ९६० वेळा पदाघात करतात. अमेरिकेचे २६ वे अध्यक्ष थियोडोर रूझवेल्ट यांनी १ जानेवारी १९०७ रोजी नूतन वर्षाभिनंदन करावयास आलेल्या लोकांशी मिनिटाला

१६ या सरासरीने हस्तांदोलन केले. त्यांचा हा उपक्रम एकूण ९ तास चालला होता, त्यांच्या बरोबर असणाऱ्या त्यांच्या वैयक्तिक सल्लागाराने केलेल्या निरीक्षणावरून त्यांनी त्या दिवशी ८,५१३ व्यक्तींशी हस्तांदोलन केल्याचे सांगितले जाते.

गती आणि क्षमतेच्या आणखी काही विक्रमांचा परामर्श घेऊ या.

'युनायटेड स्टेटम्' (United States) नामक एका अमेरिकन आगबोटीने १९५२ साली मिनिटाला ०·७ मैल या वेगाने अटलांटिक महासागर पार केला होता.

जगातील सर्वांत वेगवान उतारू रेल्वेगाडी टोकियो ते न्यू तोकाईदो या मार्गावर धावते. तिचा मिनिटाचा वेग आहे १·६७ मैल म्हणजेच ताशी शंभर मैल! (१६१ कि. मी.)

पेट्रोलवर चालणाऱ्या मोटारींमध्ये 'पोर्श' चे नाव अग्रभागी आहे. ती मिनिटात ३·३ मैलांचे अंतर कापते. अर्थात् ताशी वेग १९८ मैल.

डी. सी. कॅम्पबेलच्या टर्बोजेटवर चालणाऱ्या नौकेने १९६७ साली मिनिटाला ५·४७ मैलांचे अंतर कापून जागतिक विक्रम केला होता.

'स्पिरिट ऑफ अमेरिका' या जेटशक्तियुक्त अमेरिकन मोटारीने १९६५ साली मिनिटाला १०·२३ मैलांचे अंतर कापले. या हिशोबाने तिचा ताशी वेग होतो ६१० मैल! या मोटारीला जमिनीवरचे विमान म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या सर्वांवर ताण म्हणजे अमेरिकन जेट विमान. एका चाचणीत मिनिटाला ३४·५ मैलइतका (ताशी २०७० मैल) वेग प्राप्त करून त्याने विक्रम संपादन केला होता, पण नुकताच हा विक्रम मोडला गेला आहे. फ्रान्स बनावटीच्या कॉन्कोर्ड–०१ जातीच्या विमानांचा साधारण वेगच ताशी २४०० मैल आहे.

पृथ्वीचा स्वपरिभ्रमणाचा वेग मिनिटाला १७ मैल आहे. सूर्याभोवती ती मिनिटाला १०८ मैल या वेगाने भ्रमण करते. अमेरिकेच्या व्हर्जिनिया विश्वविद्यालयात जगातील सर्वांत वेगवान केन्द्रोपगामी यंत्र आहे. ते मिनिटाला ९ कोटी प्रदक्षिणा पूर्ण करते.

तासाच्या १/६० व्या भागात—एका मिनिटात—खाद्य आणि पेय रूपाने १५० टन मांस, १·१० टन मासे, १३० टन साखर, १४ टन लोणी, ८ टन मार्गारिन नि १० टन पनीर फस्त केले जातात. तसेच १९०० गॅलन दूध आणि १३५ टन अंगूरी गट्ट केली जाते. (आपल्या वाट्याला मात्र यांपैकी फारच थोडे येते.)

या सगळ्या खाण्या-पिण्या-चालण्या-करण्याच्या क्रियेदरम्यान एका मिनिटात पृथ्वीवर २०० बालके जन्म घेतात. (यात भारताचा वाटा आहे ४० बालकांचा) पृथ्वीवरील मृत्यूचे प्रमाण मिनिटाला १०३–१०७ इतके आहे.

सिस्टिम–३७० मॉडेल–१४५ सारखा मध्यम आकाराचा कॉम्प्युटर मिनिटाला १० लाख या वेगाने वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देतो. आय. बी. एम्. चे '११५' हे गणकयंत्र जगात सर्वांत कार्यक्षम समजले जाते. एका आदेशाचे पालन करण्यासाठी त्याला सेकंदाच्या ५४ अब्ज इतका वेळ लागतो. $\left(\frac{१}{५४,००,००,००,०००}\text{ सेकंद}\right)$ इतक्या वेळेत प्रकाश ५४ फूट अंतर पार पाडतो...एका मिनिटात १ कोटी १० लाख मैल.

हे सगळे वाचून तुमच्या छातीचे ठोके वाढले तर नाहीत ना! बघा बरं. मिनिटाला ७२ पेक्षा जास्त नसले म्हणजे मिळवली.

With Best Compliments From :–

**PRAFULLA MEDICALS**

**Medicals & General Stores**

1531, Tilak Road, PUNE 30

## खरं खोटे देव जाणे !

कांतिलाल छ. जैन, प्रथमवर्ष वाणिज्य

पंजाबमधील रुपार गावच्या प्रीतम नावाच्या स्थानिक चहाविक्रेत्याने पाच तासांत ८० चहाचे कप पिऊन दाखविले व लंडनच्या मॅडम मार्टीन तिन्दाली यांचा पूर्वीचा ६ तासातील ७८ कप चहा पिण्याचा विक्रम मोडल्याचा दावा केला.

आपण ६॥ तासांत १०० कप चहा पिऊ शकतो असा दावा प्रीतम यांनी करताना म्हटले की कोठेही, व कोणत्याही क्षणी, कोणत्याही चहा पिण्याच्या सर्धेत भाग घेण्याची माझी तयारी आहे.

*

एका कंजूष व्यापाऱ्याने आपल्या मुलाला चष्मा आणून दिला. मुलगा चष्मा घालून विचार करीत होता. शेठ आत आले व ओरडून म्हणाले, "मुला, वाचतोस ?" "नाही" "लिहितोस ?" "नाही"—

"तू तर नेहमी फाल्तू खर्च करतोस. काही कामाशिवाय चष्मा लावायचा नाही."

*

एक बाई न्यायालयात साक्ष देण्यासाठी दाखल झाली. न्यायाधीशाने तिचे वय विचारले. तिने आपले वय ३५ सांगितले. न्यायाधीशाने म्हटले की पूर्वी पाच वर्षांपूर्वी जेव्हा तू न्यायालयात आली होतीस तेव्हासुद्धा वय ३५ सांगितले होतेस व आजसुद्धा आपले वय ३५ सांगतेस. बाई म्हणाली, "मी त्या लोकांपैकी नाही की जे आपले वय प्रत्येक वेळी बदलतात."

## सप्रेम ....

मिलिंद, पदवीपूर्व वाणिज्य

प्रिय ...

कळविण्यास कारण की, गेल्या दोनचार दिवसांत दिसली नाहीस. रागावली असल्याचा संशय येतो. पण जीवनामध्ये काही काही क्षण असे येतात की ज्यामुळे जीवनाला आकार पडत असतो. जसे दगडाला छिन्नी-हातोडीचे घाव सोसल्याखेरीज देवपण येत नाही, त्याचप्रमाणे मानवी आयुष्याला सुखदुःखाचे घाव सोसल्याखेरीज जिवंतपणा अथवा त्याच्या आयुष्याला जीवनाचे स्वरूप येत नाही. पण हेही तितकेच खरे की, प्रत्येक दगडाला घाव सोसले तरी देवपण प्राप्त होत नाही. त्यातील बहुतेक पाट्यावरवंट्यासाठीही उपयोगात आणले जातात की, ज्यांच्या आयुष्यात सदैव घावच सोसावे लागतात आणि असाच एक दिवशी तुकडा पडतो ! सर्वचजण देव झाले तर त्यांना पुजणार कोण ? त्यासाठी तर देवाने माणसांना माणूस ठेवलेले आहे. त्यापैकी असाच मी एक माणूस.

परंतु तू म्हणशील, ही कसली भंकस चालविली आहे. पण काय करायचे, रावणाने सीता पळविली नसती, किंवा अर्जुनाने युद्धच केले नसते तर रामायण आणि महाभारत कशाला घडले असते !

बरं असो ! पण असो काय ! त्या दिवशीच्या प्रसंगाने सर्वांना 'हसो' केले आणि आमची मात्र मुंडी खाली झाली. त्या दिवशी आमच्या प्राध्यापकांनी आमच्या बचतीकडे पाहून फारच तारीफ केली. सरांनी तीन पूर्ण पानांवर ते कसली तरी खाती खोलायला सांगितली होती. आणि सर्वांनी सरांचे साफ साफ ऐकले. परंतु मी सकाळीच पेपर वाचल्यामुळे मला भारतातील कागद टंचाईची जास्त नाही पण थोडी तरी कल्पना आली होती. त्यामुळे मी तीन

कागदांवर प्रत्येकी एक खाते उघडण्याऐवजी एकाच पानावर तीन खाती उघडली.

नेहमीप्रमाणे मला वाटत होते, की सर मागून राऊंड मारून आसनस्थ होतील. पण झाले उलटेच!!! त्यांनी प्लॅटफॉर्मच्या एका टोकापासून राऊंड घ्यायला सुरुवात केली, आणि माझ्या बेंचपाशी, स्वतःच बनविलेल्या वर्तुळाचा परीघ पूर्ण केला. हो, कारण परीघ जोडल्याशिवाय 'राऊंड' पूर्ण व्हायचा कसा?

सर जवळ आले तसा मी वहीत, (केसांपासून संरक्षिलेले डोके) खुपसले. पण सरांच्या डोळ्याने तेवढी सुद्धा पहाण्याची 'इकॉनॉमी' केली नाही. आणि माझ्या पुढ्यात येऊन त्यांनी कसलेतरी 'अेकाऊंटचं' नाव उच्चारून दाखवावयास सांगितले. मी सरांना माझी वही दाखविली. तेव्हा सरांना काही न उमगल्यामुळे पुन्हा कुठलेतरी अकाऊंटचे नाव उच्चारून ते कुठे ते दाखवावयास सांगितले. मी थोडा विचार करून...[हो विचार करूनच, कारण काल्च पाहिलेला बॉबीमधला तो प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर आणून!...हं], काय झालं, मी एक खाते त्यांना दाखविले. पण एक म्हण का काहीतरी 'स्टेटमेंट' आहे की 'देव देता है, तो छप्पर फाडके देता है।' पण त्यात थोडी दुरुस्ती करून मी म्हणेन 'देव पूछता है, तो बहुत कुछ, नहीं तो...!' त्या आमच्या सरांनी...हो आमच्या म्हणणे आवश्यक आहे कारण आम्हीच त्यांचे पालक नव्हेत काय? बरं, काय झालं आमच्या सरांचे; त्यांनी मला पुन्हा एका अकाऊंटबद्दल विचारले. शेवटी चिडलेला मी मनातल्या मनात मनाला 'सत्त्वाचा उदयोस्तु करा' असे बजावीत असतानाच ओरडलो, "काय पाहिजे ती अकाऊंटस पाहून घ्या. सर्व काही इथेच आहे". असे म्हणून आधी चाललेला विषय पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न करू लागलो, कारण नेमके त्याच वेळेस कुठेतरी वाचलेले हे दोन शब्द आठवले 'थांबला तो संपला! आणि याशिवाय एक चांगली पंक्ती आठवली 'चलता रहे शाश्वत उसीकी सफलता अविराम है।' मला तर फक्त सफलता मिळवायची होती, त्यामुळे मी माझा मघाचा विषय चालू ठेवायचा निर्धार केला. पण...पण कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी बासुंदीसाठी आणलेल्या दुधात थेंबभर ताक पडावे आणि सर्व रंगाचा बेरंग व्हावा, त्याप्रमाणे माझ्या निर्धाराचे सरांनी अक्षरशः पाणी पाणी करून टाकले.

एखाद्या मातेकडून तिचे बालक ओढून घ्यावे, त्याप्रमाणे सरांनी माझी वही ओढून घेतली, आणि ज्याप्रमाणे दुर्योधनाने द्रौपदीची विटंबना वस्त्रे फेडून केली होती त्याप्रमाणे माझ्या वहीची विटंबना सरांनी पान फाडून केली. परंतु द्रौपदीला कृष्ण भेटला, पण माझ्या वहीला मात्र कोणीच भेटले नाही. तरीही द्रौपदीची विटंबना होत असताना धर्म ज्या निर्धाराने व संयमाने सभामंडपात बसला होता तितक्याच संयमाने मी बेंचवर बसलेला होतो. विटंबना केल्यानंतर दुर्योधनाने द्रौपदीला सोडले तरी, पण आमच्या सरांनी मात्र तिला न सोडता तिचे प्रदर्शन मांडले. आमच्या 'इकॉनॉमी' वरती त्यांनी जे महाभारत सांगितले ते लिहिण्यासाठी व्यासांनाच जन्म घ्यावा लागेल. पण व्यासांनी रामायण, महाभारत लिहिले तरी इतर लोक ते वाचू किंवा सांगू शकत नाहीत काय? त्याचप्रमाणे मी हे नवीन महाभारत थोडक्यात सांगतो. 'वहीपत्रहरण' याचा चॅप्टर तर वरतीच दिला आहे. नंतर शिरी काही उल्का फुले टाकली. जी बरोबर डोक्यावरच बसली. 'यांना मधुकररावांच्या ऐवजी अर्थमंत्र्यांच्या जागेवर बसविले पाहिजे' हे वाक्य ऐकता क्षणीच मी मनात खूप झालो, कारण फक्त एवढीशी बचत करून जर अर्थमंत्रिपद मिळत असेल तर थोडी अजून बचत करून मुख्यमंत्रिपदसुद्धा...! पण पुढे टाकलेले फूल मात्र फूल नसून दगडच होते वाटते. कारण आमच्या मडक्यावर त्याचा चांगलाच आवाज आला. 'यांनी येथे जी कागदाची इकॉनॉमी केली आहे तेव्हा यांच्या पेपरवर किंवा पेपरमध्ये सुद्धा, आम्ही मार्कांची इकॉनॉमी करण्याचा प्रयत्न किंवा प्रयत्नांची शिकस्त करू.' हे वाक्य ऐकताच मी भानावर आलो आणि मनाशी निश्चय केला की या विषयात, (काय बरे नाव या विषयाचे?) कमीत कमी शंभर आणि जास्तीत जास्त दोन (टापटिपीसाठी ठेवलेले) मार्क मिळवायचे. पण त्याच दिवशी मला निश्चयाची व्याख्या समजली ती अशी 'भानावर नसताना (किंवा असतानासुद्धा) मनाशीच उच्चारलेले व ज्याला मनुष्याच्या जीवनात (विशेषतः माझ्यासारख्याच्या राज्यात) अर्थ नसलेले वाक्य.' जो मी कित्येक वेळा करतो आणि नेहमीच मोडतो. मला उभ्या आयुष्यात एकच एक निश्चय पाळणारा भेटला तो म्हणजे देव. त्या देवाने लहानपणी (त्याच्या की माझ्या, कोण जाणे?) निश्चय केला होता की, मी बोलणार नाही म्हणून. आणि त्याने आतापर्यंत तो पाळला.

मात्र. आणि मीही पाळला त्याचे बोलणे न ऐकण्याचा.

वर सरांनी आम्हाला ही पुष्पांजली वाहिली आणि आमची सदैव सरळकोनात असणारी मान अगदी काटकोनात खाली झाली. ती इतकी की, अजून थोडी खाली झाली असती तर मोडली असती. मान खाली असतानाच मी सहज तुझ्याकडे नजर टाकली. सर्वजणांबरोबर तू सुद्धा हसत होतीस. त्यामुळे तुझा राग आला. सर्वजण हसले म्हणून काय झालं तू तरी हसायला नको होतंस.

नंतर दोन दिवस, सरांनी बनविलेल्या त्या राऊंडमध्ये, राऊंड घेत घेतच निघून गेले. मी जेव्हा आलो तेव्हा मी तुझ्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण माझ्यापेक्षा तूच रागावलेली होतीस.

तुला माहीतच आहे त्या वामन चोरघडेला सल्मा भेटली होती. ती नुसती हसली म्हणून लेखक तिच्यावर रागावला. आणि त्यामुळेच त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध प्रेमाच्या मुलायम धाग्यांनी बांधले गेले. पण तुला माहीतच आहे, हल्लीचा जमाना बदलला आहे. एकदा आपल्या हातून पक्षी उडाला म्हणजे तो पकडणे किती कठीण असते. म्हणूनच मी तुझ्यावरचा रोष काढून टाकला. पण तुला मात्र मी रागावलेले हवे होते. तुझ्या मते रागाने प्रेम वाढत असेल. पण लक्षात ठेव प्रत्येकानेच सल्माची भूमिका वठविली तर!!!

तुला माहीतच आहे, एक शब्द हा दुसऱ्या शब्दाला जन्म देत असतो. जाऊ दे! किती वाजले ग आई! काय म्हणतेस अर्धीच! चला निघालं पाहिजे कॉलेजात आता. शेवटचे सांगतो तेव्हा उगीच रागावू नकोस. राग म्हणजे प्रीतीची कळी खुलण्या आधी अंकुरलेला कोंब होय.

नमस्ते. कळावे,

तुझाच
सुनिल


Ready to serve you too every day, in every way—

**Mahabank**

**We call it our Total Banking Service, bringing you every conceivable Saving Scheme, safety of your valuebles, financial aid to industry and trade, and economic development of backward areas**

**Let us list what services we offer :**

- **Savings Bank Account.**
- **Current Account.**
- **Fixed Deposit Account.**
- **Recurring Deposit Account.**
- **Coupon Deposit Scheme.**
- **Annuity Deposit Scheme.**
- **Cumulative Deposit Scheme.**
- **Lokmangal Deposit Scheme.**
- **Safe Deposit Lockers.**
- **Aid to Small Industries, Agriculture, Small Enterprises, Professionals etc.**
- **Foreign Exchange Business.**

**This is MAHABANK at your service,**

**Bank of Maharashtra**

# दलित साहित्य

बी. एस्. कांबळे, तृ. व. साहित्य

आजवरचे आमचे साहित्य हे बव्हंशी पांढरपेशा वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले आहे. सदाशिवपेठी साहित्य ही डॉ. केतकरांनी वापरलेली संज्ञा अद्यापही सार्थ आहे. ही सदाशिवपेठी संज्ञा अर्थात पुणे शहरापुरती मर्यादित नाही. ती सर्व महाराष्ट्रात नव्हे देशभरच पसरलेली आहे! ती विशिष्ट जाती–पोटजातीपुरती संकुचित आहे असेही मानावयाचे कारण नाही. ती एक प्रवृत्ती आहे. आणि ती सामाजिक जीवनाच्या प्रचलित व्यवस्थेतून उत्पन्न झालेली आहे. जातिभेदाच्या तटबंदीने एकूण समाजजीवनाचे विविध स्वायत्त प्रांत निर्माण करून या प्रवृत्तीला फार मोठा हातभार लावलेला आहे. अनेक मर्यादांनी ग्रासलेल्या अशा वाङ्मयात तोचतोपणा यावा, त्याच्या चतुःसीमांचा संकोच व्हावा यात नवल नाही. वाङ्मय–निर्मितीच्या मीमांसा कोणत्याही आणि कशाही असोत. समाजाच्या सर्व विभागांतून त्याचे पोषण व्हावे आणि जीवनाच्या साऱ्या सरहद्दीपर्यंत त्याचा संचार व्हावा याबद्दल दुमत होऊ नये.

सध्या असे प्रयत्न होत आहेत यात शंका नाही. आजपर्यंत दुर्लक्षित असलेल्या काही जीवनप्रांतांचे दर्शन कथा, कादंबरी, काव्य इत्यादी वाङ्मयप्रकारांतून होऊ लागले आहे. त्याला 'दलित साहित्य' म्हणावे किंवा नाही हा वादाचा प्रश्न असेल, परंतु हे साहित्य महत्त्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची चळवळ, त्यांनी शिकविलेला ध्येयवाद ही दलित साहित्याची प्रेरणा असून हे साहित्य दलित समाजाच्या प्रश्नाशी, त्याच्या आशा-आकांक्षांशी, सुखदुःखांशी संलग्न आहे. हे साहित्य वास्तववादी आहे. या साहित्यात क्रोध आहे, विद्रोह आहे, बंडखोरी आहे. त्याची भाषा ही सुप्रतिष्ठांना बोचणारी आहे. म्हणूनच त्याला 'दलित साहित्य' म्हणावयाचे. दलितांमध्ये अस्मिता आली आहे. म्हणून तो साहित्यातून आपले आवाज उठवू लागला आहे. स्वतःचे दर्शन घडवू पाहत आहे. आपले जीवन शब्दांकित करीत आहे. त्याचे हे साहित्य संक्रमणावस्थेत आहे. म्हणूनच ते सुंदर आहे किंवा नाही, कलेच्या फूटपट्ट्या, वाङ्मयीन कसोट्या यांना ते उतरेल किंवा नाही हे आजच पाहण्याची गरज नाही.

आज असे दिसते की, दलित साहित्याचा उपयोग राजकीय स्वार्थासाठी करून घेताहेत. राजकीय प्रेरणा साहित्यात असू नयेत असे माझे मत मुळीच नाही. परंतु साहित्याचे समर्थन राजकीय व्यासपीठावरून व्हावयास नको आहे. आजचे दलित साहित्य व्यंकटेश माडगूळकर, नारायण सुर्वे, केशव मेश्राम, बाबूराव बागुल, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात वगैरेंनी निर्माण केलेले आहे. त्यामध्ये बहुतांश ग्रामीण आणि मागासलेल्या समाजाचे चित्रण आलेले आहे. त्यामुळे मराठी साहित्याला एक प्रकारची जीवननिष्ठ परिपूर्णता येऊ पहात आहे.

काही टीकाकार असे म्हणतात की — कालचे साहित्य हे ललित साहित्य, आजचे साहित्य हे दलित साहित्य. परंतु त्यांना ललित साहित्य म्हणजे काय हे समजले नसावे. ललित साहित्याला परंपरा आहे. त्याचा इतिहास महान आहे. फार तर असे म्हणावे की, ललित साहित्यात लैंगिक विकृतीने पछाडलेल्यांची चित्रणे साहित्य म्हणून संबोधिली जातात. तद्वत दलित साहित्य हेही एक ललित साहित्य होय. त्या परंपरेच्या ओघातच दलित साहित्याची धारा मिसळलेली आहे—मिसळणे आवश्यक आहे. ललित साहित्याची जीवननिष्ठा लक्षात घेता दलितांचे चित्रण ललित साहित्यात अधिक प्रखरपणे अवतरणे आवश्यक आणि अपरिहार्य आहे.

## दलित साहित्याच्या व्याख्या व पळवाटा :

आज 'दलित साहित्य' म्हणून प्रचारात असले तरी त्याची साहित्याच्या सर्वसमावेशकतेला साजेल अशी एकही व्याख्या अस्तित्वात नाही. परंतु काही विचारवंतांनी संकुचित व्याख्या केलेल्या आहेत :– "दलित साहित्य हे विचारजागृतीसाठी, विशिष्ट दृष्टिकोणाच्या प्रचारासाठी निर्माण होते आहे." ही व्याख्या पळवाट काढणारी दिसते

आहे. तसेच दुसरी एक व्याख्या—' "दलित साहित्य म्हणजे दलितांनी, दलितांसाठी, दलितप्रभावर लिहिलेले साहित्य." ही व्याख्या अतिरेकीवाद्यांची आहे. इथे जातीयतेचा पगडा तर दिसतोच, पण दलितांची सुखदुःखे फक्त दलितांनीच गावी, त्यांचे प्रश्न त्यांनीच सोडवावेत, त्यांच्याबद्दल इतरांना काही एक सोयरसुतक नाही. ही वरील व्याख्या जशी अतिरेकीवाद्यांची आहे, तशीच ती 'दलित साहित्या'चा वेगळा पंथ स्थापू पाहणाऱ्यांचीसुद्धा आहे. असा वेगळेपणा दलित साहित्याच्या विकासाला तर मानवणार नाहीच, पण या वेगळेपणाला भवितव्यही नाही. कारण प्रयत्नशील शासन आणि समाज आज ना उद्या दलितांच्या समस्या पूर्णपणे दूर करून 'दलित' हा शब्दच इतिहासजमा करणार आहे. मग वेगळा पंथ हवा कशाला? सर्वंच समाजाला समतेच्या ध्रुवाकडे नेणारा तो झंझावात ठरेल!

त्यामुळे साहित्याच्या विशालतेला बाध आणून साहित्याची जातीयवादी व्याख्या निर्माण करणे धाडसाचे ठरेल. साहित्याच्या विशाल आणि सर्वसमावेशक क्षेत्रात दलित साहित्याच्या वेगळेपणाचे समर्थन करण्याची गरज नाही. दलित साहित्याच्या समर्थ जलौघात दलितांच्या आशा—आकांक्षांचा प्रभावी प्रवाह मिसळायला हवा. ४९ व्या साहित्य संमेलनच्या वेळी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी आपल्या भाषणात असे प्रतिपादन केले होते की,—"आज देशात २० कोटी जनता दलित अवस्थेत जीवन जगत आहे. त्यांच्या जीवनाशी निगडित असलेले साहित्य हे साहित्यातून वेगळे पाडू नका."


VISIT! VISIT! VISIT!

For Fresh Fruits Juices & Milk Juices

**KIRTI FRUIT JUICE CENTRE**

Hotel Sntlej Corner
Fergusson College Road
Opp. Vaishali Hotel
POONA 4.

Prop. Sudhakar Patil, B.Com.



Largest House in
POONA FOR KORES PRODUCTS

**UNIVERSAL TYPEWRITER EXCHANGE**
[India]

**Authorised Distributors for**

**KORES (INDIA) LIMITED**

We supply:
Typewriter & Duplicator Accessories at a concessional Rate.

1229/1, Fergusson Road, Poona-4
Phone : 56786

# भारतीय संरक्षण व्यवस्था
(स्थूल माहिती)

संग्राहक : कांतिलाल जैन, प्रथम वर्ष वाणिज्य

राष्ट्राध्यक्ष (सर्वाधिकारी)
|
कॅबिनेट मंत्रिमंडळ (संरक्षण समिति)
|
संरक्षणमंत्री

| संरक्षण मंत्र्यांची समिती | संरक्षण खात्याचे चिटणीस | विभागीय मुख्यांची समिती. |
|---|---|---|
| लष्करी दलाचे प्रमुख Chief of Army | नौदलाचे प्रमुख Chief of Navy | वायुदलाचे प्रमुख Chief of Air |
| लष्करी हुकमत | नौदल हुकमत | वायुदल हुकमत |

भारतीय संरक्षण घटनेनुसार राष्ट्रपती हा सर्वाधिकारी असून कारभाराच्या दृष्टीने संरक्षणमंत्री हा जबाबदार आहे. त्याखाली लष्कर, नौदल, वायुदल यांचे मुख्य अधिकारी यांकडे तीन विभागांचा कारभार आहे.

युद्धप्रसंगी राष्ट्रपती सर्व हुकुमत आपल्या हाती घेतात. व्यवहारात सर्व संरक्षणविषयक धोरणे, कारभार संरक्षण मंत्रालयात संरक्षणमंत्री चालवतो. भारताचा लष्कर, नौदल, वायुदल विभागांच्या कारभाराची जबाबदारी संरक्षणमंत्र्यावर असते. संरक्षणविषयक सर्व प्रकारचे महत्त्वपूर्ण निर्णय घेणे, राष्ट्रपतींकडून संरक्षण खात्याविषयी खर्चविषयक मंजुरी मागविणे ही कामे संरक्षणमंत्री करतो. संरक्षणखाते संरक्षण-मंत्री, तिन्ही विभागप्रमुख, संरक्षण खात्याचे चिटणीस व अर्थखात्याचे सल्लागार यांनी बनलेले असते. ही समिती संरक्षणविषयक महत्त्वाचे निर्णय घेते. ज्या वेळी अत्यंत महत्त्वाचे निर्णय घ्यावयाचे असतील तेव्हा कॅबिनेट मंत्र्यांच्या समितीला सल्ला विचारण्यात येतो. या समितीत प्रधानमंत्र्यांचा सुद्धा समावेश असतो, यात प्रधानमंत्री अध्यक्ष असून गृहमंत्री, संरक्षणमंत्री, दळणवळणमंत्री हे सभासद असतात.

## (१) भारताचे भूदल (Army Force) :

येथे भूदल-प्रमुख हा मुख्य असून त्याच्याखाली पश्चिम, पूर्व व दक्षिण अशा ३ हुकमती (Command) आहेत. लेफ्टनंट जनरलच्या हुद्द्याचा अधिकारी हा कमांडचा सर्वाधिकारी असतो. या कमांडची आणखी एक उपकमांड असून त्याचा मुख्य मेजर जनरलच्या तोडीचा जी. ओ. सी. असतो. त्याखाली ब्रिगेडियर प्रमुख असतो.

## (२) भारताचे नौदल (Navy Force) :

नौदल-प्रमुखाच्या अधिकारात सर्व आरमारी जहाजे व बंदरावरील लष्करी तळ असतात. नौदलाची देखील अनेक शाखांमध्ये विभागणी होते.


व्हाईस ॲडमिरल (नौदल-प्रमुख) यांच्या खाली दुय्यम नौदल-प्रमुख, नाविक (Personnel) प्रमुख, सामग्री विभाग-प्रमुख, नौदल विमान-प्रमुख असतात.

## (३) भारताचे वायुदल (Air Force) :

वायुदल प्रमुख हा वायुदलाचा मुख्य अधिकारी असून तो खालील तीन अधिकाऱ्यांमार्फत आपला कारभार चालवितो.

(१) एअर ऑफिसर व्यवस्था-प्रमुख.
(२) एअर ऑफिसर इन चार्ज मेन्टेनन्स.
(३) डेप्युटी चीफ ऑफ एअर स्टाफ.

याच्या हाताखाली Director of Training, Director of signals, Director of Policy and Finances, Director of Operation, Director of Intelligence and Director of Reserve असतात.




RETIRED PEOPLE. DEPENDENT PARENTS.
LIFE INSURANCE BENEFICIARIES. CHILDREN.
OTHER DEPENDENTS.

**Earn an extra income—every month!**
The Bank of Baroda Monthly Income Plan is a perfect, safe investment—for anyone who wants to invest a lumpsum, and needs a regular monthly income. For himself or any dependent he names.

Start your Monthly Income Plan today!

Thou shalt forever be prosperous with

## Bank of Baroda

A Government of India Undertaking
A network of over 700 branches in India and abroad—in U.K., East Africa, Mauritius, Fiji Islands and Guyana.

Shilpi B.O.B. 14/73

**Monthly Income Plan Interest Table**

| Deposits: Minimum Rs.1000. And its multiples. | 24/60 months 7% p.a. | 61 months and over 7¼% p.a. |
|---|---|---|
| Rs. | Rs. | Rs. |
| 1000 | 5.83 | 6.04 |
| 2000 | 11.66 | 12.08 |
| 5000 | 29.16 | 30.20 |
| 7000 | 40.83 | 42.29 |
| 10000 | 58.33 | 60.41 |

**Bank of Baroda has 5 other Savings schemes:**

• Savings Account • Minors' Savings Account • Fixed Deposit Account • Recurring Deposit Account • Festival Deposit Plan.

# सोनेरी टोळी आणि तिचा रहस्यमय बॉस

अनिल हेरंब देशपांडे, पदवीपूर्व विज्ञान

रहस्यकथा वाचता वाचताच शशिकांत झोपला होता. त्याला एकदम जाग आली. दार कोणीतरी जोरात ठोठावत होते. रात्रीच्या भयाण वेळी जोरजोरात चाललेल्या ठोठावण्याच्या आवाजाने तो दचकला होता, पण घाबरला नव्हता. त्याने सावधपणे हालचालीस सुरुवात केली. उशाखालचे पिस्तुल व लायटर हातात घेतला आणि दरवाजाच्या कडीला हात लावला आणि तेवढ्यात त्याच्या मानेस थंडगार पिस्तुलाच्या नळीचा स्पर्श झाला व करडा आवाज गरजला, " Hands up ". शशिकांत पुरता ओळखून चुकला की दुश्मनांनी आपल्यावर पूर्ण मात केली आहे, त्यांच्या साध्या युक्तीस आपण बळी पडलो. त्याच वेळी त्याला अनेक प्रश्नांनी घेरले. कोण असावेत हे बदमाष? आपल्यामागचा बदमाष कोठून आला असावा? आपल्याला असे अडकविण्याचे काय कारण असावे? तेवढ्यात त्याच्या डाव्या हाताला असणाऱ्या स्वयंपाकघरातील खिडकी व तीतून आत येणारा मोटारीच्या पुढच्या दिव्याचा प्रकाश त्याने पाहिला. तेवढ्यात मागून आवाज पुन्हा कडाडला, "दार उघड." शशिकांतने मनात आणले असते तर त्याने मागच्या बदमाषास केव्हाच पाणी पाजले असते, पण ह्या सर्वांचा सूत्रधार कोण हे त्याला शोधून काढावयाचे होते. म्हणून त्याने तीन बुरखाधारी बाहेर पिस्तूल रोखून उभे होते त्यातील एकजण ओरडला, "मुकाट गाडीकडे चल, नाहीतर फुकट मरशील." "तुमच्यासारख्या बुरख्यातल्या बायका मला काय मारणार?" तशाही परिस्थितीत त्याला विनोद सुचला. "वटवट बंद कर, १० नंबर त्याचे डोळे बांध" पुन्हा मगाचाच बुरखाधारी कोकलला. तो त्यांचा मुख्य असावा, असा त्याने कयास केला. त्याचे डोळे बांधण्यात आले. तो गाडीत बसला. त्याच्या दोन्ही बाजूस दोन बदमाष बसले होते. त्याच्या मांडीला त्या दोघांच्या पिस्तुलाचा स्पर्श जाणवत होता. गाडी पुढे जात होती आणि त्याबरोबर शशिकांतची विचारचक्रे फिरत होती. त्याला हा प्रसंग अगदी जशाच्या तसा कोठे तरी घडल्यासारखा, पाहिल्यासारखा, वाचल्यासारखा वाटत होता. विचारांच्या तंद्रीत त्याला खिशातील लायटरची व पिस्तुलाची जाणीव झाली आणि तो निर्धास्त झाला. त्याने आता बाहेरील परिस्थितीचा अंदाज घेण्यास सुरुवात केली. त्याला गार वाऱ्याची झुळूक लागत होती. याचाच अर्थ खिडकी संपूर्ण उघडी होती. इतर वाहनांच्या रहदारीचा आवाज येत नव्हता म्हणजेच गाडी गावापासून दूर चालली होती. गाडीत चौघे बदमाष होते. त्यांतील दोघे पुढे व दोघे त्याच्या शेजारी बसले होते. जर त्याने त्यांच्यावर मात करावयाचे ठरविले असते तर ते काम तो त्याच्या लाडक्या लायटरने सहज करू शकला असता, पण त्याला हे काय गौडबंगाल आहे ते शोधून काढावयाचे होते. अखेर गाडीने एक वळण घेतले आणि गाडी थांबली. दार उघडले गेले आणि प्रमुख ओरडला, "ए पाहुण्या, चल उतर खाली. तुला आता बॉसपुढे नेण्यात येणार आहे. नीट वागलास तर आयुष्याचे कल्याण होईल. आणि हो नाव काय तुझं?", हँऽऽ शशिकांत आवाजाच्या दिशेकडे पाहून तुच्छतेने हसला व उपहासाने म्हणाला, "तुझा बॉस आणि माझे कसे काय कल्याण करणार?" "हं, असा मग्रुरीने वागलास तर हाडसुद्धा बाहेर जाणार नाही." "ते मी बघून घेईन. कोणाचं हाड बाहेर न्यावयाचं आणि कोणाचे नाही. इथपर्यंत आणल्याबद्दल आभारी आहे तुमचा. आता दाखव कोण तुझा बॉस ते." शशिकांत. त्यांच्या ते तसलं बोलणं ऐकून ते चारही जण मनातून टरकलेच. त्याचे डोळ्यावरचे आवरण दूर करण्यात आले. त्याने पाहिले चारी बाजूंनी झाडीने वेढलेल्या छोट्याशा टुमदार बंगल्यासमोर तो उभा होता. मागील बाजूस उंच डोंगरांची रांग लांब पसरली होती. "नंबर १२ घेऊन जा आत त्याला" प्रमुखाने फर्मावले. १२ नंबर पुढे आला. त्याने शशिकांतला चलण्याची खूण केली. शशिकांत त्याच्याबरोबर गेला. त्याला एक खोली देण्यात आली. खोलीत सर्व उत्तम व्यवस्था होती. त्याने खोलीत जाऊन वॉश घेतला आणि कॉलबेल वाजविली.

आत एक नोकर आला. त्याने चहा मागवला. चहा पिल्यावर तो विचार करीत बसला. त्याने तर्क केला की, ही एक मोठी सोनेरी टोळी असावी. तिचा बॉसही रहस्यमयच दिसतोय. तो मला त्याच्या म्हणण्यांप्रमाणे वागवणार. त्याच्या आज्ञेत राहून मी काम करावयाचे व त्याबद्दल तो मला चांगला मोबदला देणार. छे हे नाही आपल्याला परवडायचे. एवढ्यात एक बायकी आवाज आला, " मिस्टर शशिकांत उठा. तुम्हाला नेण्यासाठी एक नोकर येईल त्याच्याबरोबर या. " त्याला तो आवाज खूप परिचित वाटला, पण कोणाचा ते आठवले नाही. तो उठला. मागे पाहिले तो खरोखरच एक नोकर उभा होता. त्याच्याबरोबर तो एका मोठ्या हॉलमध्ये आला. तेथे खूप मंद निळसर प्रकाश होता. एका कोपऱ्यात मात्र पूर्ण अंधार होता. तेथून आवाज आला, " या शशिकांत. तुमचे स्वागत असो. " आवाज मगाचाच होता. " का हो एवढ्या मोठ्या टोळीचे बॉस तुम्ही मग असे अंधारात का लपता ? असे उजेडावर या की, का घाबरता ? " शशिकांतने टोला मारला.

" बरं. तुमच्या म्हणण्याप्रमाणे होईल " बायकी आवाज आला आणि तेथे ट्यूबचा शुभ्र निळसर प्रकाश पडला आणि आणि...

आणि समोर एका कोचावर त्याची बायको बॉसच्या रुबाबात बसली होती. शशिकांत बघतच राहिला. तेवढ्यात बॉस बोलली, " काहो बघता काय असे खुळचटासारखे. आजपासून मी तुमची बॉस आहे. तुम्ही माझ्या म्हणण्याप्रमाणे वागायचे. नाही तर... "

शशिकांतने गपकन डोळे मिटले. त्याला घेरीच आली. तो शुद्धीवर आला तेव्हा त्याच्या तोंडावर कोणीतरी पाणी शिंपडत होते. त्याने डोळे किलकिले करून पाहिले तो बायको त्याला उठवीत होती. त्याने परत डोळे घट्ट मिटून घेतले. तेवढ्यात बायको पुन्हा म्हणाली, " आहो उठा ५॥ वाजले ७ च्या गाडीने जायचे आहेना गावाला ? " आता त्याच्या खरा प्रकार लक्षात आला होता. त्याला स्वप्न पडत होते. त्याचं लक्ष खाली पडलेल्या रहस्य कथेच्या मुखपृष्ठाकडे गेलं. त्यावरची सुंदरी त्याच्याकडे बघून मिस्कीलपणे हसत असल्यासारखे त्याला वाटले. " येस बॉस " म्हणून तो ताडकन उठला.

" काय म्हणालात ", बायको.

" काही नाही. मला आत्ता भयंकर स्वप्न पडत होते. "

" असं ? पण पहाटेची स्वप्ने खरी होतात म्हणे ! "

असं म्हणून त्याची बायको चहा ठेवायला गेली ! आणि शशिकांत तिकडे अवाक् होऊन पाहातच राहिला.


जेन्टस् स्पेशॅलिस्टस्

वंदन टेलर्स

लक्ष्मी रोड, विजय टॉकीज जवळ, पुणे ३०.

भारतात महाराष्ट्र प्रसिद्ध, महाराष्ट्रात पुणे प्रसिद्ध
तर पुण्यात सतत ५८ वर्षे प्रसिद्ध असलेले

बुवा आईस्क्रिमवाले

१७१२ सदाशिव पेठ, उद्यान प्रासाद इमारत, पुणे ३०
फोन : ५७९९८.

# दिवाळी अंक : १९७३

कु. मंगला जाधव, तृतीय वर्ष साहित्य

दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात दिवाळी अंकांचा फार मोठा वाटा आहे. महाराष्ट्रातून जवळ जवळ तीनशेच्या आसपास दिवाळी अंक निघतात. हा आकडा. पाहिल्यास वरील विधानाची सत्यता पटते. पुण्या-मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांची संख्या जास्त व दर्जा श्रेष्ठ असतो. नामांकित साहित्यिक लोकप्रिय अंकांतून आपली हजेरी लावत असतात. रंगीबेरंगी साहित्याने आपापले अंक सजविण्याचा संपादक व्यवहारी दृष्टिकोणातून प्रयत्नशील असतो. दिवाळी अंक म्हणजे एक व्यापार झाला आहे. आज कित्येक संपादक, मुद्रक, प्रकाशक, लेखक, कवी, व्यंगचित्रकार या अंकावरच आपली उपजीविका करतात. अशा अंकांचे स्वरूप समजावून घेणे स्तुत्यच होईल.

प्रत्येक दिवाळी अंक हा आपल्या वैशिष्ट्यासह सजत असतो. या अंकांचे स्वरूप चित्रविचित्र असते. काही विनोदी व्यंगचित्रात्मक तर काही कथात्मक, काहींचे कविता विशेषांक असतात. तसेच संतकार्याचा आढावा घेणारे 'पंढरी–संदेश' सारखे दिवाळी अंक तर राजकीय, सामाजिक परिस्थितीचा संघर्ष चित्रित करणारे: पाच–सहा कादंबऱ्यांचा दिवाळी अंकही निघतो. यातही स्त्री, बाल-विभाग वेगळे असतात.

दिवाळी अंकांतील व्यंगचित्रे व सजावट पाहिल्यावर एकंदरीत असे वाटते की, अंकातील चित्रांचा उपयोग हा फक्त सजावटीसाठी नसून ती अधिकाधिक अर्थवाही कशी होतील याकडे भर असावा. बरीचशी चित्रे ही आकर्षक असतात. बहुधा ती विशिष्ट हेतूने प्रेरित होऊन काढलेली असतात. 'महाराष्ट्र टाईम्स'च्या 'महाराष्ट्रातील कलाविलास'मध्ये 'उडती तबकडी, मृणाली इ. मधील रंगसंगती आकर्षक असली तरीसुद्धा सर्वसामान्यांना अशी चित्रे समजणे जरा अवघडच जाते. त्यातूनही एकंदरीत सजावटही कमी भासते. 'मौज' या अंकातही यंदा जाणीवपूर्वक (हेतुपूर्वक) छायाचित्रे काढलेली नाहीत.

दिवाळी अंकातील मुख्य आकर्षणाची [Main Attraction] बाब म्हणजे मुखपृष्ठ. खपाच्या वाढीसाठी स्त्रीदेहाचा भरपूर वापर मुखपृष्ठासाठी केला जातो. ही गोष्ट कितपत स्तुत्य वाटते? तसेच प्रचलित चित्रतारकांच्या रंगीत फोटोंचाही वापर केला जातो. बहुतेक दिवाळी अंकांच्या मुखपृष्ठावर नायकांची चित्रे असतात. गुळगुळीत कागदावरची ही गुळगुळीत चित्रे वाचकांची मने अधिकच गुळगुळीत करतात. काही अंकांवरील स्त्रिया या शालीन खानदानी वाटतच नाहीत! त्यांना स्त्री तरी का म्हणावे हा प्रश्न पडतो. त्या कसल्यातरी अतृप्त वासनेने पछाडलेल्या वाटतात. त्यांची मने बुभुक्षित वाटतात. या दृष्टीने 'मौज' मधील रवींद्र मेस्त्री यांचे स्त्रीचित्रण शालीन व नाजूक वाटते, तर जोशी यांनी 'केसरी'च्या अंकासाठी काढलेल्या चित्रात भडक रंग प्रकर्षाने जाणवतो. तरीही चेहऱ्यावरील भावचित्रण यथायोग्य वाटते. तसेच दशरथ सोनार यांनी 'गावकरी'च्या अंकात काढलेले चित्र सुखद वातावरण निर्मित करण्यात यशस्वी झाले आहे. ती सुडौल तरुणी, तिच्या हातातील दीपयुक्त तबक त्याला कारणीभूत आहे. 'धनुर्धारी'च्या अंकात मुळगावकरांनी आपल्या नेहमीच्या छाप्याचे चित्र काढले आहे. त्यांच्या चित्रात गोडाची रेलचेल दिसून येते. हा दिवाळीचा परिणामही असू शकेल. परंतु एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, चित्र हे कधीही वास्तवाशी फटकून असलेले चालत नाही. वास्तवाचा एक संबंध चित्रात सांभाळावा लागतो. या दृष्टीने मुळगावकरांनी काढलेल्या चित्रातील दोन पक्षी हे कोणत्या जातीचे आहेत याचा थांग वाचकांना न लागून त्यांना स्तिमित करण्याचा चंग त्यांनी बांधलेला आहे की काय असे वाटते!

विनोदी अंकांपैकी 'मार्मिक'मध्ये ज्वलंत परिस्थितीचे उत्तम रंगसंगती करून चित्रण केले आहे. तसेच मोहिनी, राजस, माणूस यांचीही मुखपृष्ठे आगळी वाटतात. त्या मानाने 'रुद्रवाणी'चे मुखपृष्ठ पाहताना जरा खटकते. नावच रुद्रवाणी असल्यावर रौद्र, घोषाचे समर्थन कशाला हवे? काही रेखाचित्रे उत्कृष्ट आहेत. उदा. पु. ल. देशपांडे यांचे 'कदाचित', जयवंत दळवी यांचे 'अर्धांग'

'वाळूची पावले' इ. 'अमृत', 'महाराष्ट्र टाईम्स'च्या अंकात छायाचित्रांचा वापर केला आहे. गो. नी. दांडेकर यांनी एक छायाचित्रमालाच केली आहे. 'अमृत'मधील दशरथ सोनार यांचे 'गीत गोविंद' या विषयावरचे चित्रण ओघवत्या रेषांमुळे वेगळ्या विश्वात आपल्याला नेते. काही साप्ताहिकांच्या दिवाळी अंकांत मुखपृष्ठावरच जाहिरात असते. मुखपृष्ठ पाहून अंक खरेदी करणाऱ्याची यामुळे निराशा होते.

दिवाळी अंकांतील कथा हासुद्धा अनेकांच्या वाचण्याचा आवडता विषय असतो. नानाविध कथा साकार होतात. त्यात हल्ली स्त्री-लेखिकाही स्त्रीनिंदेच्या कथा लिहितात. त्यामुळे मूल्य बदलल्याची जाणीव सुज्ञ वाचकांच्या मनावर प्रतिबिंबित होते. ज्योत्स्ना देवधर यांची 'झळझळ' ही कथा, लग्नाच्या पहिल्या रात्रीच पळणाऱ्या स्त्रीची कथा आहे. तर कानिटकरांची 'प्रवासिनी' मधील विदागी मिळविणारी गायिका किंवा शैला राजे यांची 'सोन्नत' ही कथा. या सर्व कथा स्त्रीमनाचे विविध पैलू स्पष्ट करतात. त्यांच्या अंतःकरणातील सुप्त भाव छेडतात. परंतु अशा या कथांतून वास्तवतेचा लवलेशही दिसत नाही. अशा कथा एका कोषात गुरफटलेल्या असतात. त्या या कोषातून बाहेर पडू शकत नाहीत. अर्थात हा कोष लेखकाच्या विश्वाचा असतो. त्यामुळे त्या निर्जीव, निस्तेज, वेचव वाटतात. या कथांचा अवलोकनातून जन्म झालेला असतो. त्या अनुभवावर अधिष्ठित नसतात. अभिजात वाङ्मय-निर्मिती त्यामुळे अशा कथांतून उत्पन्न होत नाही. काही कथा पांढरपेशांचे जीवन चित्रित करणाऱ्या असतात. परन्तु त्यांचे नाटक रंगत नाही. 'साधना'मधील दुष्काळाची कथा ही अर्धकच्ची आहे. तिला उंची, खोली नाही. यातना भोगणाऱ्या नवबौद्धांवरही कथा लिहिल्या आहेत, परंतु त्या पांढरपेशांच्या हृदयाला पाझर फोडण्याचे कार्य करू शकत नाहीत. काही कथा ह्या प्रश्नात गुरफटलेल्या असतात. उदा० आनंद यादव यांची 'काळा पहाड', व्यंकटेश माडगूळकरांची 'पिंजरा' कथेतील किल्ली खिशात टाकून भोग भोगणारा गोपाळ आणि रत्नाकर मतकरी यांचा 'द्रष्टा' इ० व्यक्तिमनाचा शोध घेणाऱ्या कथा 'विद्याधर पुंडलीक, अनिल डांगे, गौरी देशपांडे' यांच्या आहेत.

माणसे ही एकाकी आहेत, विश्वगती आंधळी आहे, माणूस हतबल होतो. ही कुलकर्णी यांची 'हतबल' ही कथा तर राजाध्यक्षांच्या कथेतील म्हातारीला लोक विसरल्याची जाणीव होते. कारखान्यातील नाटकी, ढोंगी-पणावर प्रकाश टाकणारी 'कारखाना' ही कथा, तसेच 'पाऊस आला मोठा' ही गौरी देशपांड्यांची नाजूक कथा. सरोजिनी बाबर यांची ग्रामीण स्त्रीची कथा, सत्यकथेतील छाया दातारांची कथा या सर्व कथा उत्कृष्ट वाटतात. मराठी वाङ्मयात अशा कथा मोलाची भर टाकतील, एक नवीन दीपस्तंभ उभा करतील अशी आशा वाटते.

तसेच काळाबाजार, लाच, मानवी असहायता, दलित जागृती, स्त्री-पुरुष लैंगिक आकर्षण, अनाकर्षण, वासनाचक्र, वांझोटे लग्न, दुष्काळ, प्रापंचिक अडचणी, पहिले अपत्य, नवरेशाही इ० विषय हाताळणाऱ्या कथा या फुगलेल्या बेडकाप्रमाणे ओंगळ वाटतात.

दिवाळी अंकांतील विशेष आकर्षण नसलेला भाग म्हणजे कविता. नेहमीचेच प्रसिद्ध तसेच काही उदयोन्मुख कवी अखिल महाराष्ट्रातील सर्व अंकांत आपली हजेरी लावतात. कविता आवडीने वाचून तिचे रसग्रहण करणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न असला तरी कवितेला एकंदर गिऱ्हाईक कमीच. एखादाच 'गर्जने'सारखा दिवाळी अंक कविता विशेषांक काढतो.

या सर्व दिवाळी अंकांचे सिंहावलोकन केल्यावर दोन गोष्टी सातत्याने खटकतात. एक म्हणजे प्रत्येक पानागणिक असलेल्या भरमसाठ जाहिराती की ज्या साहित्यापेक्षाही जास्त असतात. आणि दुसरी गोष्ट म्हणजे शुद्धलेखन. 'अनुप्रिता' या स्त्रीविषयक दिवाळी अंकातील पहिलीच कथा वाचल्यावरोबर पहिल्या ओळीपासूनच अक्षरांची अविस्मरणीय फेकाफेक पुढील कथा वाचण्यास अडथळा निर्माण करते.

अर्थात दिवाळी अंक काढणे ही एक हल्ली किफायतशीर गोष्ट झाली आहे. त्यामुळे त्यातील साहित्याला बाजारी स्वरूप आले आहे. पैसे मिळविण्यासाठी चांगले साहित्यिक बीभत्स, ओंगळ साहित्यनिर्मिती करतात. ही गोष्ट मराठी साहित्याच्या वाटचालीला निश्चितच हानिकारक आहे असे वाटते.

# हुंडा — एक सामाजिक प्रश्न

नरहरी गणेश देशपांडे : तृ. व. वाणिज्य

लग्न हा आपल्या घरातील जिव्हाळ्याचा, प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वाचा प्रसंग असतो. तेव्हा आपल्याजवळील संपत्तीचा काही भाग किंवा प्रसंगी कर्जाऊ आणून त्यामध्ये खर्च केला अगर नवीन नातेवाइकांना दिला तर त्यात काही वावगे ठरणार नाही. तेवढीच नवीन जोडप्याचा संसार उभारण्यास मदत होईल. नवीन घरात त्या व्यक्तीला मानाने व माणूस म्हणून राहता येईल. मनुष्यामनुष्यातील संबंध बरेचसे पैशाच्या पाठबळावर अवलंबून असतात. तेवढेच आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करता येईल. पुढे त्यामुळे काही लाभ मिळत असेल तर व्यवहारशास्त्राच्या दृष्टीने ते योग्यच होईल, तेवढेच संपत्तीचे चलनवलन घडून येईल, तेवढीच बचतीची सवय लागेल वगैरे अनेक मानवी भावना, बुद्धी, विचारांना पोषक असल्याने हुंडापद्धती आपल्या पूर्वजांनी बिनविरोध पसंत केली व ती थोड्याफार फरकाने आजपावेतो चालू आहे.

हुंडा वरपक्षाने द्यावयाचा की वधूपक्षाने द्यावयाचा हा प्रश्न समाजातील चालीरीती, स्त्री-पुरुषांचा दर्जा, प्रसंगी स्त्री-पुरुषांचे संख्याप्रमाण वगैरे बाबींवर अवलंबून राहून दोन्ही पद्धती आजही प्रचलित असलेल्या दिसतात. परंतु वधूपक्षाने वरपक्षाला हुंडा द्यावयाची पद्धतच मोठ्या प्रमाणावर रूढ आहे. विरोधही विशेषतः त्याच बाबतीत आहे. म्हणून यापुढील हुंड्याचा उल्लेख त्या संदर्भातच असेल.

वर सांगितल्याप्रमाणे लग्न हा बऱ्याच काळानंतर एकदा येणारा महत्त्वाचा प्रसंग असल्याने त्यावर अवाजवी खर्च करण्याची तयारी समाजातील फार खोलवरील थरापर्यंत आढळते. अर्थातच पातळीनुसार त्यात भिन्नता आढळते व त्यात बरीच विषमतेची दरी आहे. परंतु हुंडापद्धती मात्र उच्चवर्गीय श्रीमंत, उच्च व कनिष्ठ मध्यम वर्ग व इतर श्रीमंत यांमध्येच आढळते. येथे एक लक्षात घेणे आवश्यक आहे की, हुंडापद्धती हा धार्मिक विधी नाही. याउलट ती एक परंपरा आहे व सर्व कालखंडात तो देणाऱ्यांच्या व घेणाऱ्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनून राहिला आहे. हुंडा घेणारे तो आपला अधिकार समजतात व देणारे आपले कर्तव्य मानतात हेच हुंडापद्धतीच्या अबाधित अस्तित्वाचे सार (तात्पर्य, crux) होय.

हे अधिकारसूत्र व ही कर्तव्यदक्षता अनेक चित्रपट, नाटके, कथा वगैरेंतून आपणास पडताळून पाहता येते.

जोपर्यंत जवळ पैसा होता तोपर्यंत देणारेही हुंडा देण्यास खूष होते व घेणारेही दिलेल्यावर समाधान मानीत. परंतु ही परिस्थिती स्वातंत्र्यानंतर बदलली. कूळ कायद्यामुळे उच्चवर्णीय, विशेषतः ब्राह्मणांची शेती गेली व ते मोठ्या प्रमाणात शहरातून स्थायिक झाले. शिकून नोकरी, व्यवसाय करणे हाच मार्ग त्यांना राहिला. स्त्रियांनाही शिक्षण व पर्यायाने नोकरीसाठी घराबाहेर पडावे लागले. एकत्र कुटुंब-पद्धतीचा ऱ्हास झाला. शहरातील राहणीमान वाढत्या महागाईने खर्चिक बनले. जागेची टंचाई उद्भवली. एकेकाळी सुखवस्तू असणाऱ्यांना आर्थिक तोंडमिळवणीचा प्रश्न पडला. अशा परिस्थितीत लग्नखर्च व हुंडा हा वधूपक्षापुढे मोठा प्रश्न निर्माण झाला. आधुनिकीकरण व औद्योगिकीकरणाचे वारे सामाजिक नीतिनियम, मूल्ये व आंगवळणी असलेले विचार यावर फारसा परिणाम करू शकलेले नाहीत. आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाहास अजून फारशी मान्यता नाही, तरी देखील आंतरशाखीय विवाह पुरेसे रूढ झाले आहेत. खेड्यात मुलगी द्यावयाची तर तेथे एक तर हुंडा फार द्यावा लागतो व मुलगी शिकलेली असल्यास खेड्यात राहणे पसंत करीत नाही. शहरातील श्रीमंतांना द्यावयाची तर तेथेही हुंड्याचा व दर्जाचा प्रश्न येतो. कारण या घरातील मुले फार शिकलेली असतात व नोकऱ्याही भारदस्त असतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉक्टराची बायको डॉक्टरणीच पाहिजे, तेथे इतरांना वाव नाही. शिकलेली मुले नसली तरी आर्थिक पाठबळ असते. शहरातील मध्यमवर्गीयांना मुलगी द्यावयाची तर त्यांनाही पैशाची चणचण असल्याने ते हीच एक संधी मानून हुंड्याच्या रकमा वाढवितात. अशा प्रकारे पूर्वी आपल्याच दर्जाचे, संबंधांचे असलेले आज केवळ पैशाच्या कारणास्तव आपल्याशी संबंध ठेवण्यास तयार नाहीत असा मनातील

सल निर्माण होत आहे. परंतु त्याच वेळी हुंड्याची कर्तव्य-भूमिका अजूनही मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे पालकांचीही बचत चालू असते. मुलीही त्यासाठी नोकऱ्या करतात. हुंड्यावर कायद्याने बंदी घातली गेली तरी वरदक्षिणा नावाखाली होता तोच प्रकार चालू आहे. हल्ली वरदक्षिणा पैशाऐवजी वस्तुरूपाने उदा० वाहन, राहण्यास जागा वगैरे अधिक पसंत केले जातात. मुलगी नोकरी करणारी असली पाहिजे, व हुंडाही भरपूर पाहिजे. दिसायला सुंदर असेल तर हुंडा कमी असला तरी चालेल, दिसायला कमी असेल तर हुंडा अधिक पाहिजे वगैरे व्यवहार चालतात. परिस्थितीचा फायदा घेऊन हुंड्याची ठरलेली रक्कम लग्न लागेपर्यंत वाढवत राहण्याचीही उदाहरणे आहेत.

संसार चालविण्यासाठी पैशाची निकड असते. हा पैसा मिळविण्याच्या निरनिराळ्या मार्गांपैकी लग्नप्रसंगातून मिळणारा पैसा हा एक मार्ग होय. एकूण पैशाच्या गरजे-नुसार ही रक्कम वाढते. वरपक्ष हा अधिकाधिक हुंडा मिळविण्याच्या मागे असतो व वधूपक्ष हा चांगले घर मिळविण्याच्या मागे असतो. अर्थात त्यांच्या कार्यशक्तीस काही मर्यादा असतेच. परिणामी वरसंशोधन व वधूसंशोधन यांना लग्नाच्या व्यवहारात बाजारी स्वरूप येत आहे. मुली फार ठिकाणी दाखवायच्या नाहीत, मुलींची लग्ने फार लांबवायची नाहीत यासारखे प्राथमिक नियमही गुंडाळून ठेवावे लागत आहेत. बऱ्याच ठिकाणी नापसंती आल्यास मानसिक परिस्थिती बिघडण्याचा संभव असतो. स्त्रिया नोकऱ्या करू लागल्याने व त्या प्रमाणात इतर नोकऱ्या निर्माण न झाल्याने तरुणांवर बेकारीची समस्या आली आहे.

तेव्हा बदलत्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीच्या या काळात त्या बदलाने परिणामित झालेल्या समाजातील घटकांनी पूर्वापार चालत आलेली पद्धत चालू ठेवण्यात व त्यासाठी नीतिनियम गुंडाळून ठेवण्यात त्यांचीच हानी आहे. परंतु तरी देखील हा एक नाजूक प्रश्न आहे. "ताई कमी शिकलेली आहे व भोळी आहे म्हणून तिच्या लग्नाचा मोठा प्रश्न आमच्यावर आहे, परंतु बेबी मात्र शिकलेली असल्याने नोकरी करून तिचे ती जुळवून घेईल," हे पालकांचे सर्वसामान्य उद्गार त्या नाजूक परिस्थितीचे सूचक आहेत. येथे ताई ही पराधीन आहे व बेबी ही त्या प्रमाणात बरीच स्वतंत्र आहे. त्याचप्रमाणे तरुणांच्या बाबतीत दोन गट पाडता येतील. इतर कोणत्याही नाही तरी वधूपक्षाची भावनिकता व वरपक्षाची आर्थिक गरज या पायांवर हुंड्याची गरज ह्या पद्धतीचे विरोधकही नाकारू शकत नाहीत. अर्थातच हुंड्याची रक्कम असणार ती केवढी व


Step in for style at

**PATANGE BROTHERS TAILORS**

759/52 B, Deccan Gymkhana, Pune-4

**SUIT SPECIALISTS**

With Best Compliments From :

# M/s. Pioneer Processors

1847, Sadashiv Peth, Poona 30.
(Phone : 54596)
Dyers, Bleachers & Calico Printers
&
Suppliers of Sports Banians & Monogram

पुरणार किती दिवस! तरी देखील जेव्हा पैसा कमी असतो तेव्हा प्रत्येक रुपाया मोजला जातो. किमान आर्थिक गरजा जेव्हा पूर्ण होऊ शकतील तेव्हा अशा अपराधीन वधूवरांच्या लग्नातील हुंड्यास विरोध करण्यास आजच्यापेक्षा अधिक अर्थ व वेग येईल. परंतु हे नजिकच्या भविष्यकाळात शक्य नसल्याने स्वप्रयत्नावर संसार चालवू शकणाऱ्या व त्यामुळे हुंडा न मागणारे तरुण स्वागतार्हच आहेत. त्यानंतरचा मार्ग म्हणजे परिस्थिती समजून घेऊन कमी हुंडा मागणे. बरेचसे प्रेमविवाह हुंड्याशिवाय होत असले तरी प्रेमविवाह हा हुंडाविरोधाचा प्रायोगिक मार्ग होऊ शकत नाही. कारण एक तर सगळ्यांचे प्रेमविवाह होतीलच असे नाही व प्रेमविवाह यशस्वी होतातच असे नाही.

आज जे काही गट हुंडाविरोधी मोहीम हाती घेऊ इच्छितात तिच्या यशस्वितेची शक्यता मी डावलीत नाही. परंतु त्यासाठी काही मूलभूत गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. एकतर त्याचे विरोधाचे मार्ग बरेचसे मर्यादित राहतील. तरी देखील 'चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः' या नियमानुसार सुरुवात करण्यास हरकत नाही. दुसरे असे की, हुंडा-पद्धतीने त्रस्त झालेले देखील त्यात उघडपणे भाग न घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण असे की, वारंवार सांगितल्याप्रमाणे त्यामागची कर्तव्यभावना तीव्र आहे. तसेच हा त्यांच्या अशक्यतेचा (inability) प्रश्न येतो व ती उघड करण्यास ते तयार होणार नाहीत. सर्वात गंभीर प्रश्न आहे तो ज्यांच्याजवळ देवघेवीसाठी भरपूर आहे त्यांचा. हे लोक त्यांच्या जवळील पैसाच काढून घेईपर्यंत अनेक हुलकावण्या देऊ शकतील. शेवटी ज्या शिक्षित तरुणांच्याकडून ही मोहीम अपेक्षित आहे ते तरी किती प्रमाणात सहभागी होतील हा भाग निराळाच. थोडक्या श्रमात अधिक फायदा हे त्यांचे ध्येय बनू पाहात आहे.

तेव्हा हुंडापद्धती हा पैसा असताना प्रतिष्ठेचा, कमी असताना भावनेचा प्रश्न बनतो. अधिकार व कर्तव्य यांचा तो मिलाफ आहे. त्यामुळे त्याचा विरोध मात्र व्यक्तिगत प्रश्न राहतो. जेव्हा व्यक्तिव्यक्तीत नीतिमूल्यांची गुंतवणूक होईल तेव्हाच त्यांच्या उच्चाटनास मार्ग मिळेल. ही गुंतवणूक शिक्षणप्रसार, आर्थिक प्रगती यावर अवलंबून आहे.

## काही आधुनिक म्हणी

१. मिळविल्या मुलीला मागणी फार.
२. नटीला सर्दी चौकशीला गर्दी.
३. चुकलेले चिरंजीव चित्रपटगृहात.
४. चांदी गेली सोने गेले हाती चौदा कॅरेट आले.
५. जया अंगी मोठेपण त्या भेटणे कठीण.
६. आधीच महागाई त्यात आला बावई.
७. सरकार जेवू घालीना, पदवी भीक मागू देईना.
८. वर्गात रिपीटर शहाणा.

रवींद्र विश्वनाथ कुलकर्णी
प्रथम वर्ष साहित्य

अनेकविध, आकर्षक
* लग्न पत्रिका * व्हिजिटिंग कार्डस
* इन्व्हिटेशन कार्डस् * पाकिटे
* इनलँडस् साठी
नंदादीप
१७२ शनिवार पेठ, फुटक्या बुरुजाजवळ
पुणे ३०
● स्क्रीन प्रिंटिंग ● डाय स्टँपिंग ● फॉइल प्रिंटिंग

# डॉ. गुजर : एक ध्येयवेडा माणूस

विक्रम शिंदे व प्रदीप सिद्धये, तृतीय वर्ष वाणिज्य

—पुण्याहून सोलापूरमार्गे जायला लागलो की पुण्याची हद्द हडपसरपाशी संपते. त्याच हडपसरमध्ये महाराष्ट्र आरोग्य मंडळाची एक भव्य इमारत दृष्टीस पडते. मिशनरी वृत्तीने कामं करणाऱ्या या मंडळासंबंधी मला जी माहिती समजली, त्यामुळे त्याबद्दल माझी उत्सुकता आणखी वाढली व एक दिवस कुतूहलाने चौकशी करीत आम्ही दोघे थेट मंडळाचे कार्यवाह डॉ. दादा गुजर यांच्याशीच संपर्क साधला.

आधी भेटण्याची वेळ ठरवून नारायण पेठेतील त्यांच्या घरी सकाळच्या प्रहरी जेव्हा आम्ही गेलो तेव्हा एक 'फोन' आधीच त्यांची वाट पाहात होता. या गडबडीत सदैव मग्न असणाऱ्या डॉक्टरांना, आपण उगीचच त्रास देतो आहे असे वाटले. आमची जरा द्विधा मनःस्थिती झाली व पुन्हा भेटण्याची वेळ ठरवू असे त्यांना सांगताच त्यांनी "मला आताच थोडा वेळ आहे! नंतर काय खरं नाही!" – असे हसून उद्गारत चहाचे कप आमच्यापुढे केले. चहाचा घोट घेता घेताच आमच्या गप्पा सुरू झाल्या.

या महाराष्ट्र आरोग्य मंडळाची स्थापना १ जून १९६० रोजी पाच तरुण ध्येयवादी तरुणांनी केली, त्यात डॉ. दादासाहेब गुजर होते. त्यांचे सहकारी डॉ. शहा, डॉ. बाबा आढाव वगैरे तरुण डॉक्टरांनी अधिक कमाईकडे दुर्लक्ष करून ही कामगिरी पत्करली व समाजसेवेचे व्रतच आचरले.

"खरं म्हणजे आम्हांला हे केंद्र खानदेशात सुरू करायचे होते" डॉक्टर सांगत होते, 'पण डॉ. आढावांचा दवाखाना अगोदर हडपसरला होता व पुण्यापासून हडपसर जाण्यायेण्यासाठी सोयीचे. यामुळे ही जागा जास्त सोयीची वाटली. डॉ. आढावांनी स्वतःचा दवाखाना मंडळाला दिला. अनेक लोकांच्या पाठबळावर आज हे मंडळ यशस्वीपणे कार्य करीत आहे.

त्यांना मध्येच थांबवत मी विचारले, "आपल्या या कार्याला सरकारी स्तरावर नक्कीच सहकार्य झाले असेल!"

"छे! छे! अजिबात नाही! सुरुवातीला तर आम्हाला सरकारने कोणत्याच प्रकारे मदत केली नाही. 'हडपसरला दवाखान्याची जरूरीच नाही!' असे सरकारी उत्तर होते. पण अर्थात पुढे परिस्थिती पालटली. १९६५ नंतर थोड्याफार प्रमाणात आम्हांला सरकारी मदत सुरू झाली, पण अर्थात अजून आमच्या अपेक्षा आहेतच."

"सरकारी अधिकारी– जे ग्रामीण भागांसाठी आहेत– त्यांच्याकडून आपण काही काम करून घेऊ शकता का? कारण हे अधिकारी केवळ कार्यालयीन काम करतात. अशा तऱ्हेने चाललेली सरकारी पैशाची उधळपट्टी आपण आपल्या संस्थेच्या मार्फत काही प्रमाणात कमी करू शकाल काय?"

"नाही! पहिले कारण म्हणजे याबाबतीत काही सांगणे कठीण आहे व त्यांना तसे सांगण्याची authority आम्हाला नाही. फक्त जे काही काम करतील, त्यांना सहाय्य करणे एवढेच फक्त आम्हाला शक्य आहे."

समाजसेवा म्हणजे अनेक अडचणी! या अडचणी महाराष्ट्र आरोग्य मंडळाची उभारणी करताना डॉ. दादा गुजरांना आल्याच असतील. त्या संबंधी त्यांना विचारता. ते म्हणाले, "होय! पण प्रामुख्याने आम्हाला अडचण आली ती म्हणजे आर्थिक! अनेक वेळा आम्हाला लोकांकडून पैसे घेऊन आमचे खर्च करावे लागले. विशेषतः कुटुंबनियोजन शिबिराच्या वेळी आम्हाला दररोज १२०० रु. खर्च असायचा. सरकारी पैसे ६ आठवड्यांनंतर मिळायचे. त्यामुळे आम्हाला ४०,००० रु. ची सोय करावी लागायची. डॉक्टर मित्रांकडून ही रक्कम हातउसने मिळविली."

"आरोग्य व समाज-सुधारणा या एका वेळी होऊ शकतात काय?" या प्रश्नाला उत्तर देताना डॉक्टर म्हणाले, "अर्थातच! कारण आरोग्य व समाज सुधारणा एकमेकावर अवलंबून असलेली जीवनाची अंगे आहेत. सामाजिक जीवनाचा आरोग्य हा एक भाग आहे. शिक्षण हे आरोग्य सुधारण्याचे लक्षण नाही. त्यासाठी समाजशिक्षणाची

आवश्यकता आहे. आर्थिक परिस्थिती देखील आरोग्याशी निगडित आहे."

आम्ही जी N. S. S. ची शिबिरे घेतली, त्या वेळी स्थानिक ग्रामस्थ मंडळींनी आमच्या कामात फारसा उत्साह दाखविला नाही. कोणतेही सामाजिक कार्य करताना समाजाच्या सहकार्याची अपेक्षा व जरुरी असते. यात त्यांना कोणत्या अडचणी आल्या व ग्रामस्थांच्या या वागणुकीचे कारण काय हे विचारता डॉ. गुजर म्हणाले, "हे जे निरुत्साही वातावरण ग्रामीण भागात पसरले आहे, याचे मूळ कारण म्हणजे अस्वस्थता—frustration. कोणतेही काम करण्यात त्यांना उत्साहच वाटत नाही. त्यांचा 'आळस' हा जिवलग दोस्त बनला आहे. कामावर निष्ठा नाही व भविष्यकाळासंबंधी निराशा हेच कारण त्यामागे असू शकेल."

बोलता बोलताच डॉ. गुजरांना युरोपमधील लोकांच्या कामाच्या पद्धतीबद्दल आठवण झाली. ते नुकतेच युरोपच्या दौऱ्यावरून परत आले आहेत. तेथील समाजउभारणीबद्दल जे पद्धतशीर कार्य चालू आहे ते पाहून ते फारच प्रभावित झाले आहेत. तेथील लोकांची कामाबद्दलची निष्ठा, शिस्त व प्रामाणिकपणा यामुळेच ते आपल्या समाजाला उंच नेऊ शकले. हे गुण त्यांच्या रक्तातच आहेत. लहान मुले तेथे घडविली जातात. प्रत्येक २०–२५ मुलांमागे एक शिक्षक असतो. सामाजिक कर्तव्याची प्रत्येक नागरिकाला जाण असते.

'युवक अकादमी'—या नव्यानेच स्थापन झालेल्या संस्थेची माहिती सांगताना डॉ. गुजर म्हणाले, "या विभागाचे मुख्य कार्य म्हणजे ग्रामीण तरुणांना एकत्र आणून त्यांना योग्य दिशेने विकसित करणे, त्यांना 'संस्कारशील' बनविणे, शहरी व ग्रामीण तरुणांचा मिलाप घडवून आणणे, या बाबतीत N. S. S. चे विद्यार्थीसुद्धा बरेच काही करू शकतील.

"मी स्वतः N. S. S. चा विद्यार्थी आहे, त्यामुळे आमच्या व इतर कॉलेजच्या N. S. S. पथकांनी आपणाला जे थोडेफार सहकार्य केले त्यात आणखी कोणत्या प्रकारे भर घालता येईल" असे विचारता दादा म्हणाले,

"खरं सांगायचे म्हणजे कोणतेही कार्य हे जर सातत्याने व नियमित केले तर त्यात आपण यशस्वी होतो, N. S. S. चे विद्यार्थी सध्या जे कार्य करीत आहेत ते फारच तोकडे पडत आहे. त्यापेक्षा त्यांनी भरीव कामगिरी बजावली पाहिजे. अर्थात त्यांना वेगवेगळ्या स्वरूपाची पुष्कळ कामे करता येण्यासारखी आहेत. मी या बाबतीत नक्कीच आशावादी आहे! लायब्ररी, शेतीविकास, शालेय शिक्षण वगैरे अनेक गोष्टींतून N. S. S. चा सुशिक्षित विद्यार्थी साहाय्य करू शकेल. त्याच्या बुद्धीचा फायदा तो इतरांना करून देऊ शकेल."

पाचव्या योजनेत सर्व विद्यार्थ्यांना N. S. S. सक्तीची होणार आहे व त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या वाढेल पण कामाचा दर्जा मात्र राहणार नाही या माझ्या मताशी सहमत होताना डॉक्टर पुढे म्हणाले, "योजना या फक्त कागदावर असतात, पण त्याचे संयोजनच नीट होत नाही. त्यामुळे श्रमशक्तीचे विडंबन होईल व कामाचा दर्जा खालावेल व त्याचप्रमाणे सक्तीची समाजसेवा म्हणजे सेवाभाव नसणारे विद्यार्थी काम टाळण्याकडे प्रवृत्त होतील."

"माझ्या भविष्यकाळात काही योजना आहेत, पण त्या कार्यान्वित करण्यासाठी जिल्हा परिषद पातळीवरून प्रयत्न झाले पाहिजेत. युवक अकादमीची योजनाबद्ध वाटचाल मी ग्रामीण तरुणांविषयी बराच आशावादी आहे व थोड्या कालावधीत आम्ही बरेच कार्य करू शकू असा मला विश्वास आहे."

या ध्येयवेड्या माणसाकडे पाहिले म्हणजे त्याच्याकडून काहीतरी संदेश मिळविलाच पाहिजे असे मनात आल्यावाचून राहात नाही. एकाच कार्यासाठी अक्षरशः स्वतः झीज सोसून काम करणारी माणसे दुर्मिळच. आजच्या ध्येयहीन तरुणाला डॉक्टर दादा गुजरांचा एकच संदेश आहे :

"ध्येयाने प्रेरित होऊन जिद्दीने श्रम केले तर तरुणाला निश्चितच वाव आहे. केवळ नोकरीसाठी सर्व न करता काहीतरी धडपड करणे आवश्यक आहे."

हा संदेश घेऊन व त्यांच्या संदेशाने प्रेरित होऊनच आम्ही त्यांचा निरोप घेतला.

# फॅशन

◎

माणिक रामचन्द्र घोलप, पदवीपूर्व साहित्य

आमचं घर फार जुनंही नाही आणि फार नवीनही नाही. परंतु घर मात्र रस्त्याच्या कडेला आहे. आम्ही पाहिल्या मजल्यावर राहतो. आणि आमच्यासारख्याच इतर पुष्कळ इमारती आहेत. इमारती आल्या म्हणजे तेथे बायका, मुले, पुरुष, म्हातारे ही सर्व मंडळी तेथे आलीच. आमच्या घरासमोर रस्त्याच्या पलीकडच्या बाजूस एक निर्वासित कुटुंब राहते.

आमच्या समोरच्या त्या कुटुंबाकडे पाहिले की, त्या घरातील मुली आणि त्यांची एक एक नवीन तऱ्हेची फॅशन. चित्रपटाप्रमाणे त्यांच्या फॅशन बदलतात. आता तर थोड्या दिवसांपूर्वी पाहिलेल्या 'बॉबी' चित्रपटातील असलेल्या एका ड्रेसपैकी त्या मुलीने ड्रेस केला होता. आरशासमोर उभे राहून तिची रंगरंगोटी चाललेली होती !

आजच्या काळातील माणूस हा विचारी झाला आहे. हुशार झाला आहे. त्यामुळे काळाच्या पावलावर पावले ठेवून त्याच्या वागण्यात, आचार-विचारांत बदल घडू लागला आहे. तो जुन्या गोष्टी सोडून देऊन काळाच्या ओघाबरोबर जाऊ लागला आहे. त्यामुळे त्याच्या ड्रेसमध्ये नवनवीन फॅशन येत आहे. बेल्बॉटम पँट घालणे, साधू-सारखे केस वाढविणे. तोंडात नेहमी सिगरेट असणे. स्त्रियांसारखे मेकप करण्याचा प्रयत्न करणे, तर मुलींमध्ये पंजाबी ड्रेस, बेल बॉटम, लुंगी वगैरे निरनिराळे कपडे घालणे आणि चेहऱ्यावर स्नो-पावडर, ओठास लाली, हातापायांच्या बोटास लाली लावणे — यातच आजची ही तरुण पिढी आपले भूषण समजते. आपल्या या नैसर्गिक सुंदर शरीराला विनाकारण वैचित्र्य आणून आपले सौंदर्य वाढविण्याचा प्रयत्न करतात. परंतु हे सर्व करून फायदा काय ! उगीच काहीतरी करून मनाचे समाधान करून घेण्यात काय अर्थ ? तसे पाहिले तर याला कारण म्हणजे हल्लीचे अर्थ नसलेले शृंगारिक चित्रपट. त्यात नवीन काही दिसले की झालंच. लागले त्याप्रमाणे वागायला. एकामुळे दुसऱ्याने ती फॅशन उचलून धरावी आणि ती तिसऱ्याने. ह्या फॅशनकडे पाहिले की वाटते, आपली पूर्वीची चालत आलेली संस्कृती, संस्कार, धोक्यात तर नाहीत ना ?

फॅशनमुळे लोकांच्या मनात निरनिराळे विचार यावयास लागले. एखादी मुलगी अगर नवीनच लग्न झालेली स्त्री आपले सौंदर्य वाढविण्यासाठी अथवा आपल्याकडे रस्त्याने जाणाऱ्यांनी पाहावे या विचाराने ती स्त्री आपल्या शृंगारात जास्तीत जास्त वेळ घालवून नटेल-थटेल, दागदागिने घालील. त्यामुळे लोक तिच्याकडे थोडेच स्वामी विवेकानंदांच्या दृष्टीने पाहणार आहेत ? त्या स्त्रीने फॅशन केली म्हणूनच लोक तिच्याकडे पाहतात. भावी चांगला पती बरोबर असताना कशाला हा शृंगार ड्रेस ? कशावरून त्या लोकांनी समजावयाचे की, हिचे प्रेम पतीवर आहे का स्वतःच्या सौंदर्यावर का केवळ फॅशनवर ? लोकांना वाटते चांगल्या किमतीचे कपडे घातले म्हणजे

ART CENTRE

12, Budhwar Peth, Near N. M. V. High School, Poona 2

Dealers in : School & Office Stationary, Exercise Books, Drawing materials

मोठेपण मिळते. आपला दर्जा वाढतो, आणि आपल्याला समाजात मान मिळतो. परंतु खरे वैभव त्यात नसून ते त्यांच्या वागण्यात, गुणात, स्वभावात आहे. माणूस बाहेरील अलंकाराच्या ठेव्याने हुशार, मोठा मानला जात नाही तर त्याच्या अंतःकरणातील अलंकाराच्या ठेव्याने तो मोठा होतो.

रस्त्याने जाताना काही मुली चाललेल्या आहेत, आणि त्यांच्या विरुद्ध दिशेने काही मुले येत आहेत. त्या मुलींनी फॅशनेबल पॅन्ट, मुलासारखा शर्ट, घातला आहे तर दुसरीने मिनिस्कर्ट, तिसरीने लुंगी घातलेली असेल, तर मुले त्यांना काहीतरी उपमा देणारच! आणि संध्याकाळच्या वेळेस फिरावयास चाललेल्या काही मुलींच्या बाबतीतील नवलाची गोष्ट म्हणजे त्यांच्या डोळ्यांवर गॉगल पाहिला म्हणजे साहजिकच बघणारांची बोटे तोंडात जातात. उगीचच जगावेगळे काहीतरी करून दाखवायचे. मला तर वाटते त्या बिचाऱ्या फॅशनलाच किती लाज वाटू लागली असेल!

ही फॅशन पतिपत्नींच्या मध्ये शिरली. त्यांनीही फॅशनेबल राहण्याची सवय करून घेतली. पत्नीस वाटते पतीने नेहमी आपल्याला निरनिराळे कपडे, दागिने घेत राहिले पाहिजे. यातच तिला आपल्या पतीचे आपल्यावर प्रेम आहे असे वाटते. खरे पाहिले तर प्रेम ही भावना कधी लोकांना दाखवायची नसते, आणि नाही तरी ती दिसतच नाही. ती अशी गोष्ट आहे की, ती कधी विकत घेता येत नाही अगर त्याची किंमतही करता येत नाही.

Your Friend in need!

**Sahyadri Library**

Opp : Ayurveda Rasashala, Karve Road, Poona 4

**REMEMBER**

**HARDIKAR'S**

**NEW SHORTHAND & TYPEWRITING INSTITUTE**

**( For Efficient Training in Shorthand & Typewriting )**

**Recognised by Government**

**Fergusson College Road, Poona 4.**

**Phone No. 56786**

आपल्या सेवेस सादर * ग्रंथ हेच गुरू

**नवज्योति वाचनालय**

**३६३, आळंदी ( देवाची ), फ्रूटवाला बिल्डिंग**

**आमची वैशिष्ट्ये : भरपूर पुस्तके * अल्प वर्गणी**

**चालक : अनिल कवडे**

## Interview 'Extraordinary'
### Interview for the post of Vice-Chancellor.

Miss Chhaya Joglekar, S. Y. B. Com.

Government had appointed "All India Educational Service Commission" led by the Students' Union Leader, Mr. Buldozer, consisting of other students of all India disrepute. The Commission interviewed candidates for the post of a 'Vice-Chancellor' for an 'Ultra-Modern University.'

Please stand by for the questions put and the answers given during the interview.

Q. What are your non-academic qualifications ?

A. D. G. M., B. Sd. and M. M. H.

Panel : Please explain fully.

Candidate : D. G. M. stands for Diploma in Gherao Management. B. Sd. stands for bachelor of Self-defence. M. M. H. stands for Master of Mob-handling.

Q. What is your idea of an Ideal V. C. ?

A. He must be a boxer, an athlete, fencing expert and a good shot.

Q. How is all this necessary ?

A. He has to face his beloved students.

Q. What is your previous experience in these non-academic fields ?

A. I boxed with the students when they attacked me in my office. Knocked two of them unconscious with my left hook, gave three of them a black-eye and threw one out of the window.

Panel : Enough, Please. That will do.

Candidate : Thank you, Sir.

Q. How will you win the love of the Student Community ?

A. I shall abolish the evil of examinations. Then I shall ask them to give a declaration of their academic completion and issue them necessary certificates.

Q. Would you call the police force in the Campus, if you are confronted with the Morchas and Gheraos ?

A. Yes, just to train the force in mob psychology and protect the weaker students from the blows of their athletic professors.

Q. How would you protect the 'Versity Premises' on such occasions ?

A. There would be no premises to protect.

Panel : What do you mean ?

Candidate : It is going to be an open air University. All Campus and no building type.

Q. How will you save the University funds ?

A. I shall not pay the salaries of the professors and the staff.

Q. Why should the unpaid professors teach ?

A. They need not.

Q. How will the students learn ?

A. They need not.

Q. In that case there will be no intellectuals to guide the country.

A. They can be imported.

Q. What are your ideas of Students 'Welfare'?

A. Adult movie per week, Chicken for the non-vegetarians and 'Good Meals' for others, twice a week, Beer/Sharbut on alternate days and the required brands for the smokers daily.

Q. What would you do for the external students?

A. I shall send by Registered Post a Degree Certificate to any external student if he sends us an ordinary post card and instructs us to send the necessary certificate.

Q. Who will bear the postage?

A. Charity funds will be raised.

Q. What would be your attitude towards the subordinates?

A. There shall be no subordinates but all will be the Vice-Chancellors on Equality principle.

Q Salary Expectations?

A. Not in cash but in kind.
Two meals a day, a few sets of Bell-bots and Gurus and an underground residence.

Q. Why underground residence?

A. For security reasons.

Q. What would be your message to the students on a Convocation Day?

A. 'Fight for a University at each District and a College at each village and finally agitate for abolishing all the Universities and Colleges under Law!'

Panel: Congratulations. We unanimously select you for the post of Vice-Chancellor. We are confident, under your able guidance the Ultra-modern Versity shall ever flourish, serving the cause of education.

Candidate: Thank you, Sir.

MOST-UP-TO-DATE
Fashionable & Reliable
TAILORING MEANS

Bengal Tailors

1170/4, Jangli Maharaj Road,
Near Modern High School
POONA-5.

M/s. PARA CHEMICALS
176-2, Parvati, POONA-9.

Manufacturers of Fine and
Perfumery Chemicals

Yara-Yara; Ciramic Acid.
Silver Nitrate, Boric Acid EL.

*With Best Compliments From —*

**SHAIL SCIENTIFIC INSTRUMENTS Co.**

510, Kalbadevi Road, Bombay – 2

# “माझ्या व्यवसायातील अनुभव”

डी. एन्. निसाळ, द्वि. व. साहित्य

परिस्थितीमुळे मला व्यवसाय करावा लागतो दुधाचा. व्यवसाय अखंड कष्टाचा, कधीही सुटी नाही. बारा महिने थंडी, ऊन, वारा आणि पावसात काम करायचं, दिवसभर दूध घालणे आणि कॉलेजचा अभ्यास करणे, विश्रांती अशी कधीच नाही. शिक्षणासाठी हा व्यवसाय करायचा निर्धार केला आहे. परिस्थितीला शरण न जाता प्रयत्नांची पराकाष्ठा करून तिच्यावर मात करायची जिद्द बाळगली आहे. आलेल्या संकटांना न घाबरता वीरोदत्त वृत्तीने सामोरे जाऊन त्यातून आपला मार्ग मोकळा करायचा, ही तीव्र इच्छा आहे. कॉलेजचं रंगेल, स्वप्नाळू जीवन आणि माझा हा गवळीबुवाचा धंदा यांचा मेळ नाही. पण मला लाज वाटत नाही, उलट मला त्याचा रास्त अभिमान वाटतो. स्वतःच्या पायावर उभं राहून आपण शिक्षण घेत आहोत यात कमीपणा कसला? हे स्वावलंबी जीवन मला अधिक प्रिय आहे.

माझा व्यवसाय नित्याचा असल्याकारणाने साहजिकच अधूनमधून कंटाळा येतो. व्यवसायामुळें मित्रमंडळीच्या सहवासात गप्पागोष्टी करण्यास मुळीच वेळ मिळत नाही. तसा योगायोग आला तरी फार वेळ गप्पागोष्टी करणं परवडत नाही. अभ्यासाची चिन्ता पाठीशी असते, तरी पण आनंद मानावा अशाही गोष्टी माझ्या या व्यवसायात घडतात. व्यवसायामुळे माझा अनेक जातीच्या, धर्माच्या लोकांशी अगदी जिव्हाळ्याचा संबंध जोडला गेला आहे. त्यांचे रीति-रिवाज, सण-समारंभ, भाषा-पेहराव इत्यादी गोष्टींबद्दल थोडीफार माहिती मिळाली आहे, उदा० मद्रासी लोक दुधाला ‘पाल’ म्हणतात. मुसल्मान लोक शिरा या पदार्थास ‘सोजी’ म्हणतात.

माझ्या पाहण्यात काही झोपाळू आणि आळशी गिऱ्हाईकांचे प्रमाण जरा जास्तच आहे. मी सकाळी ६ वाजता गिऱ्हाईकांचे घरी दूध घालण्यासाठी जातो, त्यावेळी दाराशी बरणी टेकविली की प्रथमतःच दोन-तीन माणसांचा घोरण्याचा आवाज ऐकू येतो, मग मनाशी ठरवितो की या कुंभकर्ण बंधूंना जागं करायचं म्हणजे दरवाजाची कडी जोराने वाजविली पाहिजे. कडीचा आवाज ऐकू आल्यानंतर हळूहळू सर्वजण जागे होतात, पण दूध कोण घ्यायला जातो याची प्रत्येकजण वाट पाहतो. यातच एक-दोन मिनिटे जातात. नंतर एकमेकाला धक्के देऊन शेवटी एकजण आळोख्या-पिळोख्या देऊन व पापण्यांची उघडझाप करीत लाईट लावतो. फळीवर असेल ते भांडे घेऊन येतो व अगदी जवळ आल्यानंतर ती व्यक्ती म्हणते ‘अहो! दूधवाले जरा थांबा हं हे भांडे घासलेले नाही दुसरं आणतो.’ तोपर्यंत आपण तेथेच हाताची घडी घालून उभं राहावे!

काही गिऱ्हाइके थट्टेखोर वृत्तीची असतात. त्यांच्या थट्टेमुळे मला खरोखरच एकप्रकारचा आनंद मिळतो. विशेषतः लहान मुलं आणि स्त्रिया जास्त थट्टेने बोलतात. ‘अहो! दूधवाले म्हशींना पाणी कमी पाजा’ ही त्यांची नेहमीची थट्टा. मीही काही कमी नाही. म्हणतो, ‘आता तेही परवडत नाही कारण दुष्काळामुळे पाण्याची फार टंचाई निर्माण झाली आहे; तेव्हा म्हशीला पाण्याऐवजी हल्ली दूधच पाजीत असतो!’

कित्येकदा चार-पाच वर्षाची लहान मुलं तर फारच मजा करतात. मोठी माणसं एखाद्या महत्त्वाच्या कामात गुंतलेली असली की, चटकन् दुधाचं भांडे घेवून येतात आणि दूध घेवून अर्ध्यावाटेत जातात न जाता तोच दुधाचं भांडे निसटून खाली पडतं आणि मूल मोठ्यानं ओरडतं. त्याच्या ओरडण्याचा आवाज ऐकून घरातली माणसं घाई-घाईने बाहेर येवून बघतात तो हा पराक्रम! मग त्याच्या पराक्रमाची चीड येवून आई त्याला एखादी चपराक ठेवून देते. काही मुलं गुपचुप येतात आणि बरणीचे झाकण लपवून ठेवतात नाहीतर कधी कधी दुधाचं माप बरणीत फेकून घरात पळून जातात.

एकदा घाईघाईत पावसामध्ये गिऱ्हाइकाच्या घरी दूध घालण्यासाठी गेलो तेवढ्यात त्यांच्या घरातील एक दहा वर्षाचा मुलगा चटकन माझ्या जवळ येऊन म्हणाला, ‘अहो दूधवाले मस्तपैकी पाऊस पडतोय थोडा वेळ बरणीचे झाकण उघडं राहू द्या म्हणजे दुधाची लेव्हल वाढेल.’ मला त्याच्य

बोलण्याचं हसू आलं आणि त्याचं कौतुक करावसं वाटलं. असेही काही विनोदी प्रसंग वारंवार घडतात व मनाला एकप्रकारचा आनंद व उल्हास मिळतो.

सकाळी साडेसात वाजता कॉलेजला जायचं असतं आणि तशात गिऱ्हाइकांकडून अशाप्रकारचा उशीर होतो. तरीपण घाई घाईने दूध घालून नंतर आंघोळ करून, कपडे बदलून कॉलेजला जातो, मात्र एखाद्या दिवशी कितीही घाई केली तरी पहिला तास गमवावा लागतो. कॉलेजमध्ये आल्यानंतर तेथील आल्हाददायक आणि आनंदी वातारण माझा सर्व शीण नाहीसा करते. मनाला एकदम प्रसन्नता वाटते. कॉलेजचे तीन तास कधी संपतात ते कळून देखील येत नाही. एखाद्या दिवशी ऑफ तासाला कॉलेजमधील आणि माझ्या क्लासमधील विद्यार्थी मित्रांशी गप्पागोष्टी करण्याची संधी मिळते. कधी कधी हॉलीबॉल, फूटबॉल इ. खेळ खेळायला मिळतात.

कित्येक वेळेला गिऱ्हाइकांची आणि माझी भांडणं होतात. कारण दूध कधी उशिरा येतं. काही वेळेला दूध नासतं तर कधी कधी दुधाचे खाडे होतात. परंतु सर्वच गिऱ्हाइके भांडखोर नसतात. काही गिऱ्हाइके अतिशय प्रेमळ आहेत. काही लोक माझ्याशी अतिशय आपुलकीने वागतात. रविवारच्या दिवशी तर मुद्दाम आग्रह करून थांबवितात. चहा वगैरे देतात आणि ४।५ मिनिटे मनमोकळेपणाने गप्पागोष्टीही करतात. उलट काही गिऱ्हाइके आपल्या शेजाऱ्यांची व्यंगे सांगतात. माझी मात्र कुचंबणा होते. दोन्हीही गिऱ्हाइक या नात्यानं मला सारखीच असतात. माझे मन कुणाबद्दल वाईट होऊ नये किंवा त्यांचेही आपल्याबद्दल वाईट मत होऊ नये यासाठी त्यांच्या बोलण्याकडे विशेष लक्ष न देता दूध घालून निघून जातो: नाहीतर एकमेकाला माझ्याबद्दल संशय येतो. त्यांचा गैरसमज होतो. मी काही सनातनी लोकांनाही दूध घालीत असतो. त्यांचे सोवळ्याचे प्रकार अद्यापही स्पृश्य-अस्पृश्य, श्रेष्ठ-कनिष्ठतेची जाणीव करून देतात. कारण मी ज्यावेळी त्यांच्या घरी दूध घालण्यासाठी जातो त्यावेळी आजूबाजूच्या वस्तू, कपडे दूर सारून ठेवणे, दूधाचे भांडे हातात न देता जमिनीवर ठेवणे वगैरे अनेक प्रकार पाहावयास मिळतात. अर्थात सोवळं वाईट आहे असे मी म्हणत नाही परंतु त्यांच्या पाठीमागची धार्मिक श्रद्धा, सद्हेतू लक्षात न घेता सोवळ्याच्या नावाखाली दुसऱ्यांना तुच्छ अगर कमी प्रतीचं लेखून सोवळ्याचे महत्त्व कमी करू नये. नाहीतर इतरांच्या मनामध्ये सोवळ्याबद्दल तिरस्कार आणि वाईट भावना निर्माण होते. तसे न होण्यासाठी प्रथमतः उच्च वर्गीय लोकांनी उच्चनीच्च असा भेदभाव न बाळगता समाजातील प्रत्येक व्यक्तीशी आपुलकीने आणि सहानुभूतीने वागावे असे मला वाटते.

कधी कधी दूधभट्टीवरही जावे लागते. तेथील वातावरण काही वेगळेच असते. सकाळी सहावाजल्यापासून ते दुपारी दीड वाजेपर्यंत दुधाचा व्यापार चालतो. निरनिराळ्या ठिकाणावरून अनेक गवळी दुधाच्या घागरी घेऊन येतात. दूध खरेदी करण्यासाठी शहरातील लोकांची सारखी ये जा चालू असते. काही गवळी लोक सकाळी दूध घेऊन आल्यानंतर साधारणपणे तीन-चार तास दूधविक्री करून दूध संपल्यानंतर घरी जाण्यास निघतात. काही जण एकादा तास अर्धातास ठाण मांडून बसतात. मग विडी; सिगारेटस विशेषतः तंबाखू खात खात मस्तपैकी गप्पागोष्टी करीत बसतात. त्यानंतर लहर आल्यास सिनेमाला जाऊन बसतात. गवळी लोकांना सिनेमापेक्षा तमाशाचे फार वेड असते. आठवड्यातून दोन-तीन तमाशा, नाटके पाहणे; कधी कधी दारू पिणे इत्यादी प्रमुख सवयी त्यांना असल्याकारणाने त्यांच्यामध्ये प्रगती घडून येत नाही. केलेल्या श्रमाचा त्यांना पुरेपूर उपयोग करून घेता येत नाही. आणि त्यांच्या डोळ्यापुढे ध्येये अशी कसलीच नसतात.

दूध तपासण्यासाठी सरकारी इन्सपेक्टर नेमलेले असतात. असे इन्सपेक्टर अचानक दूधभट्टीवर दूध तपासणीसाठी आल्यावर गवळी लोकांची अतिशय धांदल उडते. प्रत्येक जण इन्सपेक्टरच्या तावडीतून सुटण्याच्या प्रयत्नात असतो. काहीजण गुपचूप दुधाच्या घागरी परत सायकलीला बांधून भट्टीवरून पसार होतात, इन्सपेक्टर मात्र दूध तपासण्याच्या हेतूने न येता गवळ्याचे खिसे तपासण्याच्या उद्देशाने येतात आणि त्यामुळे अंदाधुंदीचे कारभार चालूच असतात. दुधाचा व्यवसायच असा आहे की जेथे पाणी हे अत्यावश्यक आहे. कोणताही गवळी विगर पाणी दुधाचा व्यापार करीत नाही. एकंदर परिस्थितीच अशी आहे की प्रमाणिकपणाने वागून चालत नाही.

काही वेळेला भट्टीवर गिऱ्हाइकांची आणि गवळ्यांची भांडणे होतात, कारण प्रत्येक गिऱ्हाइकाला गवळ्याकडून

ताजे निर्भेळ विशेषतः घट्ट दूध हवं असतं. याउल्ट गवळ्याला आपल्या पाणीदार दुधाचे जास्त पैसे (दुधाचा भाव) हवे असतात. त्यामुळे तो गिऱ्हाईकांना दूध चांगलं आहे, निर्भेळ, घट्ट आहे असे सांगतो. अर्थात तो गिऱ्हाइकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करतो. मात्र प्रत्यक्षात दूध सांगितल्याप्रमाणे नसल्यामुळे गिऱ्हाइकांच्या मनात असंतोष, चीड निर्माण होते व त्यामुळे भांडणे उद्भवतात.

मी दिवसातून तीन वेळेला दूध घालीत असतो. सकाळी दुपारी आणि सायंकाळी त्यामुळे शारीरिक कष्ट फार होतात, थकवा येऊन निवांत झोपून राहावसं वाटतं, परंतु कॉलेजच्या अभ्यासाची चिंता पाठीशी असल्यामुळे विश्रांती कसली आणि झोप कसली! फक्त रात्री ११ ते पहाटे ५॥ वाजेपर्यंतच जी काही झोप मिळते तीच विश्रांती समजावी. दिवसभर दूध घालणे आणि अभ्यास करणे यामुळे इतर ठिकाणी म्हणजे सामुदायिक खेळ, गप्पागोष्टी किंवा सिनेमा याकडे माझा ओघ फारच कमी असतो. परंतु याबद्दल मला कधीच वाईट वाटत नाही.

Entrust Your
Typewriters For
Servicing / Repairs
To :
**Master Typewriter Repairers**
Opp : CommonWealth Bldg.
Poona 30

# 'गोतावळ्या'तील नारबा

[प्रा. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीतील 'नारबा'चे व्यक्तिचित्र]

सौ. हेमा लेले, तृतीय वर्ष साहित्य

नारबा हाच कादंबरीचा नायक असला तरी ही कादंबरी केवळ त्याची कथा नव्हे! तर त्याच्या प्रमाणेच मालकासाठी आयुष्यभर राबणाऱ्या गुराढोरांचीही कथा होय! ज्या प्रमाणे आजूबाजूच्या व्यक्तींचा, परिस्थितीचा नायकाच्या आयुष्यावर बरावाईट परिणाम होत असतो तसाच या जनावरच्या अस्तित्वाचा, आयुष्याचा नारबाच्या मानसिक जगतावर फार सूक्ष्म परिणाम घडत असतो. जनावरांच्या आयुष्याची संपूर्ण कर्मकथा समोर ठेवता ठेवताच लेखक नारबाच्या आयुष्याचे, त्याच्या मनातल्या भावावेगांचे धागेदोरे, त्याच्या आयुष्यातला रितेपणा, त्याच्या जीवनातील निरर्थकपणा हळूहळू उलगडतो आणि त्याचं व्यक्तिचित्रण आपोआपच दुहेरी स्वरूपात आपल्यासमोर उभे राहते.

नारबाच्या आयुष्याचा एकच अर्थ आणि तो म्हणजे मालकासाठी राबणे! त्याने आपल्या आयुष्याला स्वतःहून दिलेला दुसरा कोणताच अर्थ नाही. किंबहुना त्याची विचारशक्तीही तेवढी नाही. गुरं जशी त्यांच्या नशिबानं अथवा कमनशिबानं मालकाच्या दाव्याला बांधली गेली तसाच नारबाही! गुरांच्या आयुष्याचा अर्थ जसा मालकासाठी मेहनत करणे आणि गरज संपली की मालक करेल ती व्यवस्था मान्य करून शेवटचे दिवस कंठणे तोच नारबाच्या आयुष्याचा अर्थ! मालकासाठी राबतांना त्याच्या तारुण्यसुलभ भावना कधी कधी वर येतात पण मालकाला त्याची पर्वा नाही. लग्न झाल्यावर गडी असा राबवून घेता येणार नाही म्हणून मालक त्याला आशा दाखवून ठेचलेल्या बैलासारखा पाळतो! माणूस असूनही जनावरात जगायचं नि जनावरासारखं जगणं असूनही माणूस नाही!

अशा विचारांनी तो कधी कधी अस्वस्थ होताना दिसतो. पण दुसरं ध्येय घेऊन जगण्याची इच्छा नाही. जे चालू आहे तसेच आयुष्य नाकासमोर पाहून कंठायचं ! नारबाचं व्यक्तिमत्त्व असं एखाद्या गुरासारखंच, अस्तित्वहीन !

मालकाचा मळ्यात ट्रॅक्टर आणायचा निर्णय मात्र नारबाचं मानसिक विश्व पार उलट-पालट करून टाकतो. आपल्या मायेच्या पोराबाळांसाठी जपलेली जनावरं हळूहळू गोतावळ्यातून कमी व्हावयास लागतात आणि नारबा आतून क्रमाक्रमानं ढासळायला लागतो. स्वतःच्या आयुष्याचा निरर्थकपणा त्याला हळूहळू जाणवायला लागतो. आयुष्यभर दूध देणारी टिक्की म्हैस मालक अखेर खाटकाकडे नेतो !

आंधळ्या घोड्याला वाळका भुस्सा टाकताना आपल्या पोराचीच उपासमार निमूटपणे पाहावी लागल्यासारखा तो गलबलतो. तो पाय घसरून खोल विहिरीत पडल्यानंतर नारबाची विलक्षण तगमग होते. घोड्याच्या मरणानंतर नारबा म्हणतो, "फुडं फुडं ते आपून घोडं हाय हेच इसरून गेलं असणार! कारण जवळपास बसाय, उठायला दुसरं एखादंबी घोडं न्हाई ! सगळी ढोरंच त्येच्याबरोबर. जेवाय-खायचं. वैरण कांजी खाऊन मातीच्या रंगीत घोड्या गत गप बसायचं!" नारबा जणू काही इथे स्वतःबद्दलच बोलत होता.

चंपी कुत्री, नाम्या कुत्रा नि त्यांची पिल्लं यांच आपापसातलं एखाद्या कुटुंबातल्या सारखं प्रेम नारबा अलिप्तपणे पहायचा. गुरांचा संसार त्याच्या डोळ्यासमोर फुललेला. त्यांचा गोतावळा वाढलेला. नारबा मनानंच त्यांच्यापैकी एक झालेला. तरीही तो एकटाच. गोतावळ्याशिवाय. या कुत्र्यांच्या नशिबात असलेलं प्रेम करायचं भाग्यही त्याच्या वाट्याला नाही. त्याला स्वतःचे विश्वच नाही. जनावरांनाही आपलं काही आयुष्य होतं, नाम्या कुत्रा मालकाच्या विनवण्यांना न जुमानता कुत्री मेल्यावर झुरून मेला. जनावरांनीही आपला गोतावळा वाढवला. नारबा एकटाच जनावरांपेक्षा दुर्भागी !

तो प्रेम करतो फक्त गुरांवर, शिवारांवर ! त्याच्या मनात ते मावत नाही. पीक येतं जातं ! तोही एक दिवस जाणार गणतीच नसल्या सारखा ! हे त्याला जाणवतं. पण यातून बाहेर पडायचा विचार त्याच्या मनात येत नाही. गुराढोरांवर, शिवारावर जीव जडलेला हा गडी त्यांनाच आपलं आयुष्य मानतो.

आपलं एकलकोंडं मन जपत त्याच्यावर होणारे आघात सोसत तो तसाच जगत राहतो.

निसर्गाचं दर्शन घेऊन हरपून जातो ! फुललेल्या निसर्गाकडून आपलं आयुष्य फुलवण्याचा आशीर्वाद मागतो. कधी कधी चरायला सोडलेल्या गुरासारखं मोकाट सुटावसं त्याला वाटतं. पण पुन्हा एखाद्या प्रामाणिक जनावरासारखा मालकाच्याच आज्ञेत आपल्या इच्छा मारून कामाला जुंपतो.

हळू हळू नारबाच्या भोवतालचा गुरांचा गोतावळा कमी होतो. त्याला रिकाम्या खोपीसारखीच, गोठ्यासारखीच रितेपणाची सवय होते. म्हातारी गाय पांजरपोळात सोडून आल्यावर रित्या मनात तो चांगभलं म्हणून आवाज घुमवतो. 'मनात नसतानाच मन फुटून वर आलं' असं म्हणतो. त्याच्या मनात उलघाल होत असूनही रिकाम्या खोपीसारखा निरुपाय होऊन तो कुठेतरी अलिप्तही असतो.

तारुण्यात पदार्पण केलेल्या सळसळत्या पोराकडे बापानं कौतुकानं पाहावं तसं कोंबड्याकडे मायेने पाहणाऱ्या नारबाला त्याला मारताना डोळ्यानं पाहावं लागतं. इथे नारबा मात्र म्हणतो की मन कवाच फाटून गेलं ! त्याला झोप येत नाही. त्याला खोप पहिल्यांदाच सुतक आल्यासारखी दिसते. म्हाळिंग्या बैलाचा मृत्यू पाहून तर नारबा बाप मेल्यासारखा खचतो. रिकाम्या गोठ्यात बावरलेली तीन गुरं ! त्यांना हा काय दिलासा देणार ! अखेर ट्रॅक्टर आल्यावर नारबाच्या आयुष्याचा एकमेव अर्थही त्याच्याखाली भरडून निघतो. ड्रायव्हरच्या हाताखाली काम करणं त्याला जमत नाही. गुराढोरांच्या मनातले भाव ओळखणाऱ्या नारबाला यंत्राची निर्जिव धडपड समजत नाहीनं. ट्रॅक्टर फाडलेल्या जमिनीसारखं, त्याचं मन फाडून निघतं 'सोसवत नाही तर चालता हो !' हे मालकाचे उद्गार ! जन्मभर राबलेल्या आपलं आयुष्य भावना मारून त्याच्या पायावर वाहिलेल्या नारबाला उद्देशून काढलेले मालकाचे हे उद्गार त्याचं मन पार उसवतात. तो सैरभैर होऊन पार कोसळतो.

नारबाचं हे व्यक्तिचित्र आपल्याला फार अस्वस्थ करते. अर्थातच लेखकाची शैलीही त्याला कारणीभूत आहे. ग्रामीण भाषेत लिहिलेली ही कादंबरी कोणत्याच दृष्टीने प्रकटीकरणात कमी पडलेली नाही. नारबाच्या व्यक्तिचित्राप्रमाणे

लेखकाच्या शैलीचे सामर्थ्यही मोठे आहे. प्रामुख्याने त्याची वर्णनशैली चित्रदर्शी आहे. सूक्ष्म आहे. तिला अनुभूतीची खोली निश्चित आहे.

कादंबरीत यंत्रयुगाच्या चाहुलीमुळे आपला गोतावळा हरवून बसलेला आणि शेवटी त्यांसारखीच विकल अवस्था झालेला नारबा समोर येतो. परंतु यंत्रयुगाचे दुष्परिणाम सांगणारी ही कादंबरी नव्हे. नारबाचे उध्वस्त मानसिक जीवन हा यंत्रयुगाचा एक अपरिहार्य परिपाक होय. त्याला इलाज नाही. शेतावर आयुष्यभर राबणाऱ्या एका गड्याचं हे प्रातिनिधिक चित्र. पुढारलेल्या जगाचा, मालकाचा व्यवहार त्याला कळत नाही. गुरांवर वेड्यासारखी माया करतो. त्यांच्या जाण्यानं क्रमानं खचतो नि अखेर आपलंही हेच होणार या विचारानेही तो बेचैन झालेला असतो. नारबाच्या बाबतीत जे जे घडतं ते आपोआप! त्याला कोणाचा इलाज नसतो. खरं पाहता विशेष काहीच घडत नाही. पण नारबाचं मन उद्ध्वस्त होतं व अखेर त्याचीही हकालपट्टी होते. मालकाचाही दोष नसतो नि गुरांच्या गोतावळ्यात रमलेल्या नारबाचाही इलाज नसतो. जगाच्या दृष्टीने त्याला किंमत नसते. हे आपल्याला जाणवत असतं तरीही नारबाच्या आयुष्यात या घटनांना असलेलं महत्त्वही समजत असतं. या विरोधाभासातून नारबाचं व्यक्तिचित्र अधिकच करुण बनत जातं.

एकामागून एक प्रसंग आपल्या समोर ठेवून लेखक नारबाचं व्यक्तिचित्रण करीत जातो. नारबाच्या मनाचे एक सुंदर पण करुण आणि सहानुभूती निर्माण करणारं चित्रण म्हणजेच ही कादंबरी! मालकाबरी राबणाऱ्या गुरांबद्दलही आपल्याला सहानुभूती वाटते. आपण अस्वस्थ होतो पण नारबाच्या नि त्यांच्या आयुष्यातील साम्य बघून आपण अधिक अस्वस्थ होतो नि अस्तित्ववादाचा पुरस्कार करणाऱ्या या युगातील अस्तित्वहीन पण अस्वस्थ करणाऱ्या नारबाच्या कर्मकहाणीला एक यशस्वी ग्रामीण व वास्तव कादंबरी म्हणून न्याय देतो.

---

## देशादेशांतील सधनता

जगातील विविध देशांमध्ये किती माणसामागे एक मोटार, एक टेलिफोन, एक रेडिओ आणि एक डॉक्टर आहे त्याचे प्रमाण खालीलप्रमाणे :—

| देश | मोटार | टेलिफोन | रेडिओ | डॉक्टर |
|---|---|---|---|---|
| अमेरिका | ३ | २ | १ | ८०६ |
| कॅनडा | ४ | ३ | २ | ९२७ |
| ऑस्ट्रेलिया | ५ | ५ | ४ | ८५४ |
| फ्रान्स | ८ | १० | ४ | १,००४ |
| ब्रिटन | ९ | ६ | ३ | १,०३० |
| प० जर्मनी | १३ | ९ | ३ | ७०७ |
| ब्राझील | ११३ | ६४ | १४ | ६,४६२ |
| सिलोन | १२० | २६७ | ६४ | ४,७०१ |
| जपान | २२२ | १७ | ६ | ९४१ |
| बर्मा | १,१२३ | १,५२४ | १८० | २८,६०९ |
| भारत | १,५४५ | ९९० | २०१ | ४,९९७ |
| पाकिस्तान | १,७९१ | १,१६५ | ३६३ | १,४८४ |

## शुक्रवारचे हुतात्मे

| महान व्यक्तीचे शुभनाम | मृत्युस्थळ | मृत्युदिन | वार |
|---|---|---|---|
| १. गौतम बुद्ध | कुशीनगर | इ.स.पू.४८७ | शुक्रवार |
| २. येशू ख्रिस्त | जेरूसलेम | ३।४।३३ | ,, |
| ३. रामदास स्वामी | परळी | २।१।१६८२ | ,, |
| ४. राजा राममोहन रॉय | ब्रिस्टोल | २७।९।१८३३ | ,, |
| ५. स्वामी विवेकानंद | बेलुरमठ | ४।७।१९०२ | ,, |
| ६. फिरोजशहा मेहता | मुंबई | ५।११।१९२५ | ,, |
| ७. पंडित मोतीलाल नेहरू | अलाहाबाद | ६।१।१९३१ | ,, |
| ८. विठ्ठलभाई पटेल | जिनीव्हा | २२।९।१९३३ | ,, |
| ९. महात्मा गांधी | दिल्ली | ३०।१।१९४८ | ,, |
| १०. श्री रमण महर्षि | अरुणाचल | १४।४।१९५० | ,, |
| ११. सरदार वल्लभभाई पटेल | मुंबई | १५।१२।१९५० | ,, |

संकलक : विनायक सदाशिव छत्रे, प्रथम वर्ष शास्त्र.

# Leontief's contribution to Economics

Miss Padmini Joglekar, S. Y. B. Com.

Prof. W. W. Leontief is the seventh economist to be honoured by the world. He has been awarded the Nobel Prize in Economic Science for 1973. He is 67. This Russian born economist is a professor in Harvard University. The Swedish Academy announcing the award paid the following tribute to him, "Prof. Leontief is the sole and unchallenged creator of the input-output technique. This important innovation has given to economic science an empirically useful method to highlight the general interdependence of the production system of a society."

### The Input-Output Analysis

It is an improvement over general equilibrium analysis of Leon Walras. The economy is said to be in a state of general equilibrium if the supply of every commodity is equal to demand for it. The Input-Output Analysis is somewhat different from this' the difference being that it represents an elaborate modern attempt to put actual as opposed to hypothetical, quantities in the general equilibrium framework.

The Input-Output analysis deals exclusively with production. Demand theory has no room in it. The final demand sector is taken beyond the purview of production economy.

The second distinctive feature is the empirical nature of its investigation. Here, statistical measurement of input and output of all industries is taken together in an interdependent system of commodity flows.

The Input-Output analysis stresses the general equilibrium phenomenon. It takes into account the interdependence of the production plans and activities of many industries which constitute the economy. This interdependence arises out of the fact that each industry employs output of other industries as its own input. The output of it is used as input of some other industry.

The above analysis takes us to the basic problem as to what can be left over for final consumption. Also to be found is the quantily of each output that will be in the course of productive activities, in order to obtain these net outputs. A satisfactory answer to this, provided by the analysis is (1) Predicting future production require-

## नोबेल पारितोषिक विजेते



हेन्री किसिंजर प्रा. लेआंटिफ डॉ. जोसेफसन

ments if usable demand estimates can be obtained. (2) Economic planning including economic problems of underdeveloped countries and problems of military mobilisation and (3) Providing a detailed structure for national income accounting.

The practical example of the analysis is as follows. To make a ton of steel requires capital, labour, coal, iron, oil to transport the coal, rubber for tyres of trucks that bring materials, lumber and glass in the office building of the steel mills and so forth. In other words, part of coal industry's total output goes into input for steel industry. Likewise, part of the steel industry's output enters as input for the coal industry in the form of trucks, machinery and other equipments at the mines. All these complex relationships are put together in a typical output table.

If any one of the figures of input or output changes, it can change almost every figure. For example, if the amount of oil in the Total Economy should be suddenly reduced, this would have an effect on the output of steel, which would affect output of autos, which would affect the output of coal and lumber and farms etc. Thus Input-Output table lets economists guess what the repercussion of each option are.

The major criticism against Leontief's input output analysis is to his assumptions which are even more extreme than those usually employed in theoretical model. One assumption states that no two commodities are produced jointly. Each industry produces only one homogenous output. Perhaps, a really serious limitation is the assumption that in any productive process, all inputs

are employed in rigidly fixed proportions and the use of these inputs extends proportionately with the level of output.

### The Leontief Paradox

The principal finding of statistical computation for the year 1947 is paradoxical. These figures showed that an average million dollars worth of the United States exports embodied considerably less capital and somewhat more labour than an equivalent amount of United States competitive imports.

He urged that the United States is not relatively better supplied with capital than the other nations when one takes into account the superior physical effectiveness of American labour, that one American worker is as effective as, say, three foreign labourers.

### Leontief's Contributions in other fields

Leontief's contribution in other fields is also significant. His 'Essays in Economics: Theories and Theorising' (1966) is a collection of his writing covering a period of 30 years. Many of these articles concern practical problems which were topical at that time.

All the above analysis has shown that Leontief is not only original but also controversial. This is what it should be. Whenever a new idea or hypothesis is put fotrth, it should receive the best possible testing, so as to withstand the ravages of time and scientific enquiry. In this respect, Leontief stands out as a brilliant economist whose conitribution has made the science of economics what it is the queen of social sciences.

*

## डॉ. किसिंजर

१९७३ चे शांतता नोबेल पारितोषिक अमेरिकेच्या डॉ. हेन्री किसिंजर यांना बहाल करण्यात आलेले आहे. मार्टिन ल्युथर किंग (१९६४) आणि दाग हॅमरशुल्ड (१९६१) या व्यक्तींचा हे पारितोषिक मिळविणाऱ्यांमध्ये समावेश आहे. किसिंजर यांनी आंतरराष्ट्रीय शांतता निर्माण होण्यासाठी जे प्रयत्न १९६९ पासून केले त्यासाठी हा मान त्यांना मिळालेला आहे. १९६९ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून नेमणूक झाल्यापासून अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाची जवळजवळ सर्व सूत्रे त्यांच्या हाती आली. तेव्हापासून त्यांनी जी महत्त्वाची कामगिरी आंतरराष्ट्रीय राजकारणात बजावली आहे त्यात व्हिएटनाममधील युद्ध थांबविण्याच्या कामी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा समावेश करावाच लागेल. सतत साडेतीन वर्षे त्यांनी या कामी श्रम घेतले व एकूण बोलण्यांच्या व बैठकांच्या २४ फेऱ्या घेतल्या. त्यांतून शेवटी वर्षानुवर्षे चाललेले व्हिएटनाममधील युद्ध थांबले आणि अमेरिकेने आपले सैन्य मागे घेतले. यामुळे आशिया खंडात शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने फार मोठे पाऊल पडलेले आहे.

त्यानंतर उल्लेख करावा लागेल तो त्यांनी अमेरिका व चीन यांच्यात घडवून आणलेल्या समझोत्याचा. गेली कित्येक वर्षे या दोन राष्ट्रांमध्ये असलेले वैर व वितुष्ट आता संपुष्टात आलेले आहे. निक्सन यांची पेकिंग भेट किसिंजर यांच्या प्रयत्नातून जन्मलेली होती. साम्यवादी चीन आता सुरक्षा समितीचा सभासद बनलेला आहे. लोकशाही पाश्चिमात्य देशांशी त्याचे सलोख्याचे संबंध प्रस्थापित होऊ लागलेले आहेत. कडेकोट बंदोबस्त असलेल्या पेकींगचे दरवाजे आता सहकार्यासाठी खुले झालेले आहेत.

किसिंजर यांच्या यशामध्ये त्यांनी रशियाशी जोडलेले नवीन संबंधही अत्यंत महत्त्वाचे आहेत. रशिया व

अमेरिका या दोन महासत्तांमध्ये सलोख्याचे वातावरण प्रस्थापित करणे, त्यांच्यात देवाणघेवाण वाढविणे यामध्ये किसिंजर यांचा वाटा सर्वांत मोठा आहे. त्यांनी ब्रेझनेव्ह यांची अमेरिका भेट घडवून आणली आणि त्या भेटीनंतर साम्यवादी जगात व लोकशाही जगात सहकार्याचे संबंध स्थापन झालेले आहेत.

जर्मनीमधील एका खेड्यात शाळामास्तराच्या घरी जन्मलेला हेन्री ज्यूविरोधी वातावरणात वाढला. हिटलरच्या राजवटीमध्ये मोठे हाल सोसावे लागले किसिंजरच्या कुटुंबियांना. वडिलांना नोकरीवरून कमी केले होते. हेन्रीला त्याची शाळा सोडून द्यावी लागली होती. शेवटी १९३८ साली या कुटुंबाने जर्मनी सोडली व अमेरिकेत आपले स्थान मांडले. हेन्रीला न्यूयॉर्कमध्ये रात्रीच्या शाळेत शिक्षण घ्यावे लागले. दिवसा फॅक्टरीमध्ये शरीरश्रमाचे काम पैसे मिळविण्यासाठी त्याला करावे लागले. १९४२ मध्ये हेन्रीने सैन्यात प्रवेश केला. तेथे जर्मन भाषेच्या ज्ञानाच्या जोरावर त्यास दुभाषा म्हणून काम करायला मिळाले. ही नोकरी संपल्यावर हेन्री हार्वर्ड विद्यापीठात आला व १९५० मध्ये पदवीधर झाला. त्यानंतर चार वर्षांनी त्यास डॉक्टरेट पदवी मिळाली. १९५४ मध्ये त्याच विद्यापीठात त्याने शिकविणे सुरू केले. अमेरिकेच्या शासनाच्या निरनिराळ्या समित्यांचा सल्लागार म्हणून त्याची नेमणूक झाली.


हार्वर्ड विद्यापीठात असतानाच किसिंजर यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणावर पुस्तके प्रसिद्ध करायला सुरुवात केली. त्यांच्या पहिल्या पुस्तकाचे नाव आहे Nuclear Weapons and Foreign Policy. या पुस्तकांत व The Necessity for Choice आणि The Troubled Partnership या पुस्तकांत किसिंजर यांनी आंतरराष्ट्रीय स्थैर्य निर्माण करण्यासाठी लष्करी सत्तेमध्ये समानता कशी जरूर आहे हे स्पष्ट केले आहे. याशिवाय A world Restored, Strategy and Foreign Policy इत्यादी पुस्तके किसिंजर यांनी लिहून प्रसिद्ध केलेली आहेत. या त्यांच्या लिखाणामध्ये व इतर लेखांमध्ये किसिंजर यांनी आपले आंतरराष्ट्रीय राजकारणावरील, परराष्ट्रीय धोरणावरील व युद्धशास्त्रावरील विचार मांडलेले आहेत.

किसिंजर सध्या आपल्या मोठ्या बंगल्यात एकटेच राहतात. १९६४ मध्ये त्यांनी आपल्या पत्नीपासून घटस्फोट घेतला. त्यांना दोन मुले आहेत. उंची चवदार जेवण त्यांना आवडते. आपण कसे दिसतो याकडे ते लक्ष देत नाहीत. बुद्धिबळ हा त्यांचा आवडता खेळ आहे. दिवसात १८ तास काम करण्याची त्यांना सवय आहे.

सध्या किसिंजर हे अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट (परराष्ट्रखात्याचे चिटणीस) आहेत. अलीकडेच त्यांनी इस्राईल व अरब राष्ट्रांत समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रखात्याचे चिटणीस या नात्याने किसिंजर आपल्या विचाराप्रमाणे अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आखीत आहेत. शांतता पारितोषिक ज्यासाठी त्यांना मिळाले ते कार्य करण्यास त्यांना फार मोठे क्षेत्र व सत्ता मिळालेली आहे. त्यांचा उपयोग करण्यास ते समर्थ आहेत.

## पॅट्रिक व्हाइट

यंदाचे वाङ्मयाचे नोबेल पारितोषिक पॅट्रिक व्हाइट या आस्ट्रेलियन लेखकास मिळाले आहे. २८ मे १९१२ रोजी त्यांचा जन्म लंडन येथे झाला. आस्ट्रेलियातील सिडनी येथे त्यांचे प्राथमिक व दुय्यम शिक्षण झाले. पुढे केंब्रिज विद्यापीठातून १९३५ मध्ये ते पदवीधर झाले. त्यांची १९३९ मध्ये Happy Valley ही पहिली व १९४१ साली The Living and the Dead ही दुसरी कादंबरी



पॅट्रिक व्हाइट

प्रकाशित झाली. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी शाही विमानदलात काम केले. युद्ध संपल्यानंतर ते आस्ट्रेलियामध्ये परतले व तेथे २५ मैलांची जमीन खरेदी करून शेती व पशुपालनाचा जोड व्यवसाय त्यांनी सुरू केला. काही काळ त्यांनी लेखन बंद ठेविले. परंतु १९५५ साली अमेरिकेत प्रसिद्ध झालेल्या The Tree of Man यां कादंबरीमुळे त्यांना अमाप लोकप्रियता व प्रसिद्धी मिळाली. Voss, Riders in the Chariot, The Solid Mandala, The Vivisector, The Eye of the Storm या नंतरच्या त्यांच्या यशस्वी कादंबऱ्यांनी त्यांना जागतिक कीर्तीचे लेखक म्हणून मान्यता मिळाली. वरील कादंबऱ्यांखेरीज चार नाटके व त्यांचा एक कथासंग्रहही प्रसिद्ध आहे.

## डॉ. ब्रिऑं जोसेफसन

नोबेल पारितोषिक विजेत्यांत ३३ वर्षांचे जोसेफसन हे सर्वांत तरुण संशोधक होत. इलेक्ट्रॉनिक्स या विषयात त्यांचे नाव यापूर्वीच गाजले आहे, आणि या क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व इतके मोठे आहे की, ओहम्, फॅरडे आणि अगदी अलीकडील प्रसिद्ध संशोधक गन (Gunn) यांच्याप्रमाणेच ब्रिऑं यांचेही नाव आता ज्ञानकोशातून झळकल्याशिवाय गत्यंतरच राहिले नाही. गन यांनी इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रातील एका महत्त्वाच्या शोधातील एक कोडे सोडविता सोडविता डॉ. ब्रिऑं यांनी एक नवीनच शोध प्रस्थापित केला. काही विशिष्ट परिस्थितीत विजेचा दाब वाढविल्यानंतर वीजप्रवाह वाढण्याऐवजी कमी होतो, हे या शोधाने त्यांनी सिद्ध केले आहे. या त्यांच्या शोधाने इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रात फार मोठे परिणाम घडून येणे साहजिकच आहे.

आपणांस आमच्या शुभेच्छा :

**कराची स्वीट सेंटर**

डेक्कन जिमखाना पोस्टासमोर; पुणे ४.

फोन : ५४७८५

आमची वैशिष्ट्ये :–

* श्रीखंड * मलई बर्फी * स्पेशल पिस्ता बर्फी * फ्रुट बर्फी * बंगाली स्वीटस् * सामोसा * कचोरी

For Best Loudspeaker System

Contact :

**KHODE RADIO**

Loudspeaker Specialists

Laxmi Road, Near Vishrambagwada
POONA-30

Phone : 57944



# डॉ. हुजुरबझार : प्रखर प्रज्ञा—जातिवंत जिव्हाळा

पुणे विद्यापीठातील गणित व संख्याशास्त्राचे वरिष्ठ प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. व. शं. हुजुरबझार यांना भारतीय गणराज्यदिनी 'पद्मभूषण' हा किताब भारत सरकारने बहाल केला. त्या निमित्ताने त्यांचे विद्यार्थी प्रा. चंद्रकांत कुलकर्णी यांनी करून दिलेला परिचय.

डॉ. हुजुरबझारांचा जन्म १५ सप्टेंबर १९१९ रोजी कोल्हापूर शहरी झाला.

१९३६ साली ते मॅट्रिक झाले. गुणानुक्रमे ते जुन्या मुंबई इलाख्यात चवथे आले. विद्यापीठाची सर ली ग्रँड जेकब स्कॉलरशिप आणि नरहर रावजी विडकर शिष्यवृत्ती या दोन्ही शिष्यवृत्त्या त्यांनी मिळविल्या.

१९४० साली मुंबई विद्यापीठाची बी. ए. ची ही पदवी प्रथम वर्गात संपादन केली. १९४२ साली ते बनारस हिंदू विद्यापीठाची M. A. ही पदवी प्रथम क्रमांकाने पहिल्या वर्गात मिळविते झाले. शास्त्र व साहित्य शाखांतील सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांत पहिले आल्याबद्दलचे कुलगुरूंचे सुवर्ण-पदक त्यांना मिळाले.

१९४९ साली त्यांना केंब्रिज विद्यापीठाची Ph. D. पदवी मिळाली. त्यावेळी त्यांनी Sir Harold Jeffreys यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. मुंबई विद्यापीठाने त्यांना सर मंगलदास नथूभाई तांत्रिक शिष्यवृत्ती दिली तर बनारस हिंदू विद्यापीठाने होळकर फेलोशिप दिली आणि जे. एन्. टाटा निधीतर्फे त्यांना परदेशातील अभ्यासक्रमासाठी म्हणून शिष्यवृत्ती दिली. त्यांचा Ph. D. चा प्रबंध " Properties of sufficient statistics ह्या विषयावर आहे.

१९४३ ते १९४६ ह्या अवधीत ते कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये गणिताचे व्याख्याते होते. १९४६ ते ४९ मध्ये केंब्रिज विद्यापीठात त्यांनी संशोधन केले. १९४९–५० ह्या वर्षी त्यांनी गणित व संख्याशास्त्राचे रीडर म्हणून आसाममधील गोहत्ती विद्यापीठात काम केले. १९५० ते ५२ ह्या वर्षात ते मुंबई सरकारच्या ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक्स अँड स्टॅटिटीक्स, ह्या विभागात सॅम्पलींग एक्सपर्ट म्हणून होते. १९५२–५३ ह्या वर्षी ते लखनौ विद्यापीठात संख्याशास्त्रातील रीडर म्हणून होते. त्यानंतर म्हणजे १९५३ पासून पुणे विद्यापीठात गणित व संख्याशास्त्राचे विभागप्रमुख म्हणून ते काम पाहात आहेत.

ह्या अवधीत त्यांच्या मार्गदर्शनाखाली कितीतरी विद्यार्थ्यांनी गणित व संख्याशास्त्रातील डॉक्टरेट मिळविली आहे. त्याचबरोबर त्यांनी स्वतःचे असेही संशोधनकार्य चालू ठेवले आहे. शुद्ध गणित, संभाव्यता, संख्याशास्त्र ह्या ज्ञानशाखांमध्ये आपल्या बऱ्याच संशोधनपत्रिकांच्या ( Research papers ) सहाय्याने भर घातली आहे. संभाव्यता आणि संख्याशास्त्रीय अनुमान पद्धती, ह्या विषयामधील त्यांच्या संशोधनाने तर ह्या विषयांच्या क्षेत्रात नवी दालने उघडली आहेत. त्यांचे हे संशोधन जगातल्या

ह्या विषयावर लिहिल्या गेलेल्या अधिकारी व्यक्तींचा पुस्तकातून संदर्भ म्हणून आलेले आहेत.

' संभाव्यता ' ह्या विषयातील त्यांच्या संशोधन कार्याबद्दल १९५९–६० सालाचे जागतिक बहुमानाचे अत्यंत दुर्मिळ असे " ॲडॅम्स पारितोषिक " केंब्रिज विद्यापीठाने त्यांना दिले. हे पारितोषिक मिळविणारे ते तिसरे भारतीय होत. त्यांच्यापूर्वी हे पारितोषिक मिळविणारे भारतीय म्हणजे स्वर्गीय डॉ. एच. जे भाभा आणि अमेरिकेतील प्रखर बुद्धिमत्तेचे ज्योतिर्वैज्ञानिक डॉ. एस. चंद्रशेखर होत. त्यांच्यानंतर हे पारितोषिक मिळविणारे भारतीय शास्त्रज्ञ म्हणजे त्यांचे भाचे डॉ. जयंत नारळीकर हे होत.

१९६२ ते ६४ मध्ये त्यांनी आयोवा स्टेट युनिव्हर्सिटी (U. S. A.) मध्ये पाहुणे प्राध्यापक म्हणून काम केले. तेथे त्यांनी Properties of Sufficient Statistics मध्ये संशोधन केले, त्याला अमेरिकेच्या नॅशनल सायन्स फौंडेशनची संशोधन देणगीच्या रूपाने मान्यता मिळाली. निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठात आणि परिसंवादात त्यांनी निमंत्रित म्हणून व्याख्याने दिली. १९७० साली शास्त्रीय सहकारासाठी नेमलेल्या भारत-रशिया संयुक्त मंडळाचे सभासद म्हणून त्यांनी रशियास भेट दिली. १९६६–६७ साली ते भारतीय सायन्स कॉंग्रेस असोसिएशनच्या संख्याशास्त्र विभागाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९७१ साली आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्रीय संस्थान (हेग, नेदरलॅंड) चे सभासद म्हणून निवडून आले.

निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांना आपल्या फेलोशिप्स दिल्या. भारत सरकार, युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट्स कमिशन, आणि विविध वैज्ञानिक संघटना ह्यांच्या निरनिराळ्या तज्ञांच्या सल्लागार मंडळामध्ये त्यांनी बहुमोल कामगिरी केली.

ते म्हणजे एक प्रखर प्रज्ञेचे व्यक्तिमत्त्व आहे, त्यांचा विद्यार्थी जीवनातील कालखंड उज्ज्वल यशाने भरलेला आहे. त्यांच्या संशोधन कार्याने गणित व संख्याशास्त्रात नवीन क्षितिजे निर्माण केलेली आहेत, निरनिराळ्या मंडळामध्ये गौरवपूर्ण कामगिरी करून त्यांनी देशसेवा साधली आहे, पुणे विद्यापीठाच्या गणित व संख्याशास्त्र विभागाला त्यांच्यामुळे एक आगळे आणि आदराचे स्थान प्राप्त झाले आहे. U. G. C. च्या प्रगत अध्ययन केंद्रांच्या योजनेखाली ह्या विभागाची १ एप्रिल १९७२ साली निवड झाली आहे. एवढी मोठी व्यक्ती आमच्या सारख्या सर्वसाधारण विद्यार्थ्यांशी जेव्हा आस्थेने, अगत्याने वागते, ममतेने चौकशी करते, त्यावेळी मन भरून येते.


पुण्यातील एकच जुने व प्रसिद्ध

काका हलवाई

केशरी पेढे, वेफर्स व चिवडा, आंबा, बदाम व खवावर्फीचे स्पेशॅलिस्ट

हे. ऑ. : बुधवार पेठ, श्री दत्त मंदिराजवळ, पुणे–२

शाखा : लकी रेस्टॉरंट शेजारी, डेक्कन जिमखाना पुणे–४

हेड ऑफिस : ५७८६८ ब्रॅंच : ५७८६७

## कविता

### कृपावंता

कृपावंता माझ्यावरती कृपा केलीत पुरे झाले !
दोन हात कशासाठी वाऱ्यावरती उभे केले ?
चांदण्या असत्या होत्या तेव्हा काजळ घातलेत डोळी
जितेपणीच मरणाइतकी खोल केलीत खोली
तुम्हीच दिले सावलीच्या बांधुलीसोबत ऊन
पायातले काटे रुजून झाले माहीत जून
बदलणाऱ्या मोसमासारखे कापीत येतात रान
तरी बरे...फुलासारखा फुलत ठेवला राग
खरे तर ओठावरचा जार चाळण्याआधीच
प्रीतीच्या वीणेत 'विषय' ओवीत होतात गीत
नको नको म्हणत माझे ओझे झाले मला
कृपावंता दोवाऱ्याचा खेळ पुरे झाला !
सूर्य आल्यात धरून बसे किती काळ फिराल
रिती रिती ओंजळ अशी किती रिती कराल ?
देणाऱ्याचे हात खरे हात कोरून घावात
कृपावंता दिसाऊचेच हात तुम्हास येतात.

### चंद्र बदलताना

चंद्र बदलताना पाहू नये प्रीतीची सोय
नाही तर अंगार होतात आरसे.
एक ... दोन ... नऊ ... दहा ...
अनेक चंद्र फूल बदलतील तेव्हा
आभाळ मोकळे होईल म्हातारपणाला.
आरश्याची ठिणगी विझताना
लुकलुकतील तारे ... ओळखीच्या दिशातले
चंद्र बदलताना. नवीने.

कल्याण इनामदार

### मंज़िल का दीवाना

मैं मंज़िल का दीवाना
ज़िन्दगी की राहों से गुज़रते हुए
ढूँढ रहा हूँ हर मोड़पे ठिकाना।
मैं मंज़िल का दीवाना ॥

वक्त कह रहा ज़िंदगी कम है
है जबतक साँस तबतक दम है
देखो हर उलझन सुलझाकर
हकीकत क्या और क्या भरम है

बुलन्द इरादों का यही है कहना।
मैं मंज़िल का......

कितना है हँसीं बहारों का मंज़र
फिर भी चुभता है वीरानों का खंजर
कैसा होगा सफर कश्ती को लेकर
क्यों न हो तूफ़ाँ में समुंदर

डूबने से पहले है बच जाना
मैं मंज़िल का......॥

अजय झाडबुके, बी. ए. प्रथमवर्ष

### एक ही बार !

दुनियाकी बगियामें सावन एक बार आए
डाली के फूलोंपर बहार एक बार आए
फूल खिले, फल भी फलें, ऐसी जवानी हैं
जाओ पिया लेके जिया, रानी दीवानी है।
बहारोंके होनेतक नजारोंके रहनेतक
प्यार करो, प्यार करो
क्यों दुनिया में आकर चले ही जाना है।
जाओ पिया लेके जिया, रानी दीवानी है।
कुछ भी गया अगर दिया, नहीं फिर आते वो है।
जाओ पिया लेके जिया, रानी दीवानी है।

कु. ज्योति कुलकर्णी, बी. ए. प्रथम वर्ष

## तीन कविता

### १. निष्पर्ण वृक्षावर...

माझी फुटकी स्वप्नं जुळवायला,
समोर
आठवणींचा आरसा धर;
खूपच आहेत ती माझ्याजवळ,
तुला
जमलं तर एकत्र कर.
गळून गेलीयत् सगळी पानं, जरासं पाणी दे;
कदाचित
फुटेल अजून कोवळी फांदी कुठेतरी शेंड्यावर.
लावून तरी बघ दिवा, घासून दोन दगड;
कदाचित
प्रकाशाची तिरीप पडेल या दमट अंधारावर.
दिसेल तुझी ही प्रतिमा यात,
नीट
नजर ठेव आरशावर;
नीट नजर ठेव आरशावर, केव्हातरी
अचानक
त्याची सावट पडेल जीवनावर

### २. जा !

जा याच क्षणी,
जराही वेळ लावू नकोस.
परत आस लागेल तुला
याची, त्याची
अमक्याची, तमक्याची.
परत वाट पहाशील तू
तिच्या एका भेटीची,
अन् त्याच्या दोन शब्दांची.
परत थांबावसं वाटेल तुला
त्या दोन घासांसाठी, अन्
त्या प्रेमळ आशीर्वादासाठी.
परत मागे फिरशील तू
पाय त्याचे धरण्यासाठी, अन्;
निरागस हास्यात गुरफटून त्या,
घालवशील हा क्षण; क्षणासाठी.

### ३. जनरल

एकटा गाठून त्याला
पंधरा जणांनी घेरलं,
निजलेल्या त्या व्याघ्राशी
कोल्ह्यांनी रण माजवलं.
पंधरा 'वीरांच्या' कळपाने
'एका' कळपाला वेढलं,
पंधरा शिपुरड्यांनी केलं
ते त्याला नाही जमलं.
कुत्र्यांच्या या दुनियेनं मात्र
त्याला पायदळी तुडवलं,
पंधरा विजयी कुत्र्यांना अन्
शिरावरी मिरवलं.

राजीव कुलकर्णी, द्वि. व साहित्य

## गुलाब !

गुलाबी वस्त्रातली ती
काश्मीरी गुलाबच दिसते
डोळे समाधान साठविण्यास असमर्थ
पुनः पुनः पाहूनही
केसांची केवडा फणी
डोंबणारे सर्पच दिसती.
गुणगुणणारे शब्द तिचे
स्वप्नातील गाणे ऐकवात

जाधव ए. बी., पदवीपूर्व साहित्य

क्या लिखे हम ?
कि और कुछ लिखना
इस कागजके नसीबमें नहीं
क्या कहें हम ?
कि और किसी तरहसे आना
लफ्जों के बसमें नहीं
कहीं ऐसा तो नहीं
कि लफ्ज हमारे बसमें नहीं !
सच है कि,
तकदीर हमारे बसमें नहीं

कु. ज्योति कुलकर्णी, बी. ए. प्रथम वर्ष

## मुबारक तुझ को

हम तो तुझे सदा याद करते रहेंगे
हर वीराना आबाद करते रहेंगे।
सजती रहे महफिल सदा तेरे दरबार की
और लुटती रहें खुशियाँ हर त्योहार की

ऐ आसमाँ ! हर सितारा मुबारक तुझको
ओ माँझी रे ! हर किनारा मुबारक तुझको

तुम्हारे चमन खुशबू से महकते रहेंगे
तुम्हारे गान सितारों-से दमकते रहेंगे
तुम पूरी हर मुराद करते रहोगे
हर वीरान को आबाद करते रहोगे

ऐ दिलदार ! हर दिलदार की मुहब्बत
मुबारक तुझको
ऐ वफ़ादार ! हर वफा की इबादत
मुबारक तुझको ॥

अजय झाडबुके, बी. ए. प्रथम वर्ष

## प्रोलेडे — लक्षण

प्रोफेसरांचे आठवावे रूप
लेक्चररांचा आठवावा प्रताप
डेमॉन्स्ट्रेटरांचे ऐकावे खूप,
भूमंडळी ॥ १ ॥

प्रोफेसर बुद्धीचा मालक
लेक्चरर सर्वसाधारण चालक
प्रॅक्टीकलला डेमॉन्स्ट्रेटर पालक
समर्थ ऐसा ॥ २ ॥

कैसे यांचे बोलणे
कैसे यांचे चालणे
जोक करून स्वतःच हसणे
अलौकिक ॥ ३ ॥

आम्हाला बोलावी कारण नसताना
म्हणे वर्गात लक्ष असते ना !
का यायचे आहे पुढील वर्षी याच वर्गा
आता काय हे बोलणे ? ॥ ४ ॥

एक्स्ट्रा-पिरीयडला बोलावी आम्हा
त्या वेळी असूनी भूवरी जणू स्पर्शी नभा
झोपला असोन राही उभा
ऐसा योगी न दुजा ॥ ५ ॥

संजय थिटे, पी. डी. सायन्स

## रे गुलाबा

रे गुलाबा,
तू कधी फुलूच नकोस.
आणि जर ...
फुललासच कधी तर
प्रेमी जनांशिवाय कोणाच्या
नजरेलाच पडू नकोस !

सुरेशचंद्र पाध्ये, तु. व. वा.

## प्यादं

आपल्या प्रेमाच्या डावात
मी होतो बुद्धीबळातल्या
प्याद्यासारखा.
एकेक घर सरळ जाणारा
पण तू आलीस
आणि एक घर चुकून
मी तिरका आलो!
लवकरच तुझ्या चालीप्रमाणे
तू सोडून गेलीस मला
पुढच्याच घरट्यात!
माझी झेप छोटी होती
तू जात होतीस अडीचात
मी, प्यादं!

शरद् पोंक्षे, तृतीयवर्ष वाणिज्य

## सत्य?...!

काचेमागचा पारा
उडवून टाका!
प्रकाशामागची ज्योत
विझवून टाका!
कपड्यांची शिलाई
फाडून टाका!
डोळ्यांवरचे चष्मे
फोडून टाका!
ती काच,...तो अंधार,...
ती नग्नता,...ते आंधळेपण,...
असेल तुमच्या अंगात
शक्ती...
सत्याचा सामना करण्याची
तर येऊ दे, सारे जगासमोर,
वाभाडे काढणाऱ्या...!

जर जिंकलात तुम्ही...
तर सर्वश्रेष्ठ ठराल!
मात्र...
मात्र तुम्ही निर्लज्ज असता कामा नये!

सुरेशचंद्र पाध्ये, तृ. व. वा.

## तेथेच बरे निवांत

काय?...सम्राज्ञे...कलिके
जाऊ म्हणतेस विश्वात...मध्ये
नको...! ऐक मज
हे डोंगरी राज्यच बरे तुज
उंच शिखरी निर्मळ हवेत
भृंगांच्या समवेत...एकटीच गात
हाच छान तुज नाद
नितळ जलात तूच तुज...
कधितरी रिझवाया
मन दुःखितांचे,
जगास विटलेल्यांचे...अनेक
वियूनच निरखण्यात सद् आनंद
तू निष्पाप, निष्कलंक...
तेथेच बरे निवांत...!
येऊ म्हणतेस या विश्वात...?
तर आहेत येथे पापी, कलंकी
सारेच काही...गढूळ!
तू सौंदर्या, कोमल कलिका
ओढतील तुज ही यंत्रे
हे दारूडे फिस्कारूनि दात
हेटाळतील...चिरडून टाकतील
पाहुनि असे, किडे पडतील माथ्यात
सारेच काही खोटे...
परतशील पुनश्च, म्हणशील...
...आपले डोंगरी राज्यच बरे
की जेथे...निर्मळ जल, हवा शांत
स्वच्छ असा एकांत
तेथेच बरे निवांत...

सुहास शं. निर्मळे, एफ्. वाय्. बी. कॉम्.

## अशांत

धुंद मंद गंधात जगाच्या
मी असतो शांत शांत, पण ...
फुललेली बकुळ निसर्गाची
जेव्हा मिसळते श्वास
श्वासात पवनाच्या तेव्हा
वाट माझी नित्याची
जाते बुजून, आणि मी
बुजलेल्या वाटेवर
होतो अधिकच श्रांत, अधिकच श्रांत
तशातच एक झुळुक भूतकाळाची
मोहवणारी, वेधणारी
हळुच बोचते हृदयाला
आणि मी होतो शब्दहीन, रंगहीन
अशांत, अशांत ......

अजित दरेकर, प्रथमवर्ग साहित्य

## मी !

एका बिंदू भोवतालच्या अंगणात
मी आंधळी कोशिंबीर खेळतो आहे
अंगणाला भिंत नाही
पण ठराविक अंतरापुढे
मला जाता येत नाही
मी असंख्य अगणित तंतूंनी
या बिंदूला जखडलो आहे
बहुदा मीच हे धागेदोरे
गुंतवून घेतले असतील
— कोळ्यासारखे
किंवा मला कुणीतरी बांधलं
बांधून ठेवलंय बिंदूला !
बिंदू !
त्याला आडो नाही
लांबी नाही
उंची पण नाही
आहे फक्त अस्तित्व
तरी मी बांधला गेलोय !
बिंदूला
बिंदूला कुणी काही म्हणा
परमेश्वर ... दैवी शक्ति
काही हो
पण बिंदू
मी म्हणजे बिंदू
बिंदू आणि मी
एकमेकात मिसळून गेलो आहोत.
बिंदू माझ्यात विरून गेलाय
मी बिंदूत विरघळून गेलोय
खोली नसलेल्या
बिंदूत !
तरी बिंदू बिंदू आहेच.
मी, मी आहे
मी बिंदू भोवताली
मी आणि बिंदू
बिंदू, मी आणि अंगण
सारे एकच
मी !

रवि करंदीकर, पदवीपूर्व साहित्य

## प्राजक्ता

आलीस घेऊनी मंजवळी प्राजक्ताची फुले घेऊन आलीस
सखे, प्रतिकवी तुझे !
सुवास त्यांचा घेता मन धुंद झाले
जसे सहवासात तुझीया व्हावे
पाहुनी रंग तो देठांचा
आठवतो पाकळ्या ओठांच्या
पाहता झालर पाकळ्यांची
आठवे नाजूक तुझीच मूर्ती
जरा घेता हातात जाती कोमेजुनी
रागावता जशी जाशी तू रुसुनी

हेमंत मोरगावकर, तृतीयवर्ष वाणिज्य

## जगरहाटी

चिमणा चिमणीची धालमेल
चिमण्यापिला तुजसाठी धावपळ
इकडून तिकडे फेऱ्या, देई तुज संरक्षण
वाटते तयांना ... करेल कोणी भक्षण
जपले तुज न अव्हेरले घेतले उबारी
उभारले तुज या जगाच्या दारी
जाशील तू जिथे आहेत तुझ्या बरोबरी
काय करणार, नाही घेता येत कलेवरी
असेच वाढता वाढते शरीर चिमुकले
जातात मायबाप तुज सोडुनि एकले
विसरतात ते कल्पनि तुम्हां जाणते
तशातच तुम्हांसमोर जग प्रकटते
तुम्हांसही घडते माय-बाची विस्मृति...हाय!
हे अजाणा...पायंडा हा तूच पाडिलास की काय?
जगले-झिजले परी विसरले एकमेकांसाठी
वाटते तुम्हीच पाडली असावी ही जगरहाटी

सुहास शं. निर्मळे, प्रथमवर्ष वाणिज्य

## चाकोरी —

एक चाकोरी आयुष्य
चतकोर भाकरीसाठी केलेली.
स्वार्थाच्या शोधात ...
गर्दीत सांडलेल्या,
जगाच्या उघड्या बाजारात
प्रत्येक धावत असतो.
माहीत असतो प्रत्येकाला
बेगडी मायापाश इथला
तरीसुद्धा, ह्या
हिशेबी, रंगीत गुंत्यात!

अजित दरेकर

## मूर्तामूर्त

मूर्तापेक्षा अमूर्त सुंदर असते
तरीही मूर्त होण्यास ते उत्सुक असते
हे तुजला ठाऊक नव्हते!
विसरून जा सर्व काही
कधी काळी आपण भेटलो होतो
त्या भेटण्यातूनच पहेनली होती आपण
स्फूर्तीची माला
त्या मालेतील सुमने गळून पडतील
कदाचित हसतीलही
त्याची आपणा पर्वा कशाला?
सांगायला पाहिजेच का तुला
की अमूर्त हे सुंदरच असते?

नलिनी द. कळमकर, प्रथम वर्ष साहित्य

## मी

भयाण काळी रात्र...
घोंगावणारा भणाण वारा
उन्मळत बिलगतोय तिला
थरथरणारा आम्रवृक्ष
अंग चोरून
अभिषेक करतोय मातीला
घोंघावणाऱ्या वाऱ्याला भिऊन
पांघरुणात लपल्या दिश्या साऱ्या
त्या अंधारात सांडली आहे
एक नित्याची पायवाट
रंगलेली! पण थांबलेली ...
त्या वाटेवर मी
अवघडलेला, एकाकी
हरवलेल्या शाळकरी मुलासारखा
रात्रीच्या माळेचा
एक एक मणी ओवीत
वाट पाहतोय ... वाट पाहतोय ...

अजित दरेकर



# मॉडर्न वार्ता १९७३–७४

## साहित्य-संघटना ( Arts Association )

ही संघटना या वर्षी नव्याने सुरू करण्यात आली. संघटनेचे कार्याध्यक्ष डॉ. भीमराव कुलकर्णी व सभासद प्रा. म. आ. कुलकर्णी, प्रा. सौ. गडकरी व प्रा. सौ. रानडे हे होते. प्रा. व्होरा व प्रा. कु. वर्दे हे स्वीकृत सभासद होते. विद्यार्थी–प्रतिनिधी म्हणून श्री. भीमराव सावंत, अनिल भोकरे, दत्ता पवार व कु. जोगळेकर यांनी संघटनेच्या कामात भाग घेतला.

ह्या संघटनेतर्फे खालील कार्यक्रम करण्यात आले.

( १ ) २३ जुलै १९७३ ‘ नाटकविषयक माझी कल्पना ’ —या विषयावर विद्यार्थ्यांचा परिसंवाद. अध्यक्ष–डॉ. भीमराव कुलकर्णी. सौ. लेले, कु. दरेकर, प्रा. देशपांडे, प्रा. पुंडे व प्रा. गोसावी यांनी भाग घेतला.

( २ ) १ ऑगस्ट १९७३ टिळक पुण्यतिथी. अध्यक्ष प्रा. नांदेडकर, विद्यार्थी जेधे, शेलार आणि प्रा. व्होरा, डॉ. वनारसे व डॉ. भीमराव कुलकर्णी यांची व्याख्याने.

( ३ ) ७ ऑगस्ट १९७३ विदर्भातील प्रसिद्ध विनोदी कवी देवीदास खोटे यांचे काव्यगायन. अध्यक्ष प्राचार्य लिमये.

( ४ ) ११ ऑगस्ट १९७३ तुलसी जयंती अध्यक्ष–कृष्णप्पा गौतम यांचे व्याख्यान

( ५ ) १४ ऑगस्ट १९७३ प्रा. माळवा केळकर यांचे व्याख्यान. विषय–आचार्य अत्रे यांची नाट्यसृष्टी.

( ६ ) यवतमाळचे प्रख्यात मराठी शायरीचे जनक श्री. भाऊसाहेब पाटणकर यांच्या ‘ शायरी ’चा कार्यक्रम.

( ७ ) २२ ऑगस्ट १९७३ ‘ कविता ’ या विषयावर कल्याण इनामदार यांचे टिपण वाचन व त्यावर विद्यार्थ्यांची चर्चा. अध्यक्ष डॉ. भीमराव कुलकर्णी.

( ८ ) ३१ ऑगस्ट १९७३ ‘ चरित्र-आत्मचरित्र ’ या विषयावर विद्यार्थ्यांची चर्चा. अध्यक्ष प्रा. सु. थं. शायगुडे.

( ९ ) १५ सप्टेम्बर १९७३ ‘ हिंदी दिवस ’ अध्यक्ष प्रा. स. म. परळीकर, अध्यक्षांचे ‘ हिंदी भाषाका महत्त्व ’ या विषयावर व्याख्यान.

( १० ) १० डिसेंबर १९७३ अध्यक्ष प्राचार्य लिमये. प्रमुख पाहुणे आचार्य केळकर ‘ मानवी हक्क आणि भारतीय दलित समाज ’ या विषयावर विद्यार्थ्यांचा परिसंवाद व प्रमुख पाहुण्यांचे त्यासंबंधी विचार. श्री. ववन जेधे, शंकर शेलार, मारुती माने, भीमराव सावंत, पवार इत्यादी विद्यार्थ्यांनी या परिसंवादात भाग घेतला.

( ११ ) १५ डिसेंबर १९७३ : १९७३ च्या दिवाळी अंकांतील साहित्यावर चर्चा. अध्यक्ष डॉ. भीमराव कुलकर्णी वक्ते : मंगला जाधव, हेमा लेले, भीमराव सावंत, शोभना सावंत, कल्याण इनामदार.

( १२ ) १६ फेब्रुवारी १९७४ ‘ गोतावळा ’ आणि ‘ इंद्रायणीकाठी ’ या कादंबऱ्यांवर चर्चा. अध्यक्ष : प्रा. वि. भा. देशपांडे. वक्ते : सौ. हेमा लेले, श्री. सावंत, कल्याण इनामदार.

( १३ ) व्याख्यान–सत्र : तृतीय वर्ष ( साहित्य ) वर्गातील विद्यार्थ्यांसाठी खालील प्राध्यापकांची खास व्याख्याने आयोजित करण्यात आली होती : ( १ ) प्रा. डॉ. ( सौ. ) श्यामला वनारसे–साहित्यातील वास्तव ( २ ) प्रा. मुकुंद महाजन–साहित्य आणि समाज ( ३ ) प्रा. श्री. दा. संगारोम–भाषाशास्त्राची मूलतत्त्वे.

संघटनेतर्फे द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष बी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासोपयोगी ग्रंथालय सुरू करण्यात आले. पहिल्याच वर्षी त्यासाठी सुमारे एक हजार रुपयांचे ग्रंथ खरेदी करण्यात आले. ह्या ग्रंथालयाचे काम श्री. बी. एस. सावंत यांनी चांगल्या रीतीने पाहिले. प्राचार्य लिमये यांनी संघटनेच्या कामात विशेष मार्गदर्शन केले.

भीमराव कुलकर्णी
कार्याध्यक्ष

## वाणिज्य संघटना

ह्या वर्षी ही स्वतंत्र संघटना निर्माण करण्यात आली. ह्या संघटनेची सदस्यसंख्या सुमारे ३६० आहे. संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य मो. भा. लिमये आहेत व कार्याध्यक्ष प्रा. सु. ग. दातार आहेत. तसेच प्रा. अ. गो. गोसावी. प्रा. डॉ. सौ. मित्रा व प्रा. एन्. एफ्. कर्नावट हे सदस्य आहेत. संघटनेतर्फे चालू वर्षी खालील कार्यक्रम आयोजित केले गेले.

(१) १ ऑगस्ट १९७३ उद्घाटन. प्रा. इ. आर. घोंगडे. भाषण – विषय Public Enterprises in India

(२) ११ ऑगस्ट १९७३ कूपर इंजिनिअरिंग पुणे ह्या औद्योगिक संस्थेस विद्यार्थी व प्राध्यापक ह्यांची अभ्यास भेट.

(३) २० सप्टेंबर १९७३ टेल्कोचे पर्सोनेल मॅनेजर श्री. मेहरुनकर ह्यांचे व्याख्यान विषय – Personnel Management.

(४) २१ सप्टेंबर १९७३ राजाबहादूर मोतीलाल मिल्स, पुणे ह्या औद्योगिक समूहास विद्यार्थी व प्राध्यापक ह्यांची अभ्यास भेट.

(५) संघटनेच्या अभ्यासमंडळाची किर्लोस्कर लि. (ऑईल एन्जिन्स) ह्या औद्योगिक समूहास भेट.

### संघटनेचे अभ्यास मंडळ

संघटनेच्या अभ्यास मंडळात खालील व्यक्तींची व्याख्याने झाली व त्यावर चर्चा आयोजित करण्यात आल्या.

(१) एच. वाय. कुळकर्णी – Concentration of Economic Power

(२) प्रा. ए. वाय्. जोशी – Present Position of Indian Economy

(३) प्रा. एन्. एफ् कर्नावट – 'The Controls'

(४) प्रा. वि. भा. देशपांडे – प्रायोगिक रंगभूमी व प्रेक्षक.

(५) प्रा. डॉ. सौ. शामला वनारसे – Personality development

ह्याव्यतिरिक्त अभ्यास मंडळात वाणिज्य आणि अर्थशास्त्रविषयक नवीन ग्रंथांवर चर्चा झाल्या.

वाणिज्य संघटनेचे वेगळे ग्रंथालय असून त्यामध्ये सध्या एकूण सुमारे १५०० रु. ची पुस्तके आहेत. चालू वर्षी २१ ग्रंथांची खरेदी करण्यात आली. ग्रंथालयाचे काम चालू वर्षी श्री. टापरे तृ. व. वा. व श्री. आर. जी. गुजर तृ. व. वा. ह्यांनी पाहिले.

आर. जी. गुजर तृ. व. वा. — प्रा. सु. ग. दातार
एस्. टी. कुलकर्णी द्वि. व. वा. — कार्याध्यक्ष
विद्यार्थी–प्रतिनिधी

## ग्रंथालय

१९७२–१९७३ या वर्षाअखेरीस ग्रंथालयात एकूण ७९८४ ग्रंथ होते. ह्या वर्षी वरील ग्रंथांच्या संख्येत एकूण १३३० ग्रंथांची वाढ झाली. ग्रंथालयात सध्या ६४ नियतकालिके घेण्यात येतात. त्यांपैकी २८ कलाशाखेकडील, १ शास्त्र शाखेकडील, १३ वाणिज्य शाखेकडील आणि १४ इतर नियतकालिके आहेत. ह्याशिवाय ६ मराठी व ५ इंग्रजी अशी एकूण ११ वृत्तपत्रे घेतली जातात. आतापर्यंत ग्रंथालयावर एकूण १ लक्ष १० हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत.

विद्यापीठ अनुदान मंडळाने महाविद्यालयाला पुस्तकपेढी चालू करण्यासाठी दिलेल्या रकमेतून एकूण १२०९ ग्रंथ खरेदी करण्यात आले व त्यांचे संच तयार करून ते ३५० विद्यार्थ्यांना विनामूल्य वर्षभर घरी वापरण्यास देण्यात आले. याशिवाय गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना ४० संच वर्षभर घरी वापरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले.

कला, वाणिज्य आणि शास्त्र या तीन्ही शाखेकडील पदवीपूर्व ते तृतीय वर्ष या वर्गातील गुणानुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांना घरी वाचनासाठी एका वेळी एका पुस्तकाऐवजी दोन पुस्तके देण्याची सोय केली.

ह्या वर्षी "राज्यशास्त्र, संख्याशास्त्र आणि Costing" या विषयाच्या पुस्तकांची Circulating Library सुरू करण्यात आली.

रोज सरासरीने १९० पुस्तके ह्याप्रमाणे एकूण ३६,१०० ग्रंथ विद्यार्थ्यांना घरी वाचण्यास देण्यात आले. त्याचप्रमाणे रोज सुमारे १०० ग्रंथ अभ्यासिकेतून विद्यार्थ्यांना वाचण्यास देण्यात आले.

मागील वर्षाप्रमाणे ह्या वर्षीसुद्धा प्रथम व द्वितीय सत्रात विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी अभ्यासिका सायंकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्यात आली. या संधीचा एकूण १०० विद्यार्थ्यांना फायदा मिळाला.

ह्या वर्षी ग्रंथालय समितीत खालील सभासद होते.

(१) डॉ. ल. ह. गाडगीळ (कार्याध्यक्ष), (२) प्रा. चिरपुटकर, (३) प्रा. रायकर, (४) प्रा. महाजन, (५) प्रा. दातार, (६) श्री. द. गो. बापट (चिटणीस)

ग्रंथालय समितीच्या डिसेंबर १९७३ अखेर ४ सभा झाल्या. त्यांमध्ये ग्रंथालयीन कामकाजाचा आढावा घेण्यात आला व मार्गदर्शन करण्यात आले.

खालील व्यक्ती व संस्था यांनी ग्रंथालयाला बहुमोल ग्रंथ भेट देऊन उपकृत केले आहे.

(१) श्री. पी. के. फडके (कै. प्रा. अश्विनीकुमार फडके यांचे स्मरणार्थ), (२) श्री. जी. ए. शालगर (कै. ए. बी. शालगर यांचे स्मरणार्थ), (३) रँग्लर सी. जी. पेंडसे, (४) डॉ. भा. गो. बापट, (५) श्री. एम्. ए. दवले, (६) श्री. एस्. एम्. गोळवलकर, (७) श्री. आर. डी. कुलकर्णी, (८) श्री. के. पी. वर्दे, (९) श्री. आर. टी. देवळालीकर, (१०) डॉ. एल्. एच्. गाडगीळ, (११) प्रा. पी. एल्. चिरपुटकर, (१२) डॉ. बी. बी. कुलकर्णी, (१३) प्रा. एम्. एस्. महाजन, (१४) प्रा. एस. डी. संगोराम, (१५) सहाय्यक शिक्षणाधिकारी, दिल्ली, (१६) संचालक, प्रिंटिंग अ‍ॅन्ड स्टेशनरी, महाराष्ट्र राज्य, (१७) पुणे विद्यापीठ, (१८) गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अ‍ॅन्ड एकॉनॉमिक्स, (१९) ब्रिटिश कौन्सिल, ग्रंथालय पुणे, (२०) फोरम ऑफ फ्री एन्टरप्राइझ, (२१) Cossip, (२२) Unit Trust of India.

तसेच खालील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला पुस्तके भेट दिली.

(१) श्री. के. डी. काळभोर, (२) श्री. चंद्रकांत गोडबोले, (३) श्री. बी. बी लांडगे, (४) श्री. व्ही. व्ही. निवर्गी (५) श्री. व्ही. एल. जाधव, (६) कु. एस. आर. जोशी, (७) कु. एस. एस. साठे, (८) श्री. एस. व्ही. जोशी

द. गो. बापट
ग्रंथपाल

## विद्यार्थी सहकारी भांडार

यंदा विद्यार्थी सहकारी भांडाराचे काम जूनच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू झाले.

या वर्षी भांडाराची एकूण खरेदी रु. १४०००-०० व विक्री रु. ११६४५-०० झाली.

गेल्या वर्षी झालेल्या फायद्यामधून भांडाराने याही वर्षी सर्व विद्यार्थ्यांना आयडेंटिटी कार्डस्‌ची कव्हर्स मोफत दिली. ह्या प्रकारे त्यांना त्यांच्या भागभांडवलावर दिलेला डिव्हिडंड होय.

भांडाराचे कार्य वाढविण्यास अजूनही पुष्कळ संधी आहे. परंतु त्यासाठी विद्यार्थी भांडाराची जबाबदारी विद्यार्थ्यांनीच उचलणे आवश्यक आहे. या वर्षी काऊंटरवरील विक्री व रजिस्टर्स ठेवणे वगैरे कामात श्री. दोशी व शिपाई श्री. पासलकर व श्री. होले या महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध झाली. क्रीडा विभागाचे प्रमुख श्री. लागू व उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ यांचे बहुमोल सहाय्य कारणीभूत आहे. शिवाय प्राचार्य मो. भा. लिमये यांचे मार्गदर्शन व सल्ला आम्हास सतत उपयुक्त व स्फूर्तिदायक ठरला.

यंदाच्या वर्षी स्टेशनरी, बनियन्सचे भाव भरमसाठ वाढले असताना सुद्धा आम्ही विद्यार्थ्यांना योग्य किंमतीत वस्तू उपलब्ध करून दिल्या.

विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी भांडारात सर्व प्रकारची स्टेशनरी, शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना लागणारी जर्नल्स, डिसेक्शन बॉक्सेस, वेट बॉक्सेस व कला आणि वाणिज्याच्या विद्यार्थ्यांना लागणारे मॅपसेट, अकौंटन्सी वह्या, भूगोलाची जर्नल्स, ट्युटोरिअल शीटस् व शारीरिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे बनियन्स, पी. टी. शूज, सॉक्स, हाफ पँट, वगैरे वस्तूंची योग्य किमतीत विक्री केली आहे. तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहाय्य निधीतून पी. टी. चा युनिफॉर्म मदत म्हणून देण्यात आला.

विद्यार्थीवर्गाचे व प्राध्यापक व कार्यालयीन सेवकांचे अधिक सहाय्य मिळवून पुढील वर्षी आम्ही अधिक प्रगती करण्याची आशा बाळगतो.

प्रा. अ. र. नातू
कार्याध्यक्ष

## STAFF ACADEMY 1973-74

The Staff Academy was instituted in the year 1971–72. It has developed in the third year of its purposeful existence as a forum of inter-disciplinary deliberations. The Academy arranges three discussion sessions and open topic discussions every term. It has decided to arrange, in the year under report, talks by subject specialists–One such was given by. Dr. H. V. Sardesai on Brain Mechanisms and Personality. The Academy is thankful to the Principal for his guidance and to the staff members for their co-operation.

The detailed work-programme is as follows:

| Day and Date of Meeting | Title of the paper presented | Speaker | Chairman of the meeting |
|---|---|---|---|
| Wednesday, 11th July 1973 | Panchayati Raj in Developing Countries | Prof. V. G. Nandedkar | Dr. N. R. Inamdar, Lokmanya Tilak Professor in Politics, University of Poona |
| Thursday 9th August 1973 | The Marxist Theory of the Origin of Poetry | Prof. S. V. Dhaygude | Prin. K. P. Mangalvedhekar, S. P. College, Poona–30. |
| Friday, 21st Sept. 1973 | Brain Mechanisms and Personality (Lecture meeting) | Dr. H. V. Sardesai | Prin. N. G. Suru |
| Wednesday, 3rd October 1973 | Some Aspects of Geo-medical study of Leprosy in Maharashtra | Prof. P. D. Apte | Prof. V. S. Gananathan, Prof. and Head, Department of Geography, University of Poona |
| Wednesday 5th December 1973 | Infinity, A Concept in Pure Mathematics | Prof. C. G. Kulkarni | Dr. V. S. Huzurbazar, Head Dept. of Mathematics and Statistics, University of Poona |
| Wednesday 23rd Jan. 74 | Modern Trends in Auditing | Prof. M. R. Bhave | Shri M. K. Soman, Director Secretary Formica India Limited, Poona |
| Thursday, 28th Feb. 74 | Genetics: What Is It About? | Prof. S. M. Katdare | Dr. Suresh Goel, Reader in Embryology, Zoology Dept. University of Poona |
| 12th March 74 | Neglect of intelligence in Education | Dr. D. N. Gokhale | Shri V. T. Tatke |

Dr. V. G. Nandedkar, Secretary

## 'रक्तदान' (१९७३–७४)

खालील प्राध्यापक आणि विद्यार्थि–विद्यार्थिनी यांनी शनिवार दिनांक ४ ऑगस्ट, १९७३ रोजी रक्तदान केले. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

| अ. क्र. | नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | प्रा. पद्माकर आपटे | प्राध्यापक |
| २ | प्रा. सौ. श्यामला बनारसे | प्राध्यापक |
| ३ | कु. हेमलता फडणीस | द्वि. व. वाणिज्य |
| ४ | कु. शशी परेरा | तृ. व. साहित्य |
| ५ | श्री. नरेन्द्र परमार | प. पू. वाणिज्य |
| ६ | श्री. सतीश जोशी | तृ. व. वाणिज्य |
| ७ | श्री. सोहन बाफना | द्वि. व. वाणिज्य |
| ८ | श्री. चंद्रशेखर मोडक | प्र. व. वाणिज्य |
| ९ | श्री. विजय भानू | प्र. व. शास्त्र |
| १० | कु. जयश्री मगली | तृ. व. साहित्य |
| ११ | श्री. उल्हास कुंजीर | तृ. व. वाणिज्य |
| १२ | श्री. शिवाजी निम्हण | तृ. व. वाणिज्य |
| १३ | श्री. रत्नाकर नवले | प्र. व. वाणिज्य |
| १४ | कु. भारती शाह | द्वि. व. वाणिज्य |
| १५ | श्री. प्रकाश विद्वत | तृ. व. वाणिज्य |
| १६ | सौ. हेमा लेले | तृ. व. साहित्य |
| १७ | श्री. सुकुमार वेरी | प्र. व. वाणिज्य |
| १८ | श्री. नयनकुमार शेवडे | तृ. व. शास्त्र |
| १९ | श्री. प्रदीप लाळे | तृ. व. वाणिज्य |
| २० | श्री. सूर्यकांत गद्रे | प्र. व. वाणिज्य |
| २१ | श्री. चंद्रशेखर पारुंडेकर | द्वि. व. वाणिज्य |
| २२ | श्री. अजित रसाळ | प्र. व. वाणिज्य |
| २३ | श्री. रवीन्द्र खिस्ती | द्वि. व. वाणिज्य |
| २४ | श्री. रामकृष्ण आडकर | द्वि. व. शास्त्र |
| २५ | श्री. रमेश खटावकर | द्वि. व. शास्त्र |
| २६ | श्री. राजेन्द्र आरडे | प. पू. वाणिज्य |
| २७ | श्री. रवीन्द्र सावरकर | प्र. व. वाणिज्य |
| २८ | श्री. शांतिलाल लुणावत | तृ. व. शास्त्र |
| २९ | श्री. चिंतामण यादव | प. पू. शास्त्र |
| ३० | श्री. सुहास पैसास | द्वि. व. शास्त्र |
| ३१ | श्री. अविनाश बर्वे | द्वि. व. शास्त्र |
| ३२ | श्री. प्रवीणकुमार शाह | द्वि. व. वाणिज्य |
| ३३ | श्री. कालेकर उदय | प्र. व. वाणिज्य |

## वर्गप्रतिनिधी (१९७३–७४)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. करंदीकर रवीन्द्र | प. पू. साहित्य | ए |
| २ | श्री. तडवळकर विजय | प. पू. साहित्य | बी |
| ३ | श्री. दातार अविनाश | प. पू. शास्त्र | एफ् |
| ४ | श्री. कमोते नंदकिशोर | प. पू. वाणिज्य | सी |
| ५ | श्री. काकडे अरुण | प. पू. वाणिज्य | डी |
| ६ | श्री. मोरे जनार्दन | प. पू. वाणिज्य | इ |
| ७ | श्री. आचरेकर गिरीश | प्र. व. साहित्य | – |
| ८ | श्री. जोशी संजय | प्र. व. शास्त्र | – |
| ९ | श्री. भोसले | प्र. व. शास्त्र | बी |
| १० | श्री. जोगळेकर दिलीप | प्र. व. वाणिज्य | ए |
| ११ | श्री. भडकमकर प्रभाकर | प्र. व. वाणिज्य | बी |
| १२ | श्री. देशपांडे राजीव | द्वि. वर्ष साहित्य | – |
| १३ | श्री. आडकर रामकृष्ण | द्वि. वर्ष शास्त्र | – |
| १४ | श्री. कुलकर्णी | द्वि. वर्ष वाणिज्य | ए |
| १५ | श्री. काळे उत्तम | द्वि. वर्ष वाणिज्य | बी |
| १६ | श्री. भोकरे अनिल | तृ. वर्ष साहित्य | – |
| १७ | श्री. पाटील प्रमोद | तृ. वर्ष शास्त्र | – |
| १८ | श्री. शाह प्रवीण | तृ. वर्ष वाणिज्य | – |

## ग्रंथ-प्रकाशन, सत्कार व ग्रंथप्रदर्शन

डॉ. परांजपे यांच्या 'The Anatomy of the Gardern Lizard' या पीएच्. डी. च्या प्रबंधाचे प्रकाशन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ग. स. महाजनी यांच्या हस्ते दि. १४ मार्च रोजी झाले. याच वेळी कुलगुरूंच्या हस्ते डॉ. भीमराव कुलकर्णी ( न. चिं. केळकर-पारितोषिक व परांजपे-पारितोषिक विजेते ) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील पीएच. डी. पदवीधारक म्हणून डॉ. ल. ह. गाडगीळ, डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. परांजपे डॉ. सौ. श्यामला बनारसे डॉ. नांदेडकर, डॉ. पांडे, व डॉ. सौ. मित्रा यांचा सत्कार झाला. महाविद्यालयातील शिक्षकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे या प्रसंगी प्रदर्शन भरविण्यात आले होते.

## विद्यार्थी संघटना

**जनरल सेक्रेटरी**
१. श्री. काळभोर कीर्तिकुमार तृ. वर्ष शास्त्र

**मॉम**
१. श्री. दरेकर अजित प्र. वर्ष साहित्य

**नाट्यविभाग**
१. श्री. असलेकर विजय तृ. वर्ष वाणिज्य

**आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थिनी प्रतिनिधी**
१. कु. साठे माधुरी प्र. वर्ष साहित्य

**मायनॉर गेम्स**
१. श्री. गाडगीळ श्रीधर द्वि. वर्ष वाणिज्य

**व्हॉलीवॉल आणि बास्केट बॉल**
१. श्री. ळाळे प्रदीप तृ. वर्ष वाणिज्य

**मैदानी स्पर्धा**
१. श्री. शेल्डेकर अनिल द्वि. वर्ष साहित्य

**कुस्ती**
१. श्री. करडे उदय द्वि. वर्ष वाणिज्य

**फुटबॉल**
१. श्री. मटकर रणजित द्वि. वर्ष वाणिज्य

**भारतीय खेळ**
१ श्री. कोल्हटकर विश्वनाथ तृ. वर्ष शास्त्र

**जलतरण**
१. श्री. कोकीळ मोहन प्र. वर्ष वाणिज्य

**विद्यार्थिनींचे खेळ**
१. कु. जोशी सुषमा प्र. वर्ष वाणिज्य
२. कु. आठवले स्मिता प्र. वर्ष साहित्य

**विद्यार्थिनी प्रतिनिधी**
१. कु. आठवले स्मिता प्र. वर्ष साहित्य

**कलामंडळ**
१. श्री. चोन्हाडे चंद्रसेन तृ. वर्ष वाणिज्य

**राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख**
१. श्री. पवार दत्तात्रय तृ. वर्ष साहित्य

**राष्ट्रीय छात्रसैनिक उपप्रमुख**
१. श्री निंबाळकर पंढरीनाथ द्वि. वर्ष वाणिज्य

**वादविवाद मंडळ**
१. श्री. पाध्ये सुरेशचंद्र तृ. वर्ष वाणिज्य

**वाचनालय आणि ग्रंथालय**
१. श्री. शिंदे विक्रमादित्य तृ. वर्ष वाणिज्य

**आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थी प्रतिनिधी**
१. श्री. आयना मोहन द्वि. वर्ष वाणिज्य



**कवी कल्याण इनामदार**

द्वितीय वर्ष साहित्य या वर्गातील विद्यार्थी श्री. कल्याण इनामदार यांचा 'भलतुकडी गीते' नावाचा बालगीतांचा संग्रह प्रसिद्ध होत आहे.

गेल्या ७–८ वर्षांत मराठीतील विविध नियतकालिकांतून व त्यांच्या दिवाळी अंकांतून आतापर्यंत सुमारे दोन हजाराहून अधिक कवितांना प्रसिद्धी. पुणे आकाशवाणीवरूनही काव्यवाचनाचे कार्यक्रम.

**काव्यसंपदा–** अबोलीची नक्षी (कवितासंग्रह) मार्च १९७२

याशिवाय 'मातृपूजन' (प्रातिनिधिक ग्रंथ), 'गंधधारा', 'संकेत' इत्यादी प्रातिनिधिक काव्यसंग्रहातूनही कवितांना प्रसिद्धी.

### निरंतर शिक्षण योजना : व्याख्यानसत्र

पुणे विद्यापीठाने 'निरंतर शिक्षण योजना' या नावाची एक महत्त्वपूर्ण योजना सुरू केली आहे. समाजघटकाच्या सांस्कृतिक उद्बोधनाचे कार्य या योजनेद्वारा साकार व्हावे ही या पाठीमागची कल्पना आहे. ह्या योजनेतून सात व्याख्यानांचे एक सत्र मॉडर्न महाविद्यालयाने आयोजित केले होते. त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला. व्याख्यान-माला यशस्वी होण्यासाठी अनेक प्राध्यापकांनी सहकार्य दिले. विशेषतः प्रा. पुंडे यांनी या कामात विशेष लक्ष घातले.

| क्र. | दिनांक | वार | व्याख्याते | विषय | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | ६–३–७४ | बुधवार | श्री. श्री. ज. जोशी | मध्यमवर्गीय जीवन व मराठी साहित्य | डॉ. मी. ब. कुलकर्णी |
| २. | ७–३–७४ | गुरुवार | सौ. इंदिराबाई मायदेव | आजच्या पिढीच्या विवाहसमस्या | सौ. इंदूताई महाजनी |
| ३. | ८–३–७४ | शुक्रवार | डॉ. प्र. चिं. शेजवलकर | महागाई का व कशी वाढते ! | प्राचार्य मो. भा लिमये |
| ४. | ९–३–७४ | शनिवार | डॉ. रा. शं. वाळिंबे | गेल्या शंभर वर्षातील सामाजिक स्थित्यंतरे | प्रि. न. गो. सुरु |
| ५. | १०-३–७४ | रविवार | डॉ. भीमराव कुलकर्णी | शिवाजीचा राज्याभिषेक | प्राचार्य लिमये |
| ६. | ११–३–७४ | सोमवार | श्री. एम्. जी. चाफेकर | नवगणिताचे स्वरूप व ते कसे शिकवावे | श्री. अ. ग. मायदेव |
| ७. | १२–३–७४ | मंगळवार | डॉ. द. न. गोखले | शिक्षणक्षेत्रातील प्रश्नांची हेळसांड | श्री. वि. त्र्यं. ताटके |

### राष्ट्रीय सेवा योजना ७३–७४

राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये यंदाच्या वर्षी ७४ विद्यार्थी आणि १२ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांना समाजसेवेची कल्पना देण्यासाठी श्री. जी. एन्. हर्षे, श्री· मेहेंदळे, श्री. जठार आणि प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर ह्यांची व्याख्याने आयोजित केलेली होती.

पासगाव-पर्वती येथे वृक्षारोपण आणि त्यासंबंधीची तयारी करण्यासाठी १ दिवसाची सहा शिबिरे घेण्यात आली.

पिसोळी ह्या हडपसरजवळील खेड्यात लहान व मोठी अनेक शिबिरे आयोजित करून शाळेसाठी मैदान, विहिरी-कडे जाणारा रस्ता आणि आट्यापाट्याचे मैदान ह्यासाठी श्रमदान घेण्यात आले. ग्रामस्थांचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण, शेतीची पाहणी हेही काम सदर शिबिरात करण्यात आले.

रिमांडहोम, अंधशाळा आणि ससून रुग्णालय ह्या ठिकाणी वारंवार भेटी देऊन विद्यार्थ्यांनी समाजसेवा केली.

पथकातील विद्यार्थ्यांनी शहरातील अनेक भागांत हिंडून ६५१ पुस्तके, नियतकालिके गोळा केली. सदर पुस्तके पोलिस वसतिगृह, रुग्णालये ह्यांना भेट म्हणून देण्यात येणार आहेत.

सद्यःस्थितीतील महत्त्वाच्या आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चासत्रे शिबिरामध्ये घेण्यात आली. "जातीयता-निर्मूलन" ह्या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. त्यासाठी पुण्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थी आले होते. श्री. वसंत पळशीकर ह्यांनी मार्गदर्शनपर भाषण केले.

मा. ना. ग. गोरे, मा. निळूभाऊ लिमये आणि डॉ. दादासाहेब गुजर ह्यांनी शिबिरांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. प्रा. लिमये ह्यांचे मार्गदर्शन, सल्ला व कार्यक्रमात सक्रिय भाग ह्यांचा लाभ पथकास मिळत राहिला.

प्रा. गोसावी, प्रा. गोखले, प्रा. नाहळदे आणि सल्लागार समितीचे माननीय सदस्य ह्या सर्वांचे सक्रिय सहकार्य प्रत्येक खेपेस मिळत होते.

पथकातील विद्यार्थी नेते आणि इतर विद्यार्थी ह्यांनी प्रत्येक कार्यक्रमात उत्साहाने भाग घेऊन ते उत्तम रीत्या पार पाडण्यात सहकार्य केले.

म. आ. कुलकर्णी (प्रमुख)
विक्रमादित्य प. शिंदे (कार्यवाह)

## विशेष उल्लेखनीय कार्य

एन. एस. एस.च्या पथकातील श्री. विक्रमादित्य शिंदे आणि कु. पद्मा घोडके ह्या विद्यार्थी नेत्यांची पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून नेहरू नॅशनल यूथ फोरममार्फत घेतलेल्या अबू येथील अखिल भारतीय शिबिरासाठी निवड झाली होती.

'युवकांची दुष्काळाशी झुंज' ह्या मोहिमेतील एकूण सोळा शिबिरांपैकी एक शिबिर हडपसर येथे आमच्या महाविद्यालयातर्फे घेण्यात आले.

म. आ. कुलकर्णी

## युवकांची दुष्काळाशी झुंज

ह्या मोहिमेतील सोळा शिबिरांपैकी एक शिबिर हडपसर येथे १ ते २१ मे १९७३ अखेर घेण्यात आले. शिबिरात पुण्यातील स्थानिक महाविद्यालयांतील ६२ विद्यार्थी आणि महंमदवाडी ह्या खेड्यातील २५ मुले-मुली होते. श्री. जवाहर कोटेचा हे शिबिर पर्यवेक्षक होते.

महंमदवाडी येथील नाल्यास बंधारा बांधण्याच्या कामावर रोज सुमारे चार तास श्रमदान करण्यात आले. दुपारच्यावेळी सद्यःस्थितीतील महत्त्वाच्या व ज्वलंत प्रश्नावर गटवार चर्चासत्रे घेण्यात आली. रक्तदानाचा कार्यक्रम घेण्यात आला.

प्राचार्य दाभोळकर, प्राचार्य लिमये, मंगळवेढेकर, एन. के. कुलकर्णी, श्री.बाळ पंडीत, खासदार भगवती, श्री.काटदरे इत्यादी प्रभृतींनी शिबिरास भेटी देऊन मार्गदर्शनपर भाषणे व चर्चा केली.

म. आ. कुलकर्णी शिबिर-संयोजक

## शारीरिक शिक्षण विभाग

आमच्या महाविद्यालयात प्रथमपासूनच विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाकडे सर्वांगीण लक्ष दिले आहे. १९७३-१९७४ ह्या शैक्षणिक वर्षात ५ जुलै १९७३ रोजी शारीरिक शिक्षणाच्या तासांना सुरुवात झाली. परंतु त्यापूर्वीच्या काळात २३ जून ते ४ जुलै ह्या कालखंडात शारीरिक शिक्षणाच्या संचनायकांसाठी प्रशिक्षणाचा वर्ग शारीरिक शिक्षण संचालक श्री. लागू यांनी चालवून त्यात आलेल्या एकूण १८ विद्यार्थि-विद्यार्थिनींमधून चार विद्यार्थिनी व ७ विद्यार्थी अशा ११ जणांची निवड केली.

त्यानंतर शिस्तबद्ध योजनेतून शारीरिक शिक्षणाच्या तासांना सुरुवात झाली. विद्यार्थ्यांसाठी सोमवार, बुधवार, शुक्रवार व विद्यार्थिनींसाठी मंगळवार, गुरुवार व शनिवार अशा प्रकारे तास घेतले.

द्वितीय सत्रात विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे तास मंगळवार ते शुक्रवार असे एकाच वेळी घेण्यास सुरुवात केली.

ह्या वर्षी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी आपल्या कॉलेजचे प्रा. डॉ. परांजपे ह्यांनी घेतली व त्यांच्या सल्ल्यानुसार योग्य त्याच विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण माफ करण्यात आले.

विद्यार्थ्यांची रोजची सर्वसाधारण सरासरी उपस्थिती सुमारे २०० होती.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाबरोबर सांघिक भावना, राष्ट्रीय एकात्मता व नेतृत्व निर्माण करण्याच्या हेतूने यंदाही 'कुलपद्धतीचा' वापर करण्यात आला.

विद्यार्थ्यांची एकूण ५ कुले झाली. त्या कुलांना पराक्रमी थोर ऐतिहासिक पुरुषांची नावे दिली. ह्या कुलांमध्ये आंतरकुल साखळी पद्धतीने व्हॉली-बॉल, बास्केट बॉल, फुट-बॉल व कबड्डी इ. स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी हिरीरीने व आत्मविश्वासाने भाग घेतला.

ह्या तासामध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह वर्षभर सुरुवातीइतकाच टिकावा ह्या उद्देशाने आम्ही ह्या तासांना विविध प्रकारचे खेळ व स्पर्धा घेतल्या—ॲथ्लॅटिक्स, भारतीय व परदेशी खेळ, जिमन्यास्टिक व क्रॉस-कंट्री, रोड-रनिंग, सर्किट ट्रेनिंग व विद्यार्थ्यांनीसाठी लेझीम इ. चा समावेश होता.

आंतरकुल स्पर्धेमध्ये ह्या वर्षीचे सर्वसाधारण विजेतेपद 'सुभाष' कुलाने मिळवले व ह्या वर्षीची आंतरकुल फिरती ढाल त्यांनी पटकावली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. शारीरिक शिक्षणाच्या दोन्ही सत्रांत मिळून एकूण ६० तास झाले. बहुतेक विद्यार्थ्यांनी ह्या तासांना नियमित येऊन उपस्थिती मोठ्या प्रमाणावर दाखविली.

विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाला आवश्यक असा गणवेश महाविद्यालयाच्या सहकारी भांडारातून देण्याची व्यवस्था केली. त्याचप्रमाणे गरीब विद्यार्थ्यांना 'विद्यार्थी सहाय्यक निधीतून' मुक्त गणवेष प्राचार्यांनी दिला.

प्राचार्य, प्रा. डॉ. परांजपे, प्रा. गंभीर व इतर प्राध्यापकवर्ग ह्यांनी आम्हाला दिलेल्या साहाय्याबद्दल आम्ही त्यांचे सतत ऋणी राहू.

श्री. अनिल शेलडेकर — श्री. किरण लागू
कु. सुमन जोशी — शारीरिक शिक्षण
संघनायक — विभाग प्रमुख

## शास्त्र संघटना

शास्त्र विभागासाठी या वर्षी या संघटनेने खालील कार्यक्रम आयोजित केले.

(१) द्वितीय वर्ष शास्त्राच्या विद्यार्थ्यांची पुणे विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागास भेट.

(२) तृतीय वर्ष शास्त्राच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेस भेट.

(३) शास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र ग्रंथालयाची सुरुवात.

(४) विद्यार्थ्यांसाठी उपकरणांचा संग्रह, निर्मिती इ. बाबतीत स्पर्धा घेण्यात आल्या.

(५) शास्त्रीय उपकरणांचे प्रदर्शन भरवून मार्गदर्शन करण्यात आले.

प्रा. डॉ. ए. के. पांडे
अध्यक्ष

## वादविवाद मंडळ

आपल्या महाविद्यालयाने या वर्षी एकूण तीन स्पर्धांमध्ये भाग घेतला. 'शारदा करंडक कथाकथन' स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाचे श्री. रवी करंदीकर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या स्पर्धांखेरीज महाविद्यालयातर्फे 'पूना यूथ सेंटर' ने आयोजित केलेल्या Orientation Course साठी तीन विद्यार्थी पाठविले होते.

टिळक आयुर्वेद महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कथाकथनाच्या कार्यक्रमास आपले विद्यार्थी श्री. रवी करंदीकर व श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांना कथा-कथनासाठी निमंत्रित करण्यात आले होते. तसेच 'युवक वक्तृत्व आणि कला मंडळ' या सांस्कृतिक संस्थेने आयोजित केलेल्या कथाकथनाच्या दोन कार्यक्रमांत श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांनी कथाकथन केले होते. वरील दोन्ही विद्यार्थ्यांचे वादविवाद मंडळ अभिनंदन करते.

प्रा. कु. देशपांडे यांनी वादविवाद मंडळाच्या सल्लागार प्राध्यापिका म्हणून काम पाहिले. श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांनी सेक्रेटरी म्हणून काम पाहिले.

प्रा. मुकुंद महाजन
प्रमुख सल्लागार

## वक्तृत्व प्रशिक्षण केंद्र

विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वगुणांचा सर्वांगीण विकास आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास हे केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट म्हणून सांगावे लागेल. वक्तृत्व प्रशिक्षण केंद्राचा लाभ एकूण तेवीस विद्यार्थ्यांनी घेतला. श्री. सुरेशचंद्र पाध्ये यांनी सेक्रेटरी म्हणून तसेच कु. ऊर्मिला रणदिवे यांनी असिस्टंट सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. प्रा. कु. देशपांडे यांनी सल्लागार प्राध्यापिका म्हणून काम पाहिले.

सदर केंद्रात वक्तृत्वाविषयीच्या ग्रंथांचे अध्ययन, गाजलेल्या वक्त्यांच्या भाषणांचा सर्वांगाने अभ्यास करणे, मान्यवर वक्त्यांकडून व तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, प्रत्यक्ष चर्चासत्रे इत्यादी गोष्टीतून विद्यार्थ्यांना वक्तृत्वसंबंधी शास्त्रीय शिक्षण देण्याचा उपक्रम करण्यात आला.

सदर केंद्रातर्फे प्रा. वि. भा. देशपांडे यांचे 'रेडिओ अथवा टी. व्ही. वरील वक्तृत्व' या विषयावर श्री. राजाभाऊ मंगळवेढेकर यांचे 'कथा-कथन तंत्र आणि मंत्र' या विषयावर, तसेच नाट्य प्रशिक्षक प्रा. प्रभाकर गुप्ते यांची दोन व्याख्याने 'वक्तृत्व' या विषयावर आयोजित करण्यात आली होती. सदर उपक्रमाला सदस्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

प्रा. मुकुंद महाजन

## ' क्रीडा–विभाग '

ह्या वर्षी आमच्या महाविद्यालयाने आंतर–महाविद्यालयीन सामन्यातील एकूण २९ विविध स्पर्धांमध्ये हिरीरीने भाग घेतला. विद्यार्थ्यांच्या अंगी सांघिक भावना व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांना सांघिक व वैयक्तिक रीत्या स्पर्धेत भाग घेण्याची जास्तीत जास्त संधी देण्याचे आमच्या क्रीडाविभागाचे धोरण आहे; त्यानुसार एकूण ८० विद्यार्थिनींनी ८ स्पर्धांत व १७० विद्यार्थ्यांनी २१० स्पर्धांत भाग घेतला.

आमच्या व्हॉलीबॉल संघाने पुणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळविले. तसेच आमच्या व्हॉलीबॉल व सॉफ्टबॉल ह्या मुलांच्या संघाने आंतर–महाविद्यालयीन स्पर्धांत प्रथमच उपविजेते पद मिळविले व खोखोच्या मुलांच्या संघाने पहिले अजिंक्यपद खेचून आणले. ह्या वर्षी आमच्या मुलांच्या हॉकीच्या संघानेही आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भाग घेतला.

आंतर–महाविद्यालयीन वजन उचलण्याच्या (वेट लिफ्टिंग) स्पर्धेत उत्तम तऱ्हेने चमक दाखवून उपविजेते पद मिळविले. श्री. चंदू गोडबोले यांनी वजन उचलणे स्पर्धेत फेदर वेट गटात प्रथम क्रमांक, श्री. पडवळ यांनी बॉटम वेट गटात द्वितीय क्रमांक व श्री. टाकळकर यांनी मिडल वेट गटात तृतीय क्रमांक मिळविला. तसेच आंतर-महाविद्यालयीन ज्युदो संघात श्री. कहाणे यांनी फेदर वेट गटात उपविजेतेपद मिळविले. आंतर–महाविद्यालयीन कुस्तीच्या स्पर्धेत श्री. शिवाजी निम्हण यांनी लाइट मिडल गटात उपविजेतेपद मिळविले.

मैदानी स्पर्धेमध्ये श्री. रणजित मटकर यांनी ४०० मी. अडथळ्याची शर्यत यामध्ये तृतीय क्रमांक मिळविला. श्री. दरेकर यांनी १०,००० मीटर पळण्याच्या शर्यतीत द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच कु. नीता भट यांनी १०० मीटर अडथळ्याच्या शर्यतीत तृतीय क्रमांक मिळविला.

पुणे विद्यापीठाच्या विभागीय पुरुषांच्या संघात आमच्या पुढील विद्यार्थ्यांची त्या–त्या स्पर्धांसाठी निवड झाली आहे.

व्हॉली बॉल : (१) श्री. चिपळकट्टी (२) श्री. शिंदे एस्. डी. (३) श्री. शिंदे एस्. आर. (४) श्री. सटावकर

खो खो : (१) श्री. इनामदार श्रीरंग (२) श्री. दंडे गिरीश (३) श्री. कुलकर्णी विजय (४) श्री. राव रमेश

बॉल बॅडमिंटन : (१) श्री. जोशी सतीश (२) श्री. देसाई प्रदीप (३) श्री. मुथा अभय

बास्केट बॉल : (१) श्री. मिटकर नितीन

कुस्ती : (१) श्री. निम्हण शिवाजी.

कबड्डी : (१) श्री. जांभूळकर

वजन उचलणे : (१) श्री. गोडबोले चंदू (२) श्री. टाकळकर विठ्ठल (३) श्री. पडवळ.

पुणे विद्यापीठाच्या विभागीय स्पर्धेसाठी महिलांच्या संघात आमच्या पुढील विद्यार्थिनींचा समावेश आहे.

खो खो : (१) कु. काळे वर्षा

बॉल बॅडमिंटन : (१) कु. शहा भारती (२) कु. बोरावके सरिता (३) कु. दाते अंजली

बास्केट बॉल : (१) कु. तेलंग शैलजा.

पुणे विद्यापीठाच्या संघात आंतर-विद्यापीठ सामन्यांसाठी पुढील विद्यार्थ्यांची निवड झाली.

व्हॉलीबॉल : (१) श्री. शिंदे एस्. डी. (२) श्री. शिंदे एस्. आर. (३) श्री. चिपलकट्टी

खो खो : (१) श्री. इनामदार श्रीरंग (२) श्री. दंडे गिरिश (३) श्री. कुलकर्णी विनय (४) श्री. राव रमेश

बास्केटबॉल : (१) श्री. मिटकर नितीन

बॉल बॅडमिंटन : (१) श्री. जोशी (२) श्री. देसाई प्रदीप (३) श्री. मुथा अभय.

पुणे विद्यापीठाच्या संघात आंतर-विद्यापीठाच्या सामन्यासाठी पुढील विद्यार्थिनींची निवड झाली आहे.

बॉल बॅडमिंटन : (१) कु. शहा भारती—कॅप्टन (२) कु. बोरावके सरिता

बास्केटबॉल : (१) कु. तेलंग शैलजा.

तसेच श्री. मोहन आपना यांनी १९९००फूट गिर्यारोहण करून कॉलेजचे नाव उज्ज्वल केले आहे. 'फ्रेंडशिप' हे शिखर यशस्वी रीत्या चढून जाण्याचा त्यांनी उपक्रम केला व या यशाबद्दल त्यांना राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरींच्या हस्ते रौप्यपदक बहाल करण्यात आले.

वरील सर्व खेळाडूंनी जे यश संपादन केले आहे त्याबद्दल त्यांचे क्रीडाविभागातर्फे हार्दिक अभिनंदन.

तसेच या वर्षी शाळेच्या सहकार्याने कै. के. ज. पळुसकर (गाडगीळ) व्यायामशाळेचा फायदा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना करून घेता आला. सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सकाळी व संध्याकाळी येऊन व्यायामशाळेचा लाभ घेतला. या सहकार्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. गोखले यांचे आभार.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांच्या तयारीसाठी आम्हास श्री. डॉमनिक, श्री. शिवशंकर, श्री.सुनिल तांबे, श्री. सुरेश कोंढाळकर, श्री. सूर्यकांत शिंदे, श्री. विजय देशपांडे व श्री. दिलीप लोहकरे यांचे बहुमोल साहाय्य लाभले. त्यांच्या या बहुमोल सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या क्रीडाविषयक सहकार्याचा व सहभागाचा उल्लेख केल्याशिवाय आजच्या ह्या अहवालाची पूर्तता होणार नाही.

**(१) प्रा. श्री. आपटे :** जिम्नॅस्टिक्स व मल्लखांब, निवड समितीचे प्रमुख म्हणून नेमणूक व अलिबाग येथे झालेल्या विभागीय (आंतर) स्पर्धेसाठी पुणे विभाग संघाचे व्यवस्थापक.

**(२) प्रा. श्री. पाथरे :** विद्यापीठ व्हालीबॉल निवड समितीवर नेमणूक.

**(३) प्रा. श्री. दातार :** पुणे विद्यापीठ क्रिकेट संघाच्या निवड समितीवर नेमणूक

**(४) प्रा. श्री. नातू :** टेबलटेनिस विभागीय संघाच्या निवड समितीवर नेमणूक व लोणावळा येथे झालेल्या आंतरविभागीय सामन्यांच्या वेळी व्यवस्थापक.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांशिवाय महाविद्यालयात आंतरवर्गीय सामने या वर्षी द्वितीय सत्रात घेण्यात आले. एकूण ५०० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले. त्या स्पर्धेतील सर्वसाधारण अजिंक्यपद द्वितीय वर्ष वाणिज्य ह्या वर्गाने मिळवले. मैदानी स्पर्धेतील अजिंक्यपद—

विद्यार्थी—श्री. रणजित मटकर द्वितीय वर्ष वाणिज्य व विद्यार्थिनी—कु. नीता भट पदवीपूर्व कला यांनी मिळवली.

दि. २५ जानेवारी १९७४ रोजी श्री वि. त्र्यं. ताटके यांच्या अध्यक्षतेखाली क्रीडा-दिन (Gymkhana day) साजरा करण्यात आला.

आमचे प्राचार्य व क्रीडा विभागाचे सदस्य प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल क्रीडा विभागातर्फे आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

**श्री. मोहन आपना**
विद्यार्थी प्रतिनिधी

**कु. माधुरी साठे**
विद्यार्थिनी प्रतिनिधी

**प्रा. स. य. गंभीर**
कार्याध्यक्ष

## नियोजन – चर्चा मंडळ

दिनांक ३०–७–७३ रोजी बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन्. के. कुलकर्णी ह्यांनी महाविद्यालयाच्या नियोजन चर्चा मंडळास सर्वप्रथम भेट दिली. त्या वेळी भारताच्या नियोजनावर व प्रामुख्याने भारताच्या पाचव्या पंचवार्षिक योजनेवर त्यांनी मांडलेले विचार महाविद्यालयाच्या नियोजन मंडळाच्या सभासदांना ज्ञान आणि अभ्यास अशा दोन्ही दृष्टिकोणातून फारच उपयुक्त वाटले.

त्यानंतर दिनांक १८–८–७३ रोजी स. प. महाविद्यालयाच्या आर्टस् विभागाचे उपप्राचार्य आणि अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दि. व. केरूर ह्यांचे 'अन्न आणि विकास' ह्या विषयावर उपयुक्त व्याख्यान नियोजन चर्चा मंडळातर्फे झाले.

दुसऱ्या सत्रात प्रा. सौ. रानडे यांचे 'आर्थिक विकासातील स्टेट बँकेची भूमिका' या विषयावर व्याख्यान दिनांक २१–१–७४ रोजी ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे तृतीय वर्ष साहित्य या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी दि. १२–१–७४ रोजी 'खंडसिद्धांताचा विकास' या विषयावर प्रा. कु. व्ही. व्ही. देशपांडे यांचे व्याख्यान झाले.

**चंद्रशेखर चव्हाण**
सेक्रेटरी, नियोजन चर्चा मंडळ

## स्टूडन्ट्स लायब्ररी

विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी आणि अधिक ज्ञान मिळविण्यासाठी कथा, कादंबऱ्या, नाटके, चरित्रे, सामाजिक साहित्य इ. प्रकारची पुस्तके त्यांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे कार्य स्टुडन्ट्स लायब्ररी करीत आहे. या वर्षी एकूण १०६ नवीन पुस्तकांची भर टाकण्यात आली. लायब्ररीसाठी नवीन नवीन लेखकांचे हिंदी मराठी आणि इंग्रजी साहित्य घेण्याची पराकाष्ठा केली जाते.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आठवड्यातून दोन दिवस प्रत्येकी एक तास लायब्ररीचे कामकाज चालू असते, आणि या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. या वर्षी साहाय्यक म्हणून श्री. अनिल द. काळे ( प्र. व. सा.) याने काम पाहिले.

आमच्या लायब्ररीस आपल्याच कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा-योजना पथकाने १० पुस्तके भेट दिली त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

| | |
|---|---|
| **विक्रमादित्य प. शिंदे** | **प्रा. जोशी** |
| तृ. व. वा., कार्यवाह | प्रमुख |

## शिष्यवृत्त्यांचे मानकरी

### राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १. कु. आगवेकर वैजयंती भार्गव | प्रथम वर्ष वाणिज्य |
| २. कु. यंदे सुनिता रघुनाथ | प्रथम वर्ष विज्ञान |
| ३. श्री. अभ्यंकर जयंत प्रभाकर | तृतीय वर्ष वाणिज्य |
| ४. श्री. ढेकणे शहाजी हरीभाऊ | प्रथम वर्ष विज्ञान |
| ५. श्री. कुलकर्णी अजित वसंत | प्रथम वर्ष विज्ञान |
| ६. श्री. ओंबासे नामदेव भिवा | प्रथम वर्ष विज्ञान |
| ७. श्री. पलुसकर चंद्रशेखर एस. | प्रथम वर्ष विज्ञान |
| ८. श्री. शिंगटे प्रकाश अप्पासाहेब | प्रथम वर्ष विज्ञान |
| ९. श्री. सुक्रे ज्ञानेश्वर दत्तात्रय | प्रथम वर्ष विज्ञान |
| १०. श्री. मावसार प्रकाश नारायण | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ११. श्री. दोशी सुरेश मोहन | द्वितीय वर्ष विज्ञान |
| १२. कु. कुलकर्णी पुष्पलता वसंत | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| १३. कु. दरेकर अलका दिगंबर | तृतीय वर्ष साहित्य |
| १४. श्री. क्षीरसागर सुरेश चंद्रकांत | तृतीय वर्ष साहित्य |
| १५. श्री. भालेराव मुरलीधर भा. | तृतीय वर्ष विज्ञान |
| १६. श्री. राउत लक्ष्मण विष्णू | तृतीय वर्ष विज्ञान |
| १७. श्री. यादवाड नंदकुमार कृष्णराव | तृतीय वर्ष विज्ञान |
| १८. श्री. पाटील बाबुराव नाना | प्रथम वर्ष विज्ञान |
| १९. श्री. शिंदे नारायण मारुती | प्रथम वर्ष विज्ञान |

### राज्य सरकारी गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १. श्री. धाकरस भानुदास दत्तात्रय | प. पू. वाणिज्य |
| २. श्री. बुरांडे गणपत दिगंबर | प्र. व. साहित्य |
| ३. कु. केळकर वसुधा श्रीनिवास | प्र. व. वाणिज्य |
| ४. श्री. ओगले अविनाश गणेश | प. पू. वाणिज्य |
| ५. कु. बोगळेकर पद्मिनी बाळकृष्ण | द्वि. व. वाणिज्य |
| ६. कु. जोशी माणिक लक्ष्मण | द्वि. व. वाणिज्य |
| ७. श्री. मेढेकर उदय वसंत | द्वि. व. वाणिज्य |
| ८. कु. शिंदे आशालता कृष्णराव | तृ. व. साहित्य |
| ९. कु. कान्हेरे प्रतिभा भगवान | तृ. व. वाणिज्य |
| १०. कु. जाधव मीरा चिमणराव | द्वि. व. विज्ञान |
| ११. कु. नाईक गीता कृष्ण | प्र. व. वाणिज्य |
| १२. श्री. मोघे जगदीश मुकुंद | प. पू. विज्ञान |
| १३. कु. पेंढारकर पद्मजा शंकर | प. पू. साहित्य |

### राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १. कु. देशपांडे वीणा व्यंकटेश | पदवी पूर्व विज्ञान |
| २. कु. गोडसे नीलिमा अनंत | पदवी पूर्व विज्ञान |
| ३. कु. शाह नीता मोतीचंद | पदवी पूर्व विज्ञान |
| ४. श्री. सावंत विश्वनाथ गोपाळ | पदवी पूर्व वाणिज्य |
| ५. श्री. पुरंदरे श्रीनिवास नारायण | प्रथम वर्ष विज्ञान |
| ६. श्री. गाडगीळ दीपक दत्तात्रय | द्वितीय वर्ष विज्ञान |
| ७. कु. अभ्यंकर हेमलता काशिनाथ ( सौ. लेले हेमा सुभाष ) | तृ. व. साहित्य |
| ८. श्री. आल्हाड सुधाकर एकनाथ | तृ. व. विज्ञान |
| ९. श्री. नाईक दिलीप कृष्ण | तृ. व. वाणिज्य |
| १०. श्री. बाव श्याम सदाशिव | तृ. व. वाणिज्य |

# १९७३-७४ पारितोषिक विजेते

| नैपुण्य | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| **(अ) शैक्षणिक नैपुण्य पारितोषिके :** | | |
| १. पुणे विद्यापीठाच्या पदवीपूर्व साहित्य एप्रिल १९७३, परीक्षेत विद्यापीठात १० वा क्रमांक मिळविल्याबद्दल विशेष पारितोषिक. | कु. ज्योती एस. राऊत. | प्रथम वर्ष साहित्य |

**(ब) प्राध्यापक पारितोषिके :** ही बक्षिसे मॉडर्न कॉलेज मधील प्राध्यापकांनी प्रत्येकी १०० रु. ठेव देऊन जमा केलेल्या प्राध्यापक पारितोषिक निधीतून देण्यात येतात. (असा निधी रु. ४५०० जमलेला आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. पदवीपूर्व साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | कु. ज्योती एस. राऊत. | प्रथम वर्ष साहित्य. |
| २. पदवी पूर्व शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | श्री. एस. एन. पुरंदरे. | प्रथम वर्ष शास्त्र. |
| ३. पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | श्री. पी. एन. भावसार | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ४. प्रथम वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | श्री. आर. व्ही. कुलकर्णी. | द्वितीय वर्ष साहित्य. |
| ५. प्रथम वर्ष शास्त्र, ए ग्रुप, परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | श्री व्ही. वी. लाळे. | प्रथम वर्ष शास्त्र |
| ६. प्रथम वर्ष शास्त्र, बी ग्रुप परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | कु. शैलजा सी. गांधी. | प्रथम वर्ष शास्त्र |
| ७. प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | कु. छाया एस. जोगळेकर | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ८. द्वितीय वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | सौ. हेमा एस. लेले | तृतीय वर्ष साहित्य |
| ९. शास्त्र पदवी परीक्षा, द्वितीय सेमिस्टर महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | श्री. पी. कृष्णकुमार | तृतीय वर्ष शास्त्र |
| १०. द्वितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | कु. प्रतिभा बी. कान्हेरे. | तृतीय वर्ष वाणिज्य |

| नैपुण्य | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| **(क) माजी विद्यार्थी संघाची पारितोषिके :—** | | |
| १. तृतीय वर्ष साहित्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | कु. मृणाल व्ही. पाठक | तृ. व. साहित्य |
| २. तृतीय वर्ष शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | श्री. डी. जी. गुप्ता | तृ. व. शास्त्र |
| ३. तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. | श्री. जी. एस. डाळवाले | तृ. व. वाणिज्य |
| **(ड) देणगीतून ठेवलेली पारितोषिके** | | |
| १. प्रकाश भागवत पारितोषिक. (श्री. बी. आर. भागवत) | ह्या वर्षी पदार्थविज्ञान हा प्रमुख विषय सुरू झाल्याने हे पारितोषिक पुढील वर्षापासून देण्यात येईल. | |
| २. कै. रावबहादूर दत्तात्रय बळवंत राजोपाध्ये पारितोषिक, महाविद्यालयात पदवीपूर्व परीक्षेत साहित्य, शास्त्र व वाणिज्य तिन्ही विभागात प्रथम आल्याबद्दल. (श्री. का. द. राजोपाध्ये) | श्री. एस. एन. पुरंदरे | प्रथम वर्ष शास्त्र |
| ३. वासुदेवराव ताटके पारितोषिक. महाविद्यालयात पदवीपूर्व शास्त्र शाखेत प्रथम क्रमांक पुन्हा याच महाविद्यालयात अभ्यास चालू केल्याबद्दल. (श्री. वि. त्र्यं. ताटके यांनी ठेविले) | श्री. एस. एन. पुरंदरे | प्रथम वर्ष शास्त्र |
| ४. वासुदेव व्यंकटेश पारितोषिक. महाविद्यालयात साहित्य, पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. (श्रीमती विद्या कुलकर्णी) | कु. मृणाल व्ही. पाठक | तृ. व. साहित्य |
| ५. वासुदेव पंडित पारितोषिक. महाविद्यालयात साहित्य पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. (श्रीमती पंडीत) | कु. मृणाल व्ही. पाठक | |
| ६. वासुदेव पंडित पारितोषिक. महाविद्यालयात शास्त्र पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. (श्रीमती पंडीत) | श्री. डी. जी. गुप्ता | तृ. व. शास्त्र |
| ७. वासुदेव पंडित पारितोषिक. महाविद्यालयात वाणिज्य पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. (श्रीमती पंडीत) | श्री. जी. एस. डाळवाले | तृ. व. वाणिज्य |
| ८. नारायण भागवत पारितोषिक. प्रथम वर्ष शास्त्र परीक्षेत गणितात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल. (श्री. वि. त्र्यं. ताटके) | श्री. पी. बी. लाळे | प्रथम वर्ष शास्त्र |

| नैपुण्य | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| **क्रीडानैपुण्य पारितोषिके :** | | |
| **( अ ) सांघिक क्रीडाप्रकार :** | | |
| १. आंतर महाविद्यालयीन खो खो मध्ये अजिंक्यपद मिळविल्याबद्दल | श्री. एस. जे. इनामदार ( संघनायक ) | प्रथम वर्ष वाणिज्य |
| २. आंतर महाविद्यालयीन सॉफ्ट बॉल स्पर्धेमध्ये उपविजेते पद मिळविल्याबद्दल | श्री. जे. एस. गाडगीळ ( संघनायक ) | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ३. आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये उपविजेते पद मिळविल्याबद्दल | श्री. एम. एन. चिपलकट्टी ( संघनायक ) | तृतीय वर्ष शास्त्र |
| **( ब ) वैयक्तिक क्रीडा प्रकार :** | | |
| १. आंतर महाविद्यालयीन ज्युडो ( ४५ किलो खालील ) स्पर्धेमध्ये उपविजेतेपद व द्वितीयस्थान मिळविल्याबद्दल | श्री. एन. बी. कहाणे | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| २. आंतर महाविद्यालयीन कुस्ती ( ८२ किलो खालील ) स्पर्धेमध्ये उपविजेतेपद मिळविल्याबद्दल. | श्री. एस. टी. निम्हण | तृतीय वर्ष वाणिज्य |
| ३. आंतर महाविद्यालयीन, वजन उचलण्याच्या फेदरवेट स्पर्धेत विजेतेपद प्रथम स्थान मिळविल्याबद्दल | श्री. सी. एम. गोडबोले | तृतीय वर्ष वाणिज्य |
| ४. आंतर महाविद्यालयीन वजन उचलण्याच्या बॅन्टम-वेट स्पर्धेत विजेतेपद व द्वितीय स्थान मिळविल्याबद्दल | श्री. के. एन. पडवळ | तृतीय वर्ष साहित्य |
| ५. आंतर महाविद्यालयीन वजन उचलण्याच्या मिडल-वेट स्पर्धेमध्ये विजेतेपद व द्वितीय स्थान मिळविल्याबद्दल | श्री. व्ही. एन. टाकळकर | तृतीय वर्ष साहित्य |
| ६. आंतर महाविद्यालयीन १०,००० मीटर पळण्याच्या शर्यतीत द्वितीय स्थात मिळविल्याबद्दल | श्री. एस. एन. दरेकर | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ७. आंतर महाविद्यालयीन ४०० मीटर अडथळ्याच्या शर्यतीत तृतीय स्थान मिळविल्याबद्दल | श्री. आर. के. मटकर | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ८. आंतर महाविद्यालयीन १०० मीटर पळण्याच्या शर्यतीत तृतीय स्थान मिळविल्याबद्दल | कु. नीता एन. भट | पदवीपूर्व साहित्य |
| **इतर :** | | |
| १. "मनाली" येथील गिर्यारोहण सत्रासाठी निवड झाल्याबद्दल आणि १९००० फूट उंचीचे मित्रत्व शिखर काबीज केल्याबद्दल | श्री. एम. एम. आयना | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| २. जादूच्या प्रयोगातील प्राविण्याबद्दल | श्री. ए. व्ही. दरेकर | प्रथम वर्ष साहित्य |

*

ATLAS STEEL

Furniture and Office Equipment

STOCKIST

# ATLAS AGENCY

80/25, NANA PETH, Opp. Y. M. C. A. POONA 2.

Factory :

ATLAS STEEL ERA

95 A, Shankarseth Road,
POONA-9.
Phone : 25967

Factory :

ALLIED FURNITURE

Plot No. 20,
Mangalwar Peth, Bame Road,
POONA-11.
Phone No. 23339

With Best Compliments from :

# SANGHVI METAL CORPORATION

Manufacturers of :

Industrial Quality Copper, Brass and Aluminium Sheets, Strips and Circles and
**Re-roller of Stainless Steel Sheets**

*Office & Works :*

159/2, Akurdi, Bombay-Poona Road,
CHINCHWAD, Poona-19.
Phone : 8449

*Sole Selling Agents :*

M/s. Sanghvi Metal & Alloys Co.,
28, 1st Bhoiwada, Bhuleswar Road,
BOMBAY-2.
Phone : 334979

With best Compliments from :

**SHRI M. Y. DATE**

**Waste Paper Merchant**

16, Narayan Peth, Poona-30.